## उपसभापतीपदी सचिन अहिर बिनविरोध

**मुंबई :** शिंदेंच्या शिवसेनेकडून सचिन अहिर यांना विधान परिषदेच्या उपसभापतीपदाची उमेदवारी देण्यात आली होती. त्यांच्या विरोधात ठाकरेंकडून उमेदवार दिला गेला होता. पण, त्याने माघार घेतल्यानंतर सचिन अहिर यांची आवाजी मतदानाने बिनविरोध निवड झाल्याचं जाहीर करण्यात आलं. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारसुद्धा उपस्थित होत्या. शिंदे गटाकडून सचिन अहिर, तर ठाकरे गटाकडून जगन्नाथ अभ्यंकर यांनी उपसभापतीपदासाठी अर्ज दाखल केला. विधानपरिषदेच्या पक्षीय बलाबलानुसार सचिन अहिर यांचा एकतर्फी विजय झाला असता. मात्र सभागृहात पान २ वर

१९३७-२०२६ ९० वर्ष

# कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

## मुरुड–एकदरा मार्गावर झाड कोसळले

**कोर्लई :** गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे मुरुड–एकदरा–राजपुरी मार्गावर बुधवारी सकाळी कडुनिंबाचे झाड कोसळल्याने काही काळ वाहतुकीत अडथळा निर्माण झाला. काही काळ या मार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवित किंवा वित्तहानी झाली नाही. घटनेची माहिती मिळताच सार्वजनिक बांधकाम विभागाचे स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक रोशन पाटील यांनी घटनास्थळी धाव घेत स्थानिकांच्या मदतीने झाड हटविले. त्यानंतर रस्त्यावरील वाहतूक पूर्ववत सुरू करण्यात आली.

रायगड गुरुवार । दि. २ जुलै २०२६ । अंक २६ । पृष्ठे ८ । किंमत ४ ₹ । आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

### वेधक

## झोपेत असतानाच काळाचा घाला!

**पनवेल :** कामोठे सेक्टर–१० येथील साई सिद्धी सोसायटीत बुधवारी पहाटे घडलेल्या भीषण दुर्घटनेत बेडरूमचा स्लॅब कोसळून ३९ वर्षीय सुरेश लोखंडे यांचा जागीच मृत्यू झाला, तर त्यांची १२ वर्षीय मुलगी वेदिका लोखंडे जखमी झाली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून इमारतींच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, साई सिद्धी सोसायटीतील फ्लॅट क्रमांक १०१ मध्ये सुरेश लोखंडे कुटुंबासह वास्तव्यास होते. बुधवारी सकाळी सुमारे ६ वाजण्याच्या सुमारास सुरेश लोखंडे आणि त्यांची मुलगी वेदिका बेडरूममध्ये झोपलेले असताना पान २ वर

## हेटवणे कालवा पूल चोरीचा उलगडा

**पेण :** पेण तालुक्यातील हेटवणे मध्यम प्रकल्पातील कालव्यावरील पुलांचे लोखंडी साहित्य चोरी व अपहार प्रकरणाचा गुन्हे प्रकटीकरण शाखेने पर्दाफाश करत मुख्य आरोपी मयुर ढेणे याला अटक केली आहे.



त्याच्या चौकशीत या प्रकरणात एकूण नऊ जणांचा सहभाग असल्याचे समोर आले आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, चार जणांवर अपहार, तर पाच जणांवर चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अपहार प्रकरणात संबंधित प्रकल्पातील सुपरवायझर व प्रोजेक्ट मॅनेजर यांचाही समावेश आहे. आरोपी सुट्टीच्या दिवशी पान २ वर

## शॉक लागून दोन विद्यार्थिनी जखमी

**नवी मुंबई :** मुसळधार पावसादरम्यान नेरूळ येथील एलपी ब्रिज परिसरात उघड्या विजेच्या तारेचा शॉक लागून दोन विद्यार्थिनी जखमी झाल्याची घटना मंगळवारी घडली. रस्त्यावर पडलेल्या विद्युत तारेच्या संपर्कात आल्याने दोघींनाही शॉक बसून त्या काही काळ बेशुद्ध झाल्या. स्थानिकांच्या मदतीने त्यांना तातडीने डी. वाय. पाटील रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यानंतर महानगरपालिकेकडून त्यांना पुढील उपचारासाठी वाशी येथील फोर्टिस रुग्णालयात हलविण्यात आले असून, दोघींची प्रकृती स्थिर असल्याची माहिती आहे. दरम्यान, परिसर बॅरिकेड्स लावून बंद करण्यात आला असून, महावितरण आणि पोलिसांकडून घटनेचा तपास सुरू आहे. या घटनेबाबत संताप व्यक्त करण्यात येत आहे.

# रायगडात संततधार

## अंबा, कुंडलिकाने गाठली इशारा पातळी



● सिद्धेश्वर नदी दुथडी भरुन वाहताना



(छायाचित्र : समीर मालोदे)

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यात गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसाने जनजीवन विस्कळीत झाले आहे. अनेक ठिकाणी सखल भाग जलमय झाले असून, अंबा, कुंडलिका नद्यांनी इशारा पातळी ओलांडली आहे. म्हसळा तालुक्यातील पाभरे आणि रोहा तालुक्यातील सुतारवाडी धरण पूर्ण क्षमतेने भरल्याने विसर्ग सुरू करण्यात आला आहे. तर पोलादपूरच्या आंबेनळी घाटात दरड कोसळल्याने काही काळ वाहतूक ठप्प झाली होती. दरम्यान, हवामान विभागाने रायगड जिल्ह्यासाठी ३ आणि ४ जुलै रोजी रेड अलर्ट जाहीर केल्याने प्रशासन सतर्क झाले आहे.

सोमवारपासून सुरू झालेल्या पावसाने जिल्हाभर दमदार हजेरी लावली असून, आतापर्यंत सरासरी १०५.२ मिमी पावसाची नोंद झाली आहे. अलिबाग, महाड, माणगाव, रोहा, पोलादपूर, श्रीवर्धन, म्हसळा, मुरूड आणि तळा तालुक्यांत १०० मिमीपेक्षा अधिक पाऊस झाला असून, अनेक नद्या, नाले आणि तलाव तुडुंब भरले आहेत.

नागोठणे परिसरातील अंबा नदीची पाणीपातळी इशारा पातळीच्या पुढे गेली असून, प्रशासनाने नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. कुंडलिका, पाताळगंगा, उल्हास आणि गाढी नद्यांच्या पाणीपातळीतही पान २ वर

### पुढील चार दिवस धोक्याचे जनजीवन विस्कळीत

### हवामान विभागाचा सतर्कतेचा इशारा

भारतीय हवामान विभागाने रायगड जिल्ह्यासाठी २ आणि ५ जुलै रोजी ऑरेंज अलर्ट, तर ३ आणि ४ जुलै रोजी रेड अलर्ट जारी केला आहे. ६ जुलैपर्यंत कोकणात बहुतांश ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. प्रशासनाने नागरिकांना नदीपात्र, पूरग्रस्त भाग आणि घाटमार्गांवर अनावश्यक जाणे टाळण्याचे आवाहन केले आहे. शेतकऱ्यांनी शेतातील अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा, तसेच पशुधन सुरक्षित ठिकाणी हलवावे, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# आंबेनळी घाटात दरड कोसळली



● (छायाचित्र : शैलेश पालकर)

■ **पोलादपूर, महाबळेश्वरकडे जाणारी वाहतूक ठप्प**

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील आंबेनळी घाटाच्या रुंदीकरणाच्या कामामुळे उभे कापण्यात आलेल्या डोंगरांनी आता पाऊस सुरू होताच लाल मातीचे ढिगारे घाट रस्त्यावर ढकलण्यास सुरुवात केली आहे. मंगळवारी संध्याकाळी सात वाजण्याच्या सुमारास पोलादपूर तालुक्यातील कुंभळवणे ते पायटे गावादरम्यान एका मोठ्या दगडासह लाल मातीचा ढिगारा आणि एक झाड अशी साधारणपणे वीस ते पन्नास मीटर अंतराची दरड कोसळली. दरम्यान, पावसाळा सुरू झाल्यापासून पोलादपूर तालुक्यात तीन दिवस शंभरी पार पाऊस पडल्याची नोंद तसीसल कार्यालयातील आपत्ती निवारण कक्षातून प्राप्त झाली आहे.

या घटनेची माहिती मिळताच पोलादपूर पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक सतीश पवार आणि सहकारी घटनास्थळी तातडीने पोहोचले आणि त्यांनी आंबेनळी घाटातील वाढत्या वाहतूक नियंत्रण करण्यात यश मिळवले. तब्बल तासाभरानंतर वाडा कुंभरोशी ते पायटा यादरम्यान रुंदीकरणाच्या कामांमध्ये वापरण्यात येणाऱ्या जेसीबी हा दरड कोसळलेल्या ठिकाणी येऊन दाखल झाला. यावेळी तुफान अतिवृष्टी सुरू असल्याने रस्त्यावरील मलबा हटवण्याच्या कामांमध्ये पावसाचा अडथळा सुरू राहिला. अर्धा तास सुरू असलेल्या दरड हटवण्याच्या कामात कापलेल्या पान २ वर

# कठडा कोसळला; म्हणे पूल सुरक्षित!

## कार्यकारी अभियंता धायतडक यांचे बेजबाबदार उत्तर

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

सहाण–पाल्हे–नागाव मार्गावरील पुलाचा संरक्षक कठडा रविवारी कोसळला. पुलाच्या कडेला असलेले संरक्षणच जमीनदोस्त झाले. याबाबत शेकापने आक्रमक भूमिका घेत बुधवारी (दि.१) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंता मोनिका धायतडक यांची भेट घेत जाब विचारला.



● बांधकाम विभागाला निवेदन देताना शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत, अनिल पाटील, प्रमोद घासे, अनिल चोपडा व अन्य.

पुलाला अपघाताचा धोका स्पष्टपणे दिसत असतानाही सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंत्यांनी फक्त बॅरिकेड्स पडले आहेत, पुलाच्या मुख्य संरचनेला कोणताही धोका नाही, असा दावा केला. या भूमिकेने नागरिकांच्या संतापात भर पडली आहे. विशेष म्हणजे, गेल्या वर्षभरापासून पुलाच्या दुरुस्तीचे काम सुरू असल्याचा दावा सार्वजनिक बांधकाम विभाग करत होता. मात्र, प्रत्यक्षात दुरुस्तीचा दर्जा काय होता, याचा नमुना कठडा कोसळल्यानेच समोर आल्याची टीका होत आहे. प्रत्यक्षात दुरुस्ती झाली की केवळ कागदोपत्री कामे झाली? असा सवाल शेकाप कार्यकर्त्यांनी उपस्थित करताच कठड्याचे काम पूर्वी करण्यात आल्याचे धायतडक यांनी सांगितले. ते काम आम्ही केले नसल्याचे सांगून त्यांनी जबाबदारी झटकल्याने कार्यकर्त्यांनी संताप व्यक्त केला.

दरम्यान, पुलाचा कठडा कोसळल्यानंतरही ‘काळजीचे कारण नाही’ असे सांगणाऱ्या अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त पान २ वर

# जुने कार्यकर्ते स्वगृही परतले

### शेतकरी भवनमध्ये जल्लोषात स्वागत

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबागमधील गोविंद बंदर येथील काही कार्यकर्ते गैरसमजुतीमधून शिवसेना उद्धव ठाकरे गटात गेले होते. मात्र, चार दिवसांत हे कार्यकर्ते त्यांच्या कुटुंबियांसमवेत पुन्हा शेतकरी कामगार पक्षात सामील झाले आहेत. या कार्यकर्त्यांनी घरवापसी केल्याने त्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. अलिबागचे माजी नगराध्यक्ष, विद्यमान बांधकाम सभापती प्रशांत नाईक यांच्या नेतृत्वाखाली हा पक्षप्रवेश सोहळा शेतकरी भवन येथील सभागृहात बुधवारी (दि. १) दुपारी मोठ्या उत्साहात झाला. जुन्या कार्यकर्त्यांच्या घर वापसीमुळे ठाकरे गटातील नगरसेवकांना चपराक बसली.




यावेळी शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, कामगार आघाडीचे प्रमुख प्रदीप नाईक, शेकाप जिल्हा सहचिटणीस ॲड. गौतम पाटील, शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत, माजी नगराध्यक्ष सतीश पान २ वर

### ठाकरे गटाच्या नगरसेवकाला चपराक

गोविंद बंदर येथील शेकापचे जुने कार्यकर्ते काही गैरसमजुतीमधून शिवसेनेत गेले होते. त्यांचा गैरसमज दूर होऊन चार दिवसांमध्ये स्वगृही परत आले आहेत. त्यामुळे ठाकरे गटातील नगरसेवकांना चपराक बसली असल्याची प्रतिक्रीया माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांनी व्यक्त केली.

# अरुणाचलमध्ये ढगफुटी

■ **१४ गावांतील तीन हजारांहून अधिक नागरिक बाधित**

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

अरुणाचल प्रदेशातील लोअर सियांग जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे झालेल्या ढगफुटी आणि भूस्खलनाने मोठे नुकसान झाले असून, १४ गावांतील ३,१०० हून अधिक नागरिक या आपत्तीमुळे प्रभावित झाले आहेत. अचानक आलेल्या पुरात किमान तीन जणांचा मृत्यू झाला असून, हजारो नागरिक प्रभावित झाले आहेत.



झुलता पूल वाहून गेलापूरामुळे गावाला जोडणारा झुलता पूल वाहून गेला असून, पाणीपुरवठा व्यवस्था, वीज खांब आणि विद्युत वाहिन्याही नष्ट झाल्या आहेत. जिल्हा प्रशासन, भारतीय सैन्य, भारत–तिबेट सीमा संघटना (बीआरओ), राज्य पोलीस आणि स्थानिक स्वयंसेवक यांच्या मदतीने युद्धपातळीवर बचाव व मदतकार्य सुरू आहे. रस्ते सुरू करणे, तात्पुरता पूल उभारणे, अन्नधान्य, पिण्याचे पाणी आणि वीजपुरवठा पूर्ववत करणे, तसेच बाधित कुटुंबांना नुकसानभरपाई व पुनर्वसन करण्यासाठी प्रशासनाकडून सर्वेक्षण सुरू आहे. ईशान्य भारतात सुरू असलेल्या मुसळधार मान्सून पावसामुळे आसाम, मेघालय, सिक्कीम आणि नागालँडमध्ये गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे.




● शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील यांचा अभीष्टचिंतन सोहळा मंगळवारी साजरा करण्यात येणार आहे. त्यानिमित्त आयोजित बैठकीत पदाधिकारी व कार्यकर्ते. सविस्तर बातमी पान २ वर.

# धुतूमच्या खारफुटीवर बुलडोझर

## सिडकोकडून कारवाई नाहीच



**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील धुतूम गावात सिडकोच्या मालकीच्या सुमारे ८ ते १० एकर जागेवरील खारफुटीचा कथित नाश करून भराव टाकत बेकायदेशीर पार्किंग व्यवसाय सुरू असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी उरण तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष घन:श्याम कडू यांनी मुख्यमंत्री यांच्याकडे लेखी तक्रारीद्वारे केली आहे.

तक्रारीनुसार, कोट्यवधी रुपयांच्या सिडकोच्या जागेवर मोठ्या प्रमाणात भराव टाकून अनेक वर्षांपासून कथितपणे बेकायदेशीर पार्किंग व्यवसाय सुरू असून, त्यासाठी खारफुटीचा नाश करण्यात आल्याचा आरोप आहे. या प्रकारामुळे पर्यावरण संरक्षण कायद्याचे पान २ वर

### भरपावसात उघड्यावर अंत्यसंस्कार | चिचोंडेतील घटनेने संतापाची लाट

# अखेरच्या प्रवासाला आसरा नाही!



**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

माणसाच्या आयुष्याचा शेवटचा प्रवासही सन्मानाने व्हावा, अशी प्रत्येकाची अपेक्षा असते. मात्र, अखेरच्या प्रवासाला आसरा नाही या वेदनादायी वास्तवाची प्रचिती म्हसळा तालुक्यातील पाभरे ग्रामपंचायत हद्दीतील चिचोंडे येथे आली. चिचोंडे गावात स्मशानभूमीवर संरक्षक शेड नसल्याने एका मृत व्यक्तीवर भरपावसात उघड्यावर अंत्यसंस्कार करण्याची वेळ कुटुंबीय आणि ग्रामस्थांवर आली. या हृदयद्रावक घटनेमुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून, ग्रामीण भागातील स्मशानभूमींवरील मूलभूत सुविधांचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

मंगळवारी चिचोंडे येथील रहिवासी यशवंत बाबू पोटले यांचे निधन झाले. अंत्यविधीसाठी त्यांचा मृतदेह गावातील स्मशानभूमीत नेण्यात आला. मात्र, तेथे संरक्षक शेडची सुविधा नसल्याने मुसळधार पावसात मृतदेह उघड्यावरच ठेवावा लागला. पावसाचा मारा सुरू असतानाच नातेवाईक आणि ग्रामस्थांनी मोठ्या मनःस्तापात सर्व धार्मिक विधी पूर्ण करून अंत्यसंस्कार केले.

या घटनेने गावकऱ्यांच्या भावना तीव्र झाल्या असून, “मृत्यूनंतरही माणसाला सन्मानाने निरोप देता येत नसेल, तर विकासाच्या दाव्यांचे काय?” असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. स्मशानभूमीसारख्या अत्यावश्यक ठिकाणीही मूलभूत सुविधा उपलब्ध नसणे, ही प्रशासनाची गंभीर उदासीनता असल्याची टीका ग्रामस्थांकडून होत आहे.

दरम्यान, चिचोंडे स्मशानभूमीवरील शेडच्या कामाबाबत यापूर्वीही अनियमिततेचे आरोप झाले होते. संबंधित काम राष्ट्रवादी काँग्रेसशी संबंधित एका सरपंचाच्या मुलाने घेतल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे. तसेच, या कामात कथित गैरव्यवहार झाल्याचा आरोप करत मनसेचे योगेश गोपाळ बोर्ले यांनी १८ फेब्रुवारी रोजी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल केल्याचा दावा करण्यात आला आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, तक्रार करूनही संबंधित पान २ वर

# चार खून केलेत... पुढचा नंबर तुझा!

## लोकलमध्ये मद्यधुंद प्रवाशाचा धिंगाणा

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

मुंबई उपनगरीय रेल्वेतील प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. पनवेलहून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) कडे जाणाऱ्या लोकलमध्ये मद्यधुंद प्रवाशाने अक्षरशः धिंगाणा घालत सहप्रवाशांना शिवीगाळ आणि जीवे मारण्याच्या धमक्या दिल्याने काही काळ डब्यात भीतीचे वातावरण निर्माण झाले. “मी चार खून केलेत... पुढचा नंबर तुझा” अशी धमकी देत तो प्रवाशांवर दादागिरी करू लागल्याने एकच खळबळ उडाली. या संपूर्ण प्रकाराचा व्हिडिओ समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला असून, लोकलमधील सुरक्षेवर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



माहितीनुसार, संबंधित प्रवासी मद्यधुंद अवस्थेत डब्यात मोठमोठ्याने आरडाओरडा करत होता. सुरुवातीला सहप्रवाशांनी त्याकडे दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न केला. मात्र, काही वेळातच त्याने अश्लील शिवीगाळ सुरू करत प्रवाशांना धमकावण्यास सुरुवात केली. काहींनी त्याला शांत राहण्यास सांगितल्यावर तो आणखी आक्रमक झाला पान २ वर

# तलावात बुडून युवकाचा मृत्यू

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

खारघरमधील भारती विद्यापीठ मागील डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या तलावात पोहण्यासाठी उतरलेल्या १७ वर्षीय युवकाचा बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, पावसाळ्यात धोकादायक ठिकाणी जाणाऱ्या पर्यटकांबाबत पुन्हा एकदा चिंता व्यक्त केली जात आहे.

खारघर डोंगर परिसर निसर्गरम्य वातावरण, धबधबे, तलाव आणि पावसाळ्यात वाहणाऱ्या झऱ्यांसाठी प्रसिध्द आहे. दरवर्षी पाऊस सुरु होताच मुंबईसह नवी मुंबई परिसरातील मोठ्या संख्येने पर्यटक खारघर मध्ये भेट देतात. मात्र, अनेक पर्यटक सुरक्षिततेच्या नियमांकडे दुर्लक्ष पान २ वर

# जयंत पाटील यांचा मंगळवारी अभीष्टचिंतन सोहळा

## • वेगवेगळ्या उपक्रमांतून साजरा करणार वाढदिवस

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील यांचा मंगळवारी (दि. ७) ७१ वा वाढदिवस साजरा करण्यात येणार आहे. या दिवशी जिल्ह्यासह राज्यात वेगवेगळे उपक्रम आयोजित केले आहेत. सामाजोपयोगी उपक्रमांतून हा दिवस साजरा केला जाणार आहे. अलिबागमधील पीएनपी नाट्यगृहात अभीष्टचिंतन सोहळ्याचा कार्यक्रम सकाळी दहा वाजता सुरु होणार असल्याची माहिती देण्यात आली. याबाबत शेतकरी भवन येथील सभागृहात समितीच्या वतीने बैठकीचे आयोजन बुधवारी करण्यात आले.

जयंत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त सुरुवातीला पेझारी येथे खारेपाट शेकाप विभागामार्फत सकाळी वृक्षारोपण करण्यात येणार आहे. त्यानंतर सकाळी नऊ वाजता पीएनपी नाट्यगृहाच्या मैदानात शुभेच्छांचा कार्यक्रम पार पडणार आहे. त्यानंतर दहा वाजता नाट्यगृहाच्या सभागृहात अभीष्टचिंतन सोहळा आयोजित केला जाणार आहे. जयंत पाटील अभीष्टचिंतन सोहळा समितीसह शेकाप कार्यकर्त्यांच्यावतीने हा बहारदार कार्यक्रम घेण्यात येणार आहे. शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील यांचा अभीष्टचिंतन सोहळा मंगळवारी (दि.७) अलिबागमधील पीएनपी नाट्यगृहामध्ये होणार आहे. हा कार्यक्रम सकाळी दहा वाजता सुरु होणार आहे.

यावेळी बडोदा राज घराण्याचे वंशज महाराज समरजीतसिंह गायकवाड, विधान परिषदेचे उपसभापती सचिन अहिर, आ. रोहित पवार, आ. नारायण पाटील, आ. बाबासाहेब देशमुख, आ. सत्यजित तांबे, ज्येष्ठ पत्रकार व समीक्षक राजू परुळेकर यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडणार आहे.

अभीष्टचिंतन सोहळ्याचे नियोजन करण्यासाठी अभीष्टचिंतन समितीसह शेकापच्या पदाधिकारी यांची बैठक बुधवारी (दि.१) आयोजित करण्यात आली. अलिबागमधील शेतकरी भवन येथे होणाऱ्या बैठकीत शेकाप महाविकास आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, कामगार आघाडी प्रमुख प्रदीप नाईक, अलिबागचे माजी नगराध्यक्ष तथा बांधकाम सभापती प्रशांत नाईक, शेकाप जिल्हा सहचिटणीस ॲड. गौतम पाटील, शेकाप जिल्हा कार्यालयीन चिटणीस मंडळाचे सदस्य अनिल पाटील, तालुका चिटणीस सुरेश घरत, ॲड. परेश देशमुख, ॲड. सचिन जोशी, नागावचे माजी सरपंच नंदकुमार मयेकर, सुरेश खोत, अलिबागचे पाणी सभापती अनिल चोपडा, अलिबाग तालुका पुरोगामी युवक संघटना अध्यक्ष विक्रांत वार्डे, अजय झुंजारराव आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी ॲड. मानसी म्हात्रे, प्रदीप नाईक, सुरेश घरत, अजय झुंजारराव यांनी कार्यकर्त्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

### जनतेचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी पुढाकार घ्या : ॲड. मानसी म्हात्रे

पक्षसंघटना मजबूत करण्यासाठी वेगवेगळ्या जनआघाड्या स्थापन करण्यात आल्या आहेत. पक्षसंघटना मजबूत करण्यासाठी प्रत्येकाने जिद्दीने कामाला लागले पाहिजे. अलिबाग तालुक्यात महिला आघाडीचे संघटन चांगल्या पद्धतीने सुरु आहे. तीच ऊर्जा घेऊन राज्यातील महिला संघटन व इतर आघाडी काम करीत आहेत. शेकापचा संघर्ष असाच चालू ठेवून जनसामान्यांसाठी रस्त्यावर येण्याची गरज आहे. बदलत्या राजकीय परिस्थितीमुळे सर्वसामान्यांना शेकापच्या विचारांची गरज आहे. दुर्बल घटकांसह पीडितांच्या न्याय्य हक्कासाठी लढा देणारा शेतकरी कामगार पक्ष हा एकमेव आहे, ही भावना आजही तळागाळातील घटकांपर्यंत आहे. त्यानुसार रस्त्यावर उतरून सामान्य जनतेचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी पुढाकार घेऊया, असे आवाहन महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे यांनी केले आहे.

### शालेय साहित्य भेट द्या : प्रदीप नाईक

समाजातील गरजू आणि वंचित घटकातील मुलांना शिक्षणासाठी अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. शालेय साहित्य न मिळाल्याने शिक्षणाला अडथळा निर्माण होतो. त्यामुळे शेकाप जयंत पाटील यांचा वाढदिवस एक वेगळ्या उपक्रमातून साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी पुष्पगुच्छ, बुके देण्याऐवजी शालेय साहित्य भेट देण्यावर भर देण्यात यावी. जयंत पाटील यांना शुभेच्छा देण्यासाठी येणाऱ्या नागरिकांनी स्वखुशीने वह्या, पेन, कंपास बॉक्स, शाळेचे दप्तर आदी शालेय साहित्य भेट द्यावे, असे आवाहन शेकाप कामगार आघाडीचे प्रमुख प्रदीप नाईक यांनी केले आहे. गरजूंच्या मदतीसाठी हा पुढाकार हाती घेण्यात आला आहे. शेकाप नेते जयंत पाटील अभीष्टचिंतन सोहळा समितीच्या बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. यावर्षी हा आनंद द्विगुणित करण्यासाठी एक वेगळा आणि सामाजिक संकल्प करण्यात आला आहे, असेही ते म्हणाले.

### कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे : सुरेश घरत

शेकाप नेते जयंत पाटील यांचा वाढदिवस म्हणजे आपल्या कार्यकर्त्यांसाठी उत्सव आहे. हा वाढदिवस सोहळा यावर्षीदेखील साजरा केला जाणार आहे. त्यानिमित्ताने बैठकीचे आयोजन केले आहे. कार्यकर्त्यांनी या कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन तालुका चिटणीस सुरेश घरत यांनी केले.


**कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड**
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा

**खुली ई-निविदा (एक पाकिट प्रणाली) आमंत्रण सूचना**

उप मुख्य अभियंता (कार्य), कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, रत्नागिरी खालील कामासाठी पात्र कंत्राटदारांकडून आयआरईपीएस पोर्टलवर ई-निविदा प्रक्रियाद्वारे खुली निविदा एक पाकिट बोली प्रणाली आमंत्रित करीत आहेत: **कामाचे नाव:** रत्नागिरी क्षेत्रात सावंतवाडी रोड (एसडब्ल्यूव्ही) स्थानकाच्या पूर्व दिशेला कव्हर्ड शेड, बुकिंग कार्यालय, प्रतीक्षालय आणि अतिरिक्त सुविधा उपलब्ध करून देणे. **निविदा सूचना क्र.: केआर-आरएन-डीवायसीईडब्ल्यू-एसडब्ल्यूव्हीडीईव्ही-2026-10 दिनांक: 01/07/2026. एकूण अंदाजित किंमत:** रु. 287.16 लाख (जीएसटी वगळून). **बोली सुरू होण्याची तारीख: 08/07/2026. अंतिम तारीख/वेळ: ऑनलाइन प्रस्ताव/बोली सादर करण्यासाठी 22/07/2026 रोजी 15:00 वा. पर्यंत. काम पूर्ण करण्याचा कालावधी:** 12 महिने. मॅन्युअल प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. तपशील/सहभागासाठी कृपया **https://www.ireps.gov.in** संकेतस्थळ पाहावे आणि शुद्धिपत्र/परिशिष्ट केवळ याच संकेतस्थळावर प्रसिद्ध केले जाईल.



**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक शांती सिंग चौहान व आकांक्षा चौहान यांचेकडुन खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे

**मौजे. कामतपाडा तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | भूमापन क्रं. व उपविभाग/ सर्व्हे नं/हिस्सा नं | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| शांती सिंग चौहान आकांक्षा चौहान | २२/४ | ०-२०-०० | ०.९१ |
| शांती सिंग चौहान | २२/४ | ०-२०-०० | ०.९१ |

या मिळकतींशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयाणापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि तसेच त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतील जाणार नाही.

ता. ०२/०७/२०२६

खरेदीदारातर्फे वकील
**ॲड. वृषाली रघुनाथ मोरे** मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता - प्रशाकीय भवन जवळ सरकारमान्य गाळा नं २
ता. कर्जत जि.रायगड.


## पान १ वरून

### आंबेनळी घाटात दरड कोसळली

डोंगरातून पुन्हा माती आणि पाण्याचे लोट सुरू झाल्याने हे ठिकाण धोकादायक ठरले आहे. पोलिसांनी एक बाजूची वाहतूक सुरू करून पोलादपूरकडील वाहने पुढे महाबळेश्वरकडे मार्गस्थ केली. त्यानंतर पायटा ते दाभिळ टोकदरम्यान उभ्या असलेल्या वाहनांना पोलादपूरकडे रवाना केले.

दरम्यान, पोलादपूर तालुक्यात २३ जून रोजी पावसाला सुरुवात झाल्यापासून आजपर्यंत पावसाने २४ जून रोजी १२९ मिमी, सोमवारी २९ जून रोजी १३० मिमी तसेच बुधवारी सकाळी नोंदलेली १०८ मिमी अशी तीनवेळा शतकपार नोंद झाली असून, बुधवारी दिवसभर पावसाची संततधार सुरू राहिली.

### रायगडात संततधार

वाढ होत असून, परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे.

मुसळधार पावसामुळे रोहा तालुक्यातील सुतारवाडी आणि म्हसळा तालुक्यातील पाभरे ही लघुपाटबंधारे धरणे पूर्ण क्षमतेने भरली असून, सांडव्यावरून विसर्ग सुरू आहे. धरणाखालील गावांतील नागरिकांना आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

दरम्यान, पोलादपूर तालुक्यातील आंबेनळी घाटात मंगळवारी सायंकाळी दरड कोसळल्याने काही तास वाहतूक बंद ठेवावी लागली. यंत्रणांनी तातडीने माती व दगड हटवून रस्ता वाहतुकीसाठी खुला केला. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

### जुने कार्यकर्ते स्वगृही परतले

प्रधान, माजी नगरसेविका वृषाली ठोसर, संजना किर, महेश शिंदे, पाणी सभापती अनिल चोपडा, नगरसेविका सुषमा पाटील, अश्विनी ठोसर, ॲड. निवेदिता वाघमारे, ॲड. ऋषीकेश माळी, जमाल सय्यद, अलिबाग पुरोगामी युवक अध्यक्ष विक्रांत वार्डे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेतकरी कामगार पक्षातील इस्माईल मोहद्दीन सय्यद, सल्लाउद्दीन गायसुद्दीन शाह, कामरुद्दीन गयाउद्दीन शाह या कार्यकर्त्यांनी गेल्या चार दिवसांपूर्वी गैरसमजुतीमधून शिवसेना ठाकरे गटात प्रवेश केला होता. मात्र, अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून पुन्हा या तीन कार्यकर्त्यांसह त्यांच्या कुटुंबियांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. इस्माईल मोहद्दीन सय्यद, सल्लाउद्दीन गायसुद्दीन शाह, कामरुद्दीन गयाउद्दीन शाह या जुन्या कार्यकर्त्यांचा गैरसमज दूर होऊन अवघ्या चार दिवसांमध्ये ते स्वगृही परतले आहेत. त्यामुळे ठाकरे गटातील नगरसेवकांना चांगलीच चपराक बसली आहे. इस्माईल सय्यद, सल्लाउद्दीन शाह, कामरुद्दीन शाह यांनी बुधवारी (दि.१) शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. त्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.

### कठडा कोसळला; म्हणे पूल सुरक्षित!

होत असून, कठडा नसलेला पूल सुरक्षित कसा, असा सरळ प्रश्न वाहनचालक आणि ग्रामस्थ विचारत आहेत. रात्रीच्या अंधारात या पुलावरून प्रवास करणाऱ्यांसाठी परिस्थिती अधिक धोकादायक बनली आहे. प्रभावी बॅरिकेड्स नाहीत, पुरेशी प्रकाशयोजना नाही आणि अपघात टाळण्यासाठी आवश्यक खबरदारीही दिसून येत नाही. अपघात झाल्यानंतरच प्रशासन जागे होणार का? असा संतप्त सवालही यानिमित्ताने उपस्थित होत आहे.

दरम्यान, पाल्हेसह नवेदर बेली पुलाच्या धोकादायक अवस्थेबाबत सतत शेतकरी कामगार पक्षाने बांधकाम विभागाचे लक्ष वेधले आहे. मात्र, बांधकाम विभागाकडून फक्त आश्वासनाचा पाऊस पाडण्यात आला आहे. डागडुजी फक्त नावालाच असे चित्र आहे. नवेदर बेली पुलाची अवस्थादेखील दयनीय झाली आहे. बांधकाम परिक्षणामध्ये हा पुल धोकादायक ठरला आहे. या पुलावरून अवजड वाहनाला गतवर्षी पावसाळ्या बंदी घातली. मात्र, पुलाच्या दुरुस्तीसह नव्याने बांधकाम करण्यामागे कोणत्याही प्रकारची हालचाल दिसून आली नाही. या पुलावरून एसटी सेवा बंद करण्यात आली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांसह नियमीत प्रवास करणाऱ्या प्रवाशांची प्रचंड हाल झाले आहेत. या पुलावर बॅरिकेट बसविण्याची मागणी करण्यात आली. परंतु, काम दिसून येत नाही. नियम धाब्यावर बसवून या पुलावरमात्र तीस ते चाळीस टन क्षमतेची अवजडन वाहने खुलीआमपणे धावतात. त्यामुळे सुरक्षेचा प्रश्न गंभीर झाला आहे. पाल्हे व नवेदर बेली पुलावरील प्रवास जीव मुठीत धरून करावा लागत आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग सर्वसामान्यांच्या जीवाशी खेळत असल्याचा आरोप शेकापने केला आहे. पाल्हे व बेली पुलाची दुर्घटना घडल्यावर संबंधित विभाग, त्याला जबाबदार राहणार, अशी टीका करीत बुधवारी (दि. १) शेतकरी कामगार पक्षाच्या चिटणीस मंडळाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता मोनिका धायतडक यांची भेट घेऊन पुलांची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी केली. जीर्ण झालेल्या पाल्हे व बेली येथील पुलाबाबत शेकाप राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्यावतीने शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत, शेकाप जिल्हा कार्यालयीन चिटणीस अनिल पाटील, रायगड बाजारचे उपाध्यक्ष प्रमोद घासे आणि अलिबाग नगरपरिषदेचे पाणी सभापती अनिल चोपडा आदी उपस्थित होते.

### धुतूमच्या खारफुटीवर बुलडोझर

उल्लंघन झाल्याचा दावाही करण्यात आला आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, सिडकोचा अतिक्रमण विभाग किरकोळ अतिक्रमणांवर तात्काळ कारवाई करतो; मात्र धुतूममधील या कथित प्रकाराकडे सातत्याने दुर्लक्ष करण्यात आले. काही अधिकारी आणि स्थानिक राजकीय पदाधिकाऱ्यांच्या भूमिकेबाबतही चर्चा होत असल्याने त्याची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी तक्रारीत करण्यात आली आहे.

तक्रारीत संबंधित जागेची संयुक्त पाहणी करून अनधिकृत भराव हटविणे, खारफुटीचा नाश झाल्याचे आढळल्यास पर्यावरण संरक्षण कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करणे, तसेच संबंधित अधिकारी व जबाबदार व्यक्तींवर प्रशासकीय आणि फौजदारी कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, या प्रकरणातील आरोपांबाबत सिडको, संबंधित अधिकारी किंवा ज्यांच्याविरुद्ध आरोप करण्यात आले आहेत, त्यांची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही.

### तलावात बुडून युवकाचा मृत्यू

करुन तलावातील खोल पाण्यात उतरतात. त्यामुळे दरवर्षी अपघाताच्या घटना घडत असतात. मुंबई शहरातील धारावी येथील काही तरुण खारघर मध्ये फिरण्यासाठी आले होते. भारती विद्यापीठ मागील डोंगराच्या पायथ्याशी असलेला तलाव सध्या मुसळधार पावसामुळे पूर्ण भरुन वाहत आहे. या तलावात काही तरुण पोहण्यासाठी उतरले. परंतु, तलावाच्या खोलीचा अंदाज न आल्याने आश्रफ शेख (१७) तलावातील पाण्यात बुडाला. त्याला वाचविण्याचे प्रयत्न करण्यात आले. या घटनेची नोंद खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### चार खून केलेत... पुढचा नंबर तुझा!

आणि ''मी चार खून केलेत... पुढचा नंबर तुझा'', अशी धमकी दिल्याचा दावा प्रत्यक्षदर्शींनी केला.

या धमकीनंतर डब्यात काही काळ प्रचंड तणाव निर्माण झाला. अनेक प्रवाशांनी त्याच्यापासून सुरक्षित अंतर ठेवण्याचा प्रयत्न केला, तर काही धाडसी प्रवाशांनी प्रसंगावधान राखत त्याला शांत करण्याचा प्रयत्न केला. अखेर सहप्रवाशांच्या सामूहिक हस्तक्षेपामुळे परिस्थिती नियंत्रणात आली आणि संभाव्य अनर्थ टळला. या घटनेत कोणालाही दुखापत झाली नसल्याचे समोर आले आहे.

दरम्यान, संपूर्ण प्रकार काही प्रवाशांनी मोबाईलमध्ये चित्रीत केला असून, त्याचा व्हिडिओ समाजमाध्यमांवर वेगाने प्रसारित होत आहे. संबंधित व्यक्तीला रेल्वे पोलिसांनी ताब्यात घेतले आहे की त्याच्याविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली आहे, याबाबत अद्याप अधिकृत माहिती उपलब्ध झालेली नाही. काही दिवसांपूर्वी बोरिवली लोकलमध्ये झालेल्या प्रवाशाच्या हत्येची घटना ताजी असतानाच घडलेल्या या प्रकारामुळे मुंबई लोकलमधील प्रवाशांच्या सुरक्षेबाबतची चिंता अधिकच वाढली आहे. दररोज लाखो प्रवासी लोकलने प्रवास करत असल्याने रेल्वे सुरक्षा दल (आरपीएफ) आणि रेल्वे पोलिसांची गस्त अधिक प्रभावी करण्याची मागणी प्रवाशांकडून जोर धरत आहे. विशेषतः गर्दीच्या वेळेत मद्यधुंद आणि उपद्रवी प्रवाशांविरोधात तातडीने कारवाई करण्यासाठी सक्षम यंत्रणा उभारण्याची गरज या घटनेने पुन्हा अधोरेखित केली आहे.

### अखेरच्या प्रवासाला आसरा नाही!

यंत्रणेने वेळेत ठोस कारवाई केली नसल्यामुळेच आज अशी दुर्दैवी परिस्थिती ओढवली. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच कामातील कथित अनियमिततेस जबाबदार असलेल्या अधिकारी व संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल करावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. या घटनेमुळे रायगड जिल्ह्यातील ग्रामीण स्मशानभूमींच्या दुरवस्थेचा प्रश्न पुन्हा एकदा समोर आला असून, प्रत्येक स्मशानभूमीत संरक्षक शेडसह आवश्यक मूलभूत सुविधा तातडीने उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. दरम्यान, शेडच्या कामातील कथित अनियमितता तसेच करण्यात आलेल्या आरोपांबाबत संबंधित ग्रामपंचायत, प्रशासन किंवा आरोप करण्यात आलेल्या व्यक्तींची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही.

### उपसभापतीपदी सचिन अहिर बिनविरोध

भाजप नेते आणि मंत्री चंद्रकांत पाटील यांनी जगन्नाथ अभ्यंकर यांना अर्ज मागे घेण्याची विनंती केली. भाजपच्या विनंतीला मान देत ठाकरे गटाचे आमदार अनिल परब यांनी उमेदवारीचा प्रस्ताव मागे घेत असल्याचं सांगितलं. अनिल परब म्हणाले की, सभागृहाची इच्छा आहे की सर्वानुमते निवड व्हावी. त्यामुळे आम्ही जगन्नाथ अभ्यंकर यांच्या उमेदवारीचा अर्ज मागे घेत आहोत. त्यानंतर आवाजी मतदानाने सचिन अहिर यांची उपसभापती म्हणून निवड झाली. सचिन अहिर यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अभिनंदन केलं. सभागृहाचा मान राखत विरोधी पक्षांनी प्रस्ताव मागे घेतला त्याबद्दलही आभार मानले. तसंच उपसभापतीपदाच्या खुर्चीवर बसल्यावर प्रत्येकाला न्याय द्यायचा असतो आणि सचिन अहिर ते काम करतील असं फडणवीस म्हणाले.

### झोपेत असतानाच काळाचा घाला!

अचानक छतावरील स्लॅबचा काही भाग कोसळला. स्लॅबचा मोठा भाग सुरेश लोखंडे यांच्या छातीवर व शरीरावर पडल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला, तर काही भाग मुलीच्या अंगावर पडल्याने ती जखमी झाली. घटनेची माहिती मिळताच सोसायटीतील रहिवाशांनी दोघांना तातडीने रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी सुरेश लोखंडे यांना मृत घोषित केले. जखमी वेदिका लोखंडे हिच्यावर कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

दरम्यान, घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल आणि नवी मुंबई पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला असून पोलिसांकडून घटनेचा अधिक तपास सुरू आहे. या दुर्घटनेनंतर जुन्या इमारतींच्या संरचनात्मक सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, अशा इमारतींचे तातडीने स्ट्रक्चरल ऑडिट करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

### हेटवणे कालवा पूल चोरीचा उलगडा

गॅस कटरच्या साहाय्याने पुलांवरील लोखंडी साहित्य कापून चोरी करत असल्याची कबुली मयुर ढेणे याने दिली असून, चोरीचे साहित्य खोपोली व खारपाडा परिसरात विकल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. या कारवाईत पोलिसांनी सुमारे ५६ टन लोखंडी साहित्य (अंदाजे किंमत १७.९२ लाख रुपये) तसेच गुन्ह्यात वापरण्यात आलेली पिकअप आणि छोटा हत्ती ही दोन वाहने जप्त केली आहेत. उर्वरित आरोपींचा शोध सुरू असून, पुढील तपास गुन्हे प्रकटीकरण शाखेचे उपनिरीक्षक एस. व्ही. चव्हाण यांच्या पथकाकडून पोलीस निरीक्षक संदीप भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## कर्जवसुलीचा मुद्दा मांडणाऱ्या संचालकावर हल्ल्याचा प्रयत्न



### • चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

| रसायनी | प्रतिनिधी |

रायगड जिल्हा ग्रामसेवक सहकारी पतसंस्थेच्या मासिक सर्वसाधारण सभेत थकीत कर्जदारांकडून नियमानुसार कर्जवसुली करण्याची मागणी मांडणाऱ्या संचालक तथा वासांबे-मोहोपाडा ग्रुप ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी वैभव बाळकृष्ण पाटील यांच्यावर हल्ल्याचा प्रयत्न झाल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस पुढील तपास करत आहेत.

पोलिसांकडे दाखल तक्रारीनुसार, २८ जून रोजी पतसंस्थेच्या मासिक सर्वसाधारण सभेदरम्यान एका थकीत कर्जदाराच्या थकबाकीचा विषय चर्चेला आला होता. यावेळी संस्थेच्या मंजूर उपविधी आणि सहकार कायद्यानुसार थकीत कर्जाची वसुली करणे बंधनकारक असल्याची भूमिका संचालक वैभव पाटील यांनी मांडली.

सभेनंतर काही व्यक्तींनी सभास्थळाबाहेर त्यांचा मार्ग अडवत शिवीगाळ केली, दमदाटी केली, तसेच मारहाण करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या तक्रारीवरून चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

या घटनेबाबत वैभव पाटील म्हणाले, पतसंस्थेचा निधी सुरक्षित राहणे, थकीत कर्जाची कायदेशीर वसुली होणे आणि सभासदांच्या हिताचे संरक्षण करणे, हीच आमची भूमिका आहे. कायद्याच्या चौकटीत काम करणाऱ्यांवर दबाव आणण्याचे प्रकार सहन केले जाणार नाहीत. या प्रकरणाचा निष्पक्ष तपास करून दोषींवर कायद्यानुसार कठोर कारवाई व्हावी.

दरम्यान, या घटनेमुळे सहकार क्षेत्रात खळबळ उडाली असून, सहकारी संस्थांमधील आर्थिक शिस्त, थकीत कर्जवसुली, पारदर्शक कारभार आणि पदाधिकाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक


**पनवेल महानगरपालिका**
**धोकादायक/अतिधोकादायक इमारतींबाबत जाहीर सूचना**
**सन २०२६-२७**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २६४ ते २६८ मधील तरतुदी तसेच शासन संदर्भ विसआ-२१५/प्र.क्र.३४९/नवि-२०, दिनांक ०५ नोव्हेंबर, २०१५ नुसार व त्या अनुषंगाने पनवेल महानगरपालिकेने निश्चित केलेल्या कार्यपद्धती (एस.ओ.पी.) नुसार सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात कार्यक्षेत्रातील अतिधोकादायक व धोकादायक मिळकतीचे संबंधीत प्रभागामार्फत सर्वेक्षण करण्यात आले असुन, सर्वेक्षणाअंती प्रभाग समिती अ-४, प्रभाग समिती ब-२० प्रभाग समिती क-८, प्रभाग समिती ड-३२ अंतर्गत एकुण ६४ सी-१ या प्रवर्गात मोडणाऱ्या मिळकती जाहिर करण्यात आलेल्या आहेत. सदर इमारतीतील रहिवाश्यांना त्यांच्या सदनिका रिक्त करण्याकरीता महानगरपालिकेकडून वेळोवळी नोटिसद्वारे कळविण्यात आलेले आहे.

मा. उच्च न्यायालय, मुंबई तसेच राज्य शासनाने धोकादायक मिळकतीबाबत करावयाची कारवाईचे अनुषंगाने निर्गमित केलेल्या आदेशानुसार मुळ मालक/भोगवटादार यांना पुरेशी संधी देऊनही संबंधितांनी इमारत रिक्त करुन पाडण्याची कार्यवाही केली नाही तर या मिळकतीचा विद्युत पुरवठा व पाणी पुरवठा खंडीत करणे व त्यानुसार मिळकती पोलीसांमार्फत निर्मनुष्य करुन पाडण्याची कार्यवाही मनपामार्फत करण्यात येते.

तथापी काही मिळकतीमध्ये अजुनही नागरीक वास्तव्यास आहेत. पुढील कालावधीत पावसाळा सुरु होणार असून अतिवृष्टी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे धोकादायक व अतिधोकादायक इमारतीतील नागरीकांनी त्या इमारती त्वरीत रिकाम्या करुन, निर्मनुष्य करुन, बिना विलंब सदर अतिधोकादायक/धोकादायक इमारती स्वतःहुन सुरक्षितरित्या पाडण्याची कार्यवाही करावी. धोकादायक इमारत कोसळून काही दुर्घटना घडल्यास व त्यात जिवीत व वित्त हानी झाल्यास त्या बाबतची सर्वस्वी जबाबदारी इमारतीमध्ये वास्तव्य करणाऱ्या संबंधित नागरीकांची तसेच इमारतीचे मालक व भाडेकरु यांची राहील. त्याचप्रमाणे अतिधोकादायक मालमत्तांचे स्ट्रक्चरल ऑडीट (Structural Audit) करुन घेण्याची जबाबदारी संबंधित घरमालक/भोगवटादार यांची राहील. याकरीता महानगरपालिका जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी. अशा मोडकळीस आलेल्या धोकादायक/अतिधोकादायक इमारतींची यादी महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com या संकेतस्थळ (Website) प्रसिद्ध करणेत आलेली आहे. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांची जीवित व वित्त हानी टाळण्याच्या दृष्टीने जागरुक राहणे ही नागरीकांनचीही जबाबदारी आहे. त्यामुळे आपण सर्वजण जबाबदार नागरीक म्हणुन आपआपल्या परिसरातील इमारतीवर लक्ष ठेवून भविष्यातील दुर्घटना टाळण्यासाठी तातडीने धोकादायक अतिधोकादायक इमारती निर्मनुष्य करुन सुरक्षित स्थळी आपण रहिवास हलवून सहकार्य करावे. आपत्कालीन परिस्थितीत पुढील दुरध्वनी/Toll Free क्रमांकावर संपर्क साधावा.

दूरध्वनी क्रमांक : ०२२- ७४५८०४०/४१/४२
Toll Free क्रमांक: १८००-२२७-७०१

(मंगेश चितळे)
आयुक्त
पनवेल महानगरपालिका

पमपा/अ.बां.नि./२४२६/जा.क्र.१२०/२०२६
दिनांक : ०१/०७/२०२६



**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की,खालील प्रमाणे नमूद केलेल्या जमिन मिळकती बाबत आमचे अशिल श्री. सुनिल मनहर खडावाला रा. मुंबई यांचा सदर मिळकतीमध्ये मालकी हक्क, हितसंबंध व अधिकार निर्माण झालेला आहे. सदरच्या मिळकतींचे ७/१२ च्या उताऱ्या प्रमाणे मिळकतींचे वर्णन खालील प्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे घेरासुरगड, ता.रोहा, जि.रायगड**

| अ.क्र. | गट क्रमांक व उपविभाग | जमिन मालकाचे नावं | क्षेत्र हे.आर.पा. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १) | २४ | रीता जगदीश खडावाला वगैरे | ३.३५.०० | २.१७ |
| २) | २५ | रीता जगदीश खडावाला वगैरे | ०.०९.१० | ०.२३ |
| ३) | २७ | रीता जगदीश खडावाला वगैरे | ०.०३.०० | ०.१८ |
| ४) | २८ | रीता जगदीश खडावाला वगैरे | ०.१२.०० | ०.३० |
| ५) | २९ | रीता जगदीश खडावाला वगैरे | ०.०६.१० | ०.०८ |
| ६) | ३० | रीता जगदीश खडावाला वगैरे | ८.७१.०० | ५.५८ |
| ७) | ३६ | रीता जगदीश खडावाला वगैरे | ०.०५.१० | ०.२७ |
| ८) | ३७ | रीता जगदीश खडावाला वगैरे | ०.१३.१० | ०.५० |
| ९) | ३८ | रीता जगदीश खडावाला वगैरे | ०.०६.९० | ०.३० |
| १०) | ४२ | रीता जगदीश खडावाला वगैरे | ०.१५.२० | ०.२५ |
| ११) | ४३/अ | रीता जगदीश खडावाला वगैरे | ६.२७.०० | ४.६५ |
| १२) | ४३/ब | रीता जगदीश खडावाला वगैरे | ३.६७.०० | ३.०२ |
| १३) | ४४ | रीता जगदीश खडावाला वगैरे | ०.१०.१० | ०.१९ |
| १४) | ४५ | रीता जगदीश खडावाला वगैरे | १.८०.०० | १.३९ |
| १५) | ४६/१ | रीता जगदीश खडावाला वगैरे | ३.६०.०० | १.२० |
| १६) | ४७ | रीता जगदीश खडावाला वगैरे | ३.८०.०० | २.८० |
| १७) | ४८/अ | रीता जगदीश खडावाला वगैरे | ९.१२.०० | ६.८५ |
| १८) | ४८/ब | रीता जगदीश खडावाला वगैरे | ४.७६.०० | ३.३४ |
| १९) | ५३ | रीता जगदीश खडावाला वगैरे | ९.४४.०० | ५.७५ |
| २०) | ५५ | रीता जगदीश खडावाला वगैरे | ०.०२.८० | ०.४८ |
| २१) | ५६ | रीता जगदीश खडावाला वगैरे | ०.१३.१० | ०.९७ |
| २२) | ५७ | रीता जगदीश खडावाला वगैरे | ७.०८.०० | ४.७४ |
| २३) | ५९ | रीता जगदीश खडावाला वगैरे | ०.०६.८० | ०.८० |
| २४) | ६२ | रीता जगदीश खडावाला वगैरे | ०.०७.०० | ०.०६ |
| २५) | ६३ | रीता जगदीश खडावाला वगैरे | ०.०९.९० | ०.५२ |
| २६) | ६५ | रीता जगदीश खडावाला वगैरे | ०.०२.०० | ०.०२ |
| २७) | ६६ | रीता जगदीश खडावाला वगैरे | ०.१७.२० | ०.४७ |
| २८) | ६७ | रीता जगदीश खडावाला वगैरे | ०.०२.३० | ०.१९ |

तरी वर नमूद मिळकती बाबत अन्य कोणीही सदर मिळकतीच्या ७/१२ च्या उताऱ्यावर नावे असणाऱ्या व्यक्ती सोबत कोणताही व्यवहार, करार करु नये. कारण सदरच्या मिळकती बाबत मिळकतींच्या ७/१२ वरील नमुद व्यक्तीने सदर मिळकतींचा व्यवहार हा आमचे अशिलांन सोबत पुर्वीचे केलेला असून, त्या बाबतची वेगवेगळी कागदपत्र व दस्त हे आमचे आशिलांचे लाभांमध्ये लिहून दिलेले आहेत. त्या अन्वये सदरच्या मिळकतींमध्ये आमचे अशिलांचा मालक हक्क व हितसंबंध निर्माण झालेला आहे. त्यामुळे सदरच्या मिळकती बाबत मिळकतींच्या ७/१२ च्या उताऱ्यावरील नमुद व्यक्ती सोबत कोणीही कोणत्याही प्रकरचा व्यवहार करु नये. जर कोणीही सदरच्या मिळकतीं बाबत सदर व्यक्तीसोबत कोणताही व्यवहार केल्यास तो बेकायदेशीर व्यवहार होईल व आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. त्या प्रमाणे व्यवहार करणाऱ्या व्यक्ती या प्रमाणिक खरेदीवर राहणार नाहीत.
या उप्परही कोणत्याही व्यक्तींना सदरच्या मिळकतीं बाबत कोणताही व्यवहार केल्यास असा बेकायदेशीर व्यवहार रद्द करण्यासाठी आमचे अशिल हे दिवाणी दावे दाखल करतील. त्यावेळी त्यांचे होणाऱ्या परिणामांस व खर्चास सर्वस्वी खरेदी करणाऱ्या व्यक्तीच जबाबदार राहतील. याची नोंद घ्यावी.
येणे प्रमाणे सदरी जाहीर नोटीस असे.

ठिकाण :-पेण
दि. ०२/०७/२०२६

सही
**ॲड. नितीन हरिश्चंद्र पाटील**
पाटीलवाडा,महावीर मार्ग, पेण, ता.पेण, जि.रायगड.

# पनवेल स्थानकात ‘दमकोंडी’ प्रवास

■ तब्बल १२० पायऱ्यांची चढ-उतार

■ पादचारी पुलाची उंची वाढवल्याने दमछाक




| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल रेल्वे स्थानकात सध्या लाखो लोकल प्रवाशांना एका अजब आणि त्रासदायक समस्येचा सामना करावा लागत आहे. डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉरअंतर्गत दुमजली कंटेनर मालवाहू गाड्यांच्या सुलभ वाहतुकीसाठी रेल्वे प्रशासनाने पनवेल स्थानकातील नवीन पादचारी पुलाची उंची वाढवली आहे. रेल्वेचा हा तांत्रिक निर्णय मालवाहू गाड्यांसाठी फायदेशीर ठरला असला, तरी सर्वसामान्य प्रवाशांसाठी मात्र तो डोकेदुखी ठरला आहे. या वाढीव उंचीमुळे प्रवाशांना आता स्थानकात ये-जा करण्यासाठी चक्क १२० पेक्षा जास्त पायऱ्या चढाव्या आणि उतराव्या लागत आहेत. त्यामुळे पनवेलकरांना दमकोंडी प्रवासाला सामोरे जावे लागत आहे.

सध्या पनवेल रेल्वे स्थानक हे विविध समस्यांच्या गर्तेत अडकलेले आहे. त्याचा प्रचंड फटका या रेल्वेस्थानकातून प्रवास करणाऱ्या प्रवासी वर्गाला बसत आहे. त्यातच डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉरअंतर्गत दुमजली कंटेनर मालवाहू गाड्यांच्या सुलभ वाहतुकीसाठी रेल्वे प्रशासनाने पनवेल स्थानकातील नवीन पादचारी पुलाची उंची वाढवली आहे. रेल्वेचा हा तांत्रिक निर्णय मालवाहू गाड्यांसाठी फायदेशीर ठरत आहे. परंतु, सर्वसामान्य प्रवाशांसाठी मात्र तो डोकेदुखी ठरत आहे. या वाढीव उंचीमुळे प्रवाशांना आता स्थानकात ये-जा करण्यासाठी चक्क १२० पेक्षा जास्त पायऱ्या चढाव्या आणि उतराव्या लागत आहेत. या डोंगराएवढ्या पायऱ्यांमुळे दररोज प्रवास करणाऱ्या नोकरदारांची, विशेषतः ज्येष्ठ नागरिक, रुग्ण, गरोदर महिला आणि लहान मुलांची मोठी दमछाक होत आहे. अनेकांना धाप लागत असून, प्रवाशांमधून प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त होत आहे.

प्रवाशांचा हा वाढता त्रास पाहता, महाराष्ट्र रेल्वे प्रवासी महासंघाचे सल्लागार सुरेंद्र नेमळेकर यांनी या समस्येवर तातडीने तोडगा काढण्याची मागणी केली आहे. स्थानकात ज्येष्ठ नागरिक आणि रुग्णांची होणारी ससेहोलपट थांबवण्यासाठी रेल्वेने युद्धपातळीवर सरकते जिने आणि अत्याधुनिक उद्‌वाहकाची व्यवस्था करावी, असे नेमळेकर यांनी म्हटले आहे. तर दुसरीकडे, सामाजिक कार्यकर्ते ॲड. संजय गांगुर्डे यांनी या समस्येवर कायमस्वरूपी आणि सोपा उपाय म्हणून स्थानक परिसरात भुयारी मार्ग सुरू करण्याची आग्रही मागणी केली आहे, जेणेकरून प्रवाशांना उंचीवर चढण्याचा त्रास सहन करावा लागणार नाही. या संपूर्ण प्रकरणाची दखल घेत मध्य रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. स्वप्निल निला यांनी प्रवाशांना दिलासा देणारे संकेत दिले आहेत. प्रवाशांना होणारा त्रास आणि संघटनांनी केलेल्या मागण्या रास्त असून, यावर मध्य रेल्वे प्रशासन लवकरच सकारात्मक निर्णय घेईल, असे आश्वासन त्यांनी दिले आहे. आता रेल्वे प्रशासन हे आश्वासन कधी पूर्ण करते आणि लाखो पनवेलकरांची या १२० पायऱ्यांच्या चक्रव्यूहातून कधी सुटका होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

> मे २०१४ पासून रेल्वे प्रशासनाकडे मागणी केली होती की, पनवेल ते नवीन पनवेलचा भुयारी मार्ग चालू करा. परंतु, एका दगडाने वाट अडविल्याने रेल्वे प्रशासन तिकडे दुर्लक्ष करित आहे. आणि असे उंचच उंच पादचारी पूल बांधून रेल्वे प्रशासन प्रवाशांना त्रास देत आहे. रेल्वे प्रशासनाने महत्त्वाचे जंक्शन असलेल्या पनवेल स्थानकातील प्रत्येक फलाटावर सरकते जिने बसविलेच पाहिजेत, अशी आमाची मुख्य मागणी आहे.
>
> – ॲड. संजय गांगनाईक, सामाजिक कार्यकर्ते

> पनवेल रेल्वे स्थानकातील १२० पायऱ्यांचा पुल चढता-उतरताना लोकांची प्रचंड दमझाक होत आहे. हे पुल बांधताना रेल्वे प्रशासनाला सांगितले होते की, या पुलाऐवजी भुयारी मार्गाचे अपुर्ण काम पुर्ण करा. मात्र, तसे न करता आतापर्यंत दोन पुलांवर विनाकारण खर्च करण्यात आला. महाराष्ट्र रेल्वे प्रवासी महासंघातर्फे रेल्वे प्रशासनाला पत्र दिले होते. त्यात जो नव्याने पुल बनवला आहे तोच पुर्वेपासून पश्चिमेपर्यंत जोडा. परंतु, रेल्वे प्रशासनाने तसे केले नाही. त्यामुळे प्रवाशांना दोन्ही पुलावरील तब्बल १२० पायऱ्या चढ-उतार करत लाईन क्रॉस करून पलिकडे जावे लागत आहे. एखादा हृदय विकाराचा रूग्ण असेल, तर त्याला त्रास होऊ शकतो. याची काळजी रेल्वेने घेतली पाहिजे आणि या ठिकाणासह सर्वच फलाटांवर सरकते जिने बसविले पाहिजेत.
>
> – सुरेंद्र नेमळेकर, सल्लागार, महाराष्ट्र रेल्वे प्रवासी महासंघ

## पिंपळाचे झाड घरावर कोसळले

| नेरळ | प्रतिनिधी |

कळंबोली गावात मंगळवारी (दि.३०) झालेल्या मुसळधार पावसामुळे सुमारे ७० ते ७५ वर्षे जुने वड-पिंपळाचे झाड एका चाळीवर कोसळल्याची घटना घडली. या घटनेत चाळीतील घराचे व घरातील साहित्याचे मोठे नुकसान झाले आहे. सुदैवाने झाडाचा मुख्य भाग थेट घरावर न पडल्याने मोठी जीवितहानी टळली. सुनील भगत असे घर मालकाचे नाव असून, दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास हे झाड कोसळले. झाडाच्या मोठ्या फांद्यांमुळे एका खोलीचे छप्पर आणि भिंतींचे नुकसान झाले असून टीव्ही, फ्रिजसह इतर मौल्यवान वस्तूंचीही हानी झाली आहे. घटनेची माहिती अग्निशमन दलासह संबंधित प्रशासनाला देण्यात आली.

## निवडक



### शिव विद्या प्रबोधिनीचा शुभारंभ

**पनवेल :** रायगड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील होतकरू व गुणवंत विद्यार्थ्यांना भारतीय प्रशासकीय व भारतीय पोलीस सेवेत तसेच इतर केंद्रीय व राज्य स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवून देण्यासाठी शिव विद्या प्रबोधिनी बाळासाहेब ठाकरे आयएएस अकॅडमीच्या मोफत ऑनलाईन क्लासेसच्या प्रवेश मोहिमेचा पनवेलमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात शुभारंभ करण्यात आला. या मोहिमेचा शुभारंभ शिव विद्या प्रबोधिनीचे सर्वेसर्वा विजय कदम आणि शिवसेना ठाकरे गटाचे रायगड जिल्हा संपर्क प्रमुख प्रसाद भोईर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी अनिल चव्हाण, दिपक निकम, रामदास पाटील, समाधान काशिद, तसेच पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, पेण येथेही या प्रवेश मोहिमेचा कार्यक्रम उत्साहात पार पडला.



### सिडको वसाहतीतील भाग जलमय

**खांदा कॉलनी :** रात्रभर कोसळलेल्या पावसामुळे पनवेल महापालिका हद्दीतील सिडको वसाहतीमधील विविध सखल भागांमध्ये मोठ्या प्रमाणात पावसाचे पाणी साचले. अनेक अंतर्गत रस्ते जलमय झाल्याने वाहनचालकांना वाहतूक करताना मोठी कसरत करावी लागली. शाळा सुटण्याच्या वेळेतही अनेक ठिकाणी रस्त्यांवर पाणी साचल्याने विद्यार्थ्यांना व पालकांना मोठा त्रास सहन करावा लागला. काही ठिकाणी दुचाकी वाहने पाण्यात बंद पडल्याच्या घटनाही घडल्या. पाणी साचल्यामुळे वाहतुकीचा वेग मंदावला असून नागरिकांचे दैनंदिन जनजीवन विस्कळीत झाले. दरवर्षी पावसाळ्यापूर्वी महापालिकेकडून नालेसफाईची कामे केल्याचा दावा केला जातो. मात्र, पहिल्याच मुसळधार पावसात सखल भाग जलमय झाल्याने नालेसफाईच्या कामांच्या गुणवत्तेवर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नागरिकांनी तातडीने साचलेल्या पाण्याचा निचरा करण्याबरोबरच प्रभावी नालेसफाई व कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी महापालिका प्रशासनाकडे केली आहे.

### कामोठ्यात तंबाखूजन्य पदार्थ जप्त

**पनवेल :** बंदी घालण्यात आलेला पानमसाला व सुगंधी तंबाखू विक्री करणाऱ्या कामोठे येथील दोन पानटपऱ्यांवर अन्न व औषध प्रशासन तसेच कामोठे पोलिसांनी संयुक्त कारवाई केली. या कारवाईत २ हजार ९६८ रुपयांचा प्रतिबंधित साठा जप्त करण्यात आला आहे. अन्नसुरक्षा अधिकारी प्रियांका अडाले सांगण्यावरून वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयकुमार शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली खांदेश्वर रेल्वे स्थानकासमोरील रघुवीर पान शॉप आणि जय श्री श्याम पान येथे धाडसत्राची कारवाई करण्यात आली. शासनाने विक्रीस बंदी घातलेल्या विविध कंपन्यांच्या पानमसाला, सुगंधी तंबाखू व सुपारीचे एकूण ४४० पाऊच असा अंदाजे २ हजार ९६८ रुपयांचा साठा आढळून आला. पंचनाम्यानंतर हा संपूर्ण मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईत पान शॉप चालक अहमद (४०) आणि ओमप्रकाश सोलाटे (४२) या दोघांना ताब्यात घेऊन त्यांच्याविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# मुरूड शहर संघर्ष समिती आक्रमक

■ शहरातील मोरीचे काम थांबवले


(छायाचित्र : गणेश चोडणेकर)

| आगरदांडा | प्रतिनिधी |

मुरूड सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे मुरूड तवसाळकर लॉजच्या समोरील रस्त्याजवळ मोरीचे काम सुरू करण्यात आले होते. या कामाला अर्थसंकल्प निधीतुन २९.७३ लाख रुपये निधी मंजुर करण्यात आला होता. त्या अनुषंगाने या मोरीचे काम सब कॉन्ट्रॅक्टर मोन्नाक यांच्याकडून सुरू करण्यात आले आहे. मात्र, हे काम चुकीच्या पद्धतीने होत असल्याने दि.१६ जुन रोजी मुरूड शहर संघर्ष समिती व स्थानिक नागरिक एकत्र येऊन मोरीची पाहणी केली. त्यानंतर ते काम थांबविण्यात आले होते. तसेच, याबाबत अलिबाग सार्वजनिक बांधकाम विभाग, मुरूड सार्वजनिक बांधकाम विभाग, तहसीलदार व मुरुड जंजिरा नगरपरिषद मुख्याधिकारी यांना रितसर निवेदन देण्यात आले होते.

या निवदेनात, मोरीची उंची कमी करून, खोली व रुंदी वाढवावी अशी मागणी केली होती. तद्नंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने मात्र या निवेदना पैकी एकच मागणी मान्य केल्याचे निदर्शनास आले. सब कॉन्ट्रॅक्टर याने चार दिवसांपूर्वी पुन्हा या मोरीचे काम सुरू करून, मोरीची उंची फक्त कमी केली. त्यामुळे सब कॉन्ट्रॅक्टर या मोरीची रुंदी व खोली वाढवत नसल्याने बुधवारी (दि.१) मुरूड शहर संघर्ष समिती व स्थानिक नागरिक आक्रमक होऊन ते काम पुन्हा थांबविण्यात आले. यावेळी त्यांनी थेट सार्वजनिक बांधकाम विभागीय कार्यालयात धडक दिली. परंतु, इंजिनिअर उपलब्ध नसल्याने कार्यालयात उपस्थित असणाऱ्या अधिकाऱ्यांशी चर्चा करुन कनिष्ठ अभियंता अजित संगळे यांना भ्रमणध्वनी द्वारे मोरी संदर्भात चर्चा केली. या चर्चेमध्ये कॉन्ट्रॅक्टरला तात्काळ काम थांबविण्यात सांगून दोन दिवसांत स्वतः येऊन मोरीची पाहणी करून योग्य तो निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन देण्यात आले. यावेळी कुणाल सतविडकर, ललीत जैन, स्वप्निल कवळे, महेश कारभारी, ऋत्विक मकु, स्वप्निल कवळे, उदय पेटकर, विशाल कोलवणकर, सरपाटील, बाबु तांबुळकर, अरविंद गायकर आदिंसह संघर्ष समिती पदाधिकारी व स्थानिक नागरिक उपस्थित होते.



## टोरंटविरोधात तहसीलदारांना निवेदन

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यात होऊ घातलेला टोरंट जलविद्युत प्रकल्प रद्द करण्यात यावा, अशी मागणी शिवसेना ठाकरे गटाच्या महिला आघाडीच्यावतीने करण्यात आली आहे. याबाबतचे निवदेन त्यांनी तहसीलदार आणि प्रांत अधिकारी यांना दिले आहे. तसेच, शासनाला जागे करण्यासाठी शिवसेनेच्या ठाकरे गटाचा महिला आघाडी तर्फे तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा संतप्त इशाराही यावेळी देण्यात आला. पर्यावरण ऱ्हास करणाऱ्या जलविद्युत प्रकल्पाला कर्जत तालुक्यातून हद्दपार करा आणि कर्जत तालुक्यातील प्रदूषण मुक्त वातावरण कायम ठेवा, अशी मागणी करणारे निवेदन शिवसेना ठाकरे गटाच्यावतीने करण्यात आले. यावेळी ठाकरे गटाच्या तालुकाप्रमुख करुणा बडेकर, जिल्हा परीषद सदस्य सुनिता मोरे, पंचायत समिती सदस्य नमिता श्रीखंडे, हालिवली माजी सरपंच प्रमिला बोराडे, उपतालुका प्रमुख संगीता खडे, युवती सेना प्रमुख अर्चना म्हसे, कर्जत शहर प्रमुख योगिता डागा, मिरकुटे महिला विभाग संघटक आदी उपस्थित होते.

## खारघरमध्ये स्कूल बस खड्ड्यात

| पनवेल | प्रतिनिधी |

खारघर वसाहतीमधील सेक्टर-७ परिसरात महानगर गॅस कंपनीकडून भूमिगत गॅस वाहिनी टाकण्यासाठी सुरू असलेल्या खोदकामामुळे वाहतूक कोंडी झाली. त्याचवेळी स्कूल बस रस्त्यावरील खड्ड्यात अडकल्याने काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. फेज-१ परिसरात महानगर गॅस कंपनीकडून अनेक दिवसांपासून गॅस पाइपलाइन टाकण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खोदकाम करण्यात आले असून, काही ठिकाणी खड्डे उघडेच असल्याने नागरिकांना तसेच वाहनचालकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. या घटनेदरम्यान शाळेची बस खड्ड्यात अडकल्याने रस्त्यावर वाहनांच्या रांगा लागल्या आणि वाहतूक संथ झाली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. बसमधील विद्यार्थ्यांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले. स्थानिक नागरिकांनी संबंधित यंत्रणांकडे वारंवार तक्रारी करूनही रस्त्यांची योग्य दुरुस्ती होत नसल्याचा आरोप केला आहे. तसेच, खोदकाम पूर्ण झाल्यानंतर रस्ते तातडीने पूर्ववत करावेत आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

## रफिक रईस अहमद बेपत्ता

| पनवेल | प्रतिनिधी |

कळंबोलीतील तरुण हरविल्याची तक्रार पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. रफिक रईस अहमद (१९) असे या हरविलेल्या तरूणाचे नाव असून, त्याचा रंग गोरा, उंची ५ फुट ५ इंच, बांधा मध्यम, नाक सरळ लांब, डोळे मोठे, केस काळे लांब असून अंगात पांढऱ्या रंगाचा टी-शर्ट व काळ्या रंगाची जिन्स पॅन्ट आणि पायात काळ्या रंगाचे शुज घातलेले आहेत. या मुलाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी कळंबोली पोलीस ठाणे अथवा मपोना मथंना पाटील यांच्याशी संपर्क साधावा.



## खांदेश्वर मंदिर परिसर समस्यांच्या गर्तेत

| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |

खांदा कॉलनीतील ऐतिहासिक खांदेश्वर मंदिर परिसर विविध नागरी समस्येच्या गर्तेत सापडला आहे. या समस्या तात्काळ सोडवाव्यात, अन्यथा दि.१३ जुलै पासून मंदिराच्या प्रवेशद्वारासमोर बेमुदत अन्नत्याग आंदोलन करण्यात येईल, असा इशारा परिवर्तन सामाजिक संस्था महाराष्ट्रच्यावतीने महानगरपालिकेच्या आयुक्तांना देण्यात आला आहे. याबाबत संस्थेचे अध्यक्ष महादेव वाघमारे यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन सादर करण्यात आले.



या निवेदनात मंदिर परिसरातील तलावात अनेक वर्षांपासून साचलेला गाळ काढून तलाव स्वच्छ करणे, भग्नावस्थेतील कंपाउंड वॉलची दुरुस्ती करणे, उद्यानातील तुटलेले व खराब पत्रे बदलणे, वाढलेले गवत व झाडांच्या फांद्यांची छाटणी करणे, तसेच बंद असलेले सार्वजनिक शौचालय तात्काळ सुरू करणे, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. तसेच, मंदिरासमोर उभे असलेले फिरते शौचालय आणि मलनिस्सारणाच्या गाड्या हटवून परिसर स्वच्छ व सुस्थितीत ठेवावा. तसेच, मंदिराच्या प्रवेशद्वाराचे पुनर्बांधकाम करून भाविकांच्या सुरक्षिततेची योग्य व्यवस्था करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. संस्थेच्या म्हणण्यानुसार, खांदेश्वर मंदिरात दररोज मोठ्या संख्येने भाविक येत असतात. मात्र, परिसरातील दुर्लक्ष, अस्वच्छता आणि अपुऱ्या नागरी सुविधांमुळे भाविक व स्थानिक नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

## चोरीप्रकरणी तिघांना अटक

**पनवेल :** कळंबोली येथील इन्फ्युजन सेरेमनीज हॉलजवळ एका कंपनीच्या ॲल्युमिनियम प्लेट चोरीप्रकरणी कळंबोली पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सिंगलस्टार ॲंड कन्सर्ट कंपनीच्या कळंबोली येथील इन्फ्युजन सेरेमनीज पार्किंग क्रमांक १ जवळून १४ ॲल्युमिनियम प्लेट चोरीला गेल्या होत्या. या तपासात कुशी धरम सांकी (१९), राजेश अभय पवार (२१) आणि प्रेम अभय पवार (२०) यांना अटक करण्यात आली. चोरी गेलेल्या ३१ हजार रुपये किमतीच्या प्लेट जप्त करण्यात आल्या.

## पाण्याच्या निचऱ्याची तातडीने उपाययोजना

| नवी मुंबई | प्रतिनिधी |

नवी मुंबईतील उलवे नोड, सेक्टर १८ परिसरात पावसाळ्यात साचणाऱ्या पाण्याच्या निचऱ्याबाबत नागरिकांनी सिडको प्रशासनाकडे निवेदन सादर केले होते. या निवेदनाची दखल घेत सिडको प्रशासनाने तातडीने युद्धपातळीवर उपाययोजना राबविल्या आहेत. या कार्यवाहीमुळे परिसरातील पाणी साचण्याची समस्या कमी होण्यास मदत झाली असून, नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. या पार्श्वभूमीवर सेक्टर १८ मधील सर्व सहकारी गृहनिर्माण संस्थांच्यावतीने कार्यरत अनमोल जीवन वेल्फेअर असोसिएशन, तसेच शिवशंभो देवालय ट्रस्ट यांच्यावतीने परिसरातील रहिवाशांनी सिडको प्रशासनाचे आभार व्यक्त केले आहेत. सिडको नेहमीच नागरिकांच्या समस्या तत्परतेने सोडविण्यासाठी कटिबद्ध असून, भविष्यातही अशाच संवेदनशील व त्वरित कार्यपद्धतीद्वारे नागरिकांना दर्जेदार सेवा देण्याचा प्रयत्न सातत्याने सुरू राहील, असे सिडको प्रशासनाकडून सांगण्यात आले.




(छायाचित्र : राजेश डांगळे)

## रस्त्यावर पाणी साचल्याने वाहतूक कोंडी

| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |

दोन दिवस सुरू असलेल्या मुसळधार पावसाने बुधवारी (दि.१) देखील जोरदार हजेरी लावली. त्यामुळे खांदा वसाहतीतील मुख्य रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पावसाचे पाणी साचले. त्यामुळे वाहतुकीचा वेग मंदावून याठिकाणी काही काळ वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. त्यामुळे वाहनचालकांसह पादचाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. या घटनेची माहिती मिळताच पनवेल महानगरपालिकेचे आरोग्य निरीक्षक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांसह परिसराची पाहणी करून पाणी साचण्यामागील कारणांचा आढावा घेतला. साचलेल्या पाण्याचा तातडीने निचरा व्हावा आणि पुन्हा अशी परिस्थिती निर्माण होऊ नये, यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना संबंधित कर्मचाऱ्यांना देण्यात आल्या. सततच्या पावसामुळे जलनिस्सारण व्यवस्थेवर ताण आला असून, मुख्य रस्त्यावर पाणी साचल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. पावसाळ्यात वारंवार उद्‌भवणाऱ्या या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढावा, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी पनवेल महानगरपालिकेकडे केली आहे.

महाडमध्ये ‘कृषी दिंडी’ उत्साहात | कृषी महाविद्यालयाच्यावतीने कृषी दिन साजरा

# ‘जपुया माती, पिकवूया मोती’

| महाड | प्रतिनिधी |

हरित क्रांतीचे जनक माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त कृषी दिन साजरा केला जातो. या दिनाचे औचित्य साधून दापोलीतील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ संलग्न महाडमधील कृषी महाविद्यालयाच्यावतीने ‘‘कृषि दिंडी’’चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ‘‘जपुया माती, पिकवूया मोती’’ या घोषणांनी महाड शहर दणाणून गेले होते.

या दिंडीचा शुभारंभ सकाळी साडेसात वाजता महाड शहरातील ग्रामदैवत श्री विरेश्वर महाराज मंदिरातून शेकडो विद्यार्थी, शिक्षक, शेतकरी व नागरिकांच्या उपस्थितीत झाला. यावेळी निसर्ग संवर्धन, सेंद्रिय शेती व जलसंधारणाचे संदेश देणारे फलक व घोषणा देत ही दिंडी बाजारपेठ, बस स्थानक चौक, माता जिजाऊ उद्यान मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौकात पोहोचली. येथे छत्रपती शिवाजी महाराज व वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस अभिवादन करून विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांच्या समस्या, माती परीक्षण व पाणी परीक्षण या विषयांवर प्रबोधनात्मक पथनाट्य सादर केले.



यावेळी प्रमुख पाहुणे तहसीलदार महेश शितोळे यांच्यासह प्रमुख उपस्थिती महाड मंडळ कृषी अधिकारी लांडगे, वनक्षेत्रपाल भोसले, नगरसेवक प्रमोद महाडिक, प्रा.डॉ. वैभव गिम्हवणेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी उद्धव कोकाटे, प्रा. जगन्नाथ मोरे, प्रा.डॉ. विशाल बिरवटकर, प्रा. सविता यादव, प्रा. डॉ. राहुल डुंबरे, राजेंद्र जैतपाल, डॉ. रायकर, प्रा. प्रियंका तडकसे, प्रा. हेडाव, प्रा. मयुरी मोरे व कार्यक्रमाचे अध्यक्ष व्ही. जी. चिमणकर आदी मान्यवरांसह विद्यार्थी, शिक्षक आणि महाडकर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

त्यानंतर दिंडी श्रीराम मंदिर मार्गे ऐतिहासिक चवदार तळ्यावर पोहोचली. तेथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकास अभिवादन करून सहभागी नागरिकांना मोफत वृक्ष रोपांचे वाटप करण्यात आले व कार्यक्रमाचा समारोप झाला.

### सामाजिक ऋणनिर्देश सोहळा

१ जुलै पासून रोटरी इंटरनॅशनल व लायन्स क्लब्स इंटरनॅशनल या सेवाभावी आंतरराष्ट्रीय संस्थांचे नवीन वर्ष सुरु होत आहे. त्यामुळे वर्षभर समाजोपयोगी उपक्रम राबविल्याबद्दल रोटे. सुधीर मांडवकर, रोटे. जॉन्सन डिसोझा, रोटे. संतोष नगरकर, रोटे. चेतन पलांडे व लायन स्नेहा बुटाला या मान्यवरांचा सन्मानचिन्ह व वृक्ष रोप देऊन गौरव करण्यात आला.

# ‘बाई’चे सोडून जाणे...

विजया मेहता यांच्या जाण्याने मराठी रंगभूमीवरच्या एका समृद्ध विद्यापरंपरेची कुलगुरु आणि जणू विद्यापीठाची निर्माती काळाच्या पडद्याआड गेली आहे. मात्र दिलाशाची गोष्ट ही की, हे विद्यापीठ त्यांच्या असंख्य कलाकृतींमधून, प्रयोगांमधून आणि मुख्य म्हणजे त्यांनी घडवलेल्या कितीएक कलाकारांमधून अखंड पुढे वाहते आहे व राहील. हरेक माणसाच्या आयुष्याला मृत्यूची मर्यादा असते. पण मोठा कलाकार वा कलानिर्मिती करणारा ही मर्यादा ओलांडून अनेक पिढ्यांवर प्रभाव टाकणारे संचित निर्माण करतो. विजया मेहता या त्या मोठ्या कलाकारांपैकी एक होत्या. विजयाबाईंचा कलेतला प्रवास एखाद्या कादंबरीला शोभेल असा होता व खरे तर त्याच्यावरच एखादे उत्कृष्ट नाटक आणि सिनेमा निघू शकेल. त्यांचे वडील थिऑसॉफिकल सोसायटीचे सदस्य. काका वारकरी. इतके की त्यांच्या नावाने आजही भिवंडीमध्ये मठ उभा आहे व तिथे भजनकीर्तने होतात. लहानपण गिरगाव नावाच्या मराठी मध्यमवर्गाच्या पंढरीमध्ये गेले. त्यांचा जन्म १९३४ चा. त्यामुळे १९४२ ची चळवळ व पुढे मिळालेले स्वातंत्र्य यांचा संस्कार त्यांच्या शाळाकॉलेजच्या वयात त्यांच्यावर झाला. त्याच काळात त्या राष्ट्रसेवा दलात जात होत्या. कॉलेजच्या नाटकांमधून त्या रंगभूमीवर आल्या. गिरगावातल्या साहित्य संघाच्या नाटकांमधून कामे करू लागल्या. झुंझारराव, संशयकल्लोळ अशा जुन्या पठडीतल्या नाटकांपासून त्यांची सुरुवात झाली. याच काळात त्या खोटे यांच्या कुटुंबात लग्न करून गेल्या. तिथे त्यांचे पहिले अवस्थांतर घडले. पुढे मेहता यांच्या घरात सून म्हणून गेल्यानंतर मध्यमवर्गीय चौकटीतून त्यांनी वाळकेश्वरच्या उच्चभ्रू वातावरणात प्रवेश केला. या काळात राष्ट्रीय पातळीवर अल्काझीसारखे नाट्यगुरु आणि नंतर जर्मनीतील ब्रेख्त थिएटर या आंतरराष्टीय चळवळीशी त्या जोडल्या गेल्या. पण तरीही बाईंची मराठी मध्यमवर्गीय मूल्यांबद्दलची आस आणि त्यातली गुंतवणूक कायम राहिली. बराच काळ उच्चभ्रू व आंतरराष्ट्रीय स्तरावर राहूनही बाई बोलताना अतिशय उत्तम प्रवाही मराठीतच बोलत. त्यांच्या बोलण्यात खूप क्वचित इंग्रजी शब्द येत. मराठी माती, संस्कृती, भाषा यांच्याशी नुसत्या जोडलेल्या नव्हे तर किती घट्टपणे रुजलेल्या होत्या त्याचे ते निदर्शक होते.

## रंगायनची राणी माशी

वयाच्या अवघ्या एकविसाव्या वर्षी बाईंनी विजय तेंडुलकरांचे श्रीमंत नावाचे नाटक पहिल्यांदा दिग्दर्शित केले. ही कालची पोर आम्हाला काय शिकवणार असे त्यावेळी कोणाला वाटले नाही. किंबहुना, त्या नाटकाच्या तालमींमध्येच तेंडुलकर त्यांना बाई म्हणून हाक मारू लागले व कालांतराने मराठी नाट्यसृष्टीच्याच त्या बाई झाल्या. यातूनच पुढे रंगायन ही नाट्यचळवळ उभी राहिली. श्री. पु. भागवत, श्रीराम लागू, तेंडुलकर, अरविंद देशपांडे अशासारखे विविध क्षेत्रांमधील प्रतिभावान तरुण या चळवळीचे स्थापनकर्ते होते. पण बहुदा सुलभा देशपांडे यांनी एके ठिकाणी वर्णन केले आहे त्याप्रमाणे रंगायन नावाच्या या मधमाशांच्या पोळ्यात विजयाबाईंचा दिमाख हा राणीमाशीसारखा होता. तिथे त्या सर्वांच्या केंद्रस्थानी होत्या. सर्व काही त्यांच्याभोवती फिरत होते. नाटक म्हणजे काय याबाबत बराच काळ मराठी कलावर्तुळात एक ठराविक मर्यादित समज होती. आधी बराच काळ संगीत रंगभूमीचा दबदबा होता. नंतर मो. ग. रांगणेकरांची कौटुंबिक थाटाची नाटके आली. पण रंगायनने त्या पलिकडे जाणारी, वास्तवाला अधिक थेट भिडणारी नाटके आणली. मराठी नाट्यरसिकांचा अवकाश विस्तारला. ठराविक खलनायक, नायक पठडीतून नाटक बाहेर आले. माणसे व परिस्थितीचे विद्रूप चेहरे दिसू लागले. तेंडुकरांची मादी, गिधाडे किंवा शांतता कोर्ट चालू आहे ही नाटके त्याचे उदाहरण होती. मराठी रसिकांची नवी जाणीव घडवण्यासाठी त्याला अत्यंत विचित्र, वेगवेगळे आविष्कार पाहण्यासाठी त्यांची तयारी करून घेण्यासाठी रंगायनवाल्या पिढीने प्रचंड कष्ट केले. या कष्टांमुळेच मराठी नाटकाचे रोप जोमदारपणे उभे राहिले व विस्तारत गेले. नंतरच्या काळातली प्रायोगिक रंगभूमी ते दलित किंवा बंडखोर रंगभूमी हे सगळे मराठी नाट्यसृष्टीने सहज आपल्यात सामावून घेतले याचा पाया रंगायन व त्यासारख्या त्या काळातच्या चळवळींनी घातला. विजया मेहता या त्या चळवळीच्या मुख्य सूत्रधारांपैकी एक होत्या. रंगायन ही चळवळ काहीच वर्षांमध्ये फुटली तरी तिने दिलेल्या प्रेरणेने रंगभूमीवर लेखक, दिग्दर्शक, नट, नेपथ्यकार, संगीतकार अशा रंगकर्मींच्या कित्येक पिढ्या निर्माण झाल्या.

## उणीव जाणवेल

विक्रम गोखले, नाना पाटेकर, अशोक सराफ, सुहास जोशी, प्रतिमा कुलकर्णी, रीमा लागू, नीना कुलकर्णी यासारख्या असंख्य कलाकारांनी कृतज्ञतेने सांगावे, श्रीराम लागू, अनुपम खेर, नसिरुद्दिन शाह, शबाना आझमी, अमोल पालेकर अशांसारख्यांनी त्यांच्याविषयी अतीव आदराने बोलावे यामधूनच बाई नावाच्या विद्यापीठाची थोरवी कळते. नाटक म्हणजे नटांनी चोख पाठांतर करून आणि सीनसिनेरी मांडून सांगितलेली कथा नव्हे. तर तो एक पूर्ण अनुभव असायला हवा हे बाईंच्या दिग्दर्शनाचे सूत्र सांगता येईल. जयवंत दळवी यांचे बॅरिस्टर हे त्यांचे गाजलेले नाटक. ऐन तरुणपणी वैधव्य आलेली राधाक्का आणि तिच्याबाबत ममत्व वाटणारा बैरिस्टर अशी ही कथा. पण विजयाबाईंच्या रचनेमुळे, नटांच्या हालचाली, त्यांचे साद-प्रतिसाद यामुळे प्रयोग पाहणारे रसिक त्यात पूर्णांशाने ओढले जात. दूरदेशी गेलेल्या मुलांमुळे एकाकी जीवन जगणारे नाना व नानी संध्याछाया या नाटकातून मराठी माणसांच्या मनामनामध्ये अवतरले ते बाईंच्या याच किमयेमुळे. नंतरच्या काळात जयवंत दळवी यांच्यासोबत त्यांचे लेखक म्हणून विशेष सख्य जडले. त्यातून सावित्री, पुरुष इत्यादी नाटके रंगभूमीवर आली. पुरुष नाटकाने नाना पाटेकर नावाचा नट प्रसिद्ध पावला. दळवींकडून बाई नाटके लिहून घेतात असेही गमतीने त्यावेळी म्हटले जायचे. पण बाईंनी त्यापूर्वी व नंतर विविध प्रकारच्या कलाकृती केल्या. अनिल बर्वे या नक्षलवादी म्हटल्या गेलेल्या नाटककाराचे हमिदाबाईची कोठी त्यांनी केले. त्यात तवायफ आणि त्यांच्या कोठीवरचे जीवन प्रथमच रंगभूमीवर आले. दुसरीकडे त्यांनी महेश एलकुंचवार यांच्या वाडा चिरेबंदीसारख्या नाटकांचा अवकाश सजीव केला. काप गेले भोके राहिली प्रकारची जमीनदारी आणि त्याला लटकून असलेली एकत्र कुटुंबपद्धती यांचा संथ ऱ्हास दर्शवणारे हे नाटक. त्याची लय बाईंनी अचूक पकडली होती. ब्रेख्तच्या शैलीतील म्हणून त्यांनी अजब न्याय वर्तुळाचा केले. तेही चिं.त्र्यं. खानोलकर यांच्यासारख्या अवलिया कवीकडून लिहून घेतले. पुढच्या काळात शाकुंतल, मृच्छकटिक यासारख्या जुन्या संस्कृत नाटकांचा नव्याने शोधही त्यांनी घेतला व तेही प्रयोग चित्तवेधक झाले. बाईंचीही कोणतीही कलाकृती कधी फसली नाही. ती कमीअधिक यशस्वी झाली असेल. पण तिच्यातील नाट्य, कथनावरची पकड आणि नटांनी भरून काढलेला रिकामा अवकाश यांच्या परिणामात ती कधी कमी पडली नाही. नंतर बाई सिनेमात गेल्या तिथेही त्यांचे हे वैशिष्ट्य कायम राहिले. म्हणूनच स्मृतिचित्रे, पेस्तनजी असे भक्कम गोष्टी सांगणारे त्यांचे सिनेमे उत्कृष्ट वठले व पुरस्कार विजेते ठरले. आपल्या रोजच्या जगण्याच्या चौकटीपलिकडचे वास्तव पाहू शकण्याची दृष्टी घडवणारे अनेक लेखक, कलाकार गेल्या शतकात मराठीत होऊन गेले, त्यात बाईंचे नाव प्राधान्याने घ्यावे लागेल. अशा लोकांच्या योगदानातूनच मराठी हा एक सुबुध्द, प्रगत समाज म्हणून आकाराला आला. आज या समाजाची वीण उसवत असताना बाईंच्या जाण्याची उणीव प्रकर्षाने जाणवेल. विजयाबाईंना कृषीवल परिवाराच्या वतीने श्रद्धांजली.

विचार

# भारतीय तपास यंत्रणांची अनास्था

**एकविसाव्या शतकात जग डिजिटल आणि तांत्रिकदृष्ट्या वेगाने प्रगत होत असताना, गुन्हेगारीचे स्वरूपही आमूलाग्र बदलले आहे. आजचे गुन्हेगार सायबर स्पेस, डार्क वेब आणि अत्याधुनिक क्लृप्त्यांचा वापर करत आहेत. अशा वेळी गुन्ह्यांची उकल करण्यासाठी वैज्ञानिक पुरावे आणि आधुनिक तंत्रज्ञान हेच सर्वात मोठे शस्त्र असायला हवे; परंतु तपास यंत्रणांकडे नजर टाकल्यास अत्यंत निराशाजनक चित्र समोर येते.**




जनार्दन पाटील

केंद्रीय अन्वेषण ब्यूरो (सीबीआय) सारख्या देशातील सर्वोच्च तपास संस्थेपासून राज्यांच्या स्थानिक पोलिसांपर्यंत सर्वच स्तरांवर आधुनिक तंत्रज्ञान आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचा वापर करण्याबाबत कमालीची अनास्था आहे. याचा थेट परिणाम गुन्हे सिद्धतेच्या (कन्व्हिक्शन रेट) सुस्तावलेल्या प्रमाणावर होत आहे. त्यामुळे गुन्हेगारांचे मनोबल वाढत आहे आणि सर्वसामान्य नागरिकांचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास डळमळीत होत आहे. ‘नॅशनल क्राईम रेकॉर्ड्स ब्यूरो (एनसीआरबी)च्या वार्षिक अहवालातील आकडेवारीवर नजर टाकली, तर भारतातील गुन्हे सिद्धतेच्या प्रमाणातील भीषण वास्तव स्पष्ट होते. प्रगत देशांमध्ये गुन्हे सिद्ध होण्याचे प्रमाण ८० ते ९० टक्क्यांच्या घरात असते. भारतात मात्र बहुतांश गंभीर गुन्ह्यांमध्ये हे प्रमाण अवघ्या ४० ते ५० टक्क्यांच्या आसपास रेंगाळताना दिसते. महिलांवरील अत्याचार, सायबर गुन्हे आणि आर्थिक फसवणुकीच्या प्रकरणांमध्ये तर हा दर अत्यंत खालावला आहे. ‘एनसीआरबी’च्या आकडेवारीनुसार, दरवर्षी लाखो गुन्हे दाखल होतात; परंतु त्यातील केवळ काही हजार प्रकरणांमध्येच गुन्हेगारांना शिक्षा होऊ शकते. उर्वरित प्रकरणांमध्ये पुराव्यांचा अभाव किंवा तपासातील त्रुटींमुळे आरोपी न्यायालयातून सहज सुटून जातात. या अपयशाचे मुख्य कारण म्हणजे भारतीय तपास यंत्रणा आजही ‘थर्ड डिग्री’, मौखिक साक्षीदार आणि जुनाट पद्धतींवर विसंबून आहेत. त्या आधुनिक न्यायालयात टिकू शकत नाहीत. न्यायालयीन प्रक्रियेत आता केवळ परिस्थितीजन्य किंवा मौखिक पुराव्यांना महत्त्व उरलेले नाही. आजच्या न्यायव्यवस्थेला वैज्ञानिक अचूकता हवी असते. डीएनए चाचणी, डिजिटल फॉरेन्सिक, सायबर मॅपिंग, अत्याधुनिक बॅलिस्टिक विश्लेषण आणि फॉरेन्सिक ऑडिटींग यांसारख्या साधनांमुळे गुन्हेगाराला पळ काढता येत नाही.

या पार्श्वभूमीवर भारतातील सर्वोच्च तपास यंत्रणा मानली जाणारी ‘सीबीआय’ देखील या साधनांचा वापर अत्यंत मर्यादित स्वरूपात करते. एखादा हाय-प्रोफाइल गुन्हा घडल्यानंतर तपासाची सूत्रे ‘सीबीआय’कडे दिली जातात; परंतु ही संस्थादेखील अनेकदा राजकीय दबावाखाली किंवा अंतर्गत समन्वयाच्या अभावामुळे आधुनिक तंत्रज्ञानाचा वेळेत वापर करू शकत नाही. परिणामी, तपासाला प्रचंड उशीर होतो आणि तोपर्यंत गुन्ह्याच्या ठिकाणचे महत्त्वाचे वैज्ञानिक पुरावे नष्ट झालेले असतात. तपास यंत्रणांच्या या वैज्ञानिक दुर्लक्षामागे अनेक मूलभूत आणि संरचनात्मक कारणे आहेत. सर्वात मोठे कारण म्हणजे पायाभूत सुविधांची प्रचंड टंचाई. भारतात लोकसंख्येच्या आणि गुन्ह्यांच्या प्रमाणाच्या तुलनेत ‘फॉरेन्सिक लॅबोरेटरीज’ची (एफएसएल) संख्या बोटावर मोजण्याइतकी आहे. राज्यांच्या फॉरेन्सिक लॅबमध्ये हजारो गुन्ह्यांचे नमुने वर्षानुवर्षे धुळखात पडलेले असतात. एखादा रक्ताचा नमुना किंवा व्हीआयपी प्रकरणातील डिजिटल पुरावा तपासण्यासाठी महिन्यांचा, कधी कधी वर्षांचा कालावधी लागतो. ‘एनसीआरबी’च्या अहवालातही ही बाब अधोरेखित झाली आहे, की प्रयोगशाळांमधील प्रलंबित प्रकरणांमुळे न्यायालयांमधील खटले लांबणीवर पडतात आणि शेवटी पुराव्यांची गुणवत्ता खराब झाल्यामुळे आरोपीला संशयाचा फायदा मिळतो.

दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे मानवी संसाधनांची कमतरता आणि योग्य प्रशिक्षणाचा अभाव. ‘सीबीआय’ आणि राज्य पोलिस दलात तांत्रिक तज्ज्ञांची आणि सायबर फॉरेन्सिक विश्लेषकांची हजारो पदे रिक्त आहेत. तपासाचे काम पाहणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यांना सायबर गुन्हे किंवा आधुनिक वैज्ञानिक पद्धतींचे अद्ययावत प्रशिक्षणच दिले जात नाही. अनेकदा आयटी कायद्याच्या कलमांखाली गुन्हे दाखल केले जातात; परंतु ‘आयपी अ‍ॅड्रेस ट्रॅक’ करणे, ‘क्लाउड डेटा रिकव्हर’ करणे किंवा ‘ब्लॉकचेन’ तंत्रज्ञानाद्वारे झालेल्या आर्थिक फसवणुकीचा माग काढणे स्थानिक पोलिसांच्या आवाक्याबाहेरचे असते. त्यामुळे तपास अधिकारी सोप्या आणि पारंपरिक वाटा निवडतात. त्या गुन्हेगारांना निर्दोष सोडवण्यास मदत करतात. या संदर्भात नोकरशाही आणि प्रशासकीय अनास्थादेखील जबाबदार आहे. आधुनिक तंत्रज्ञानाची खरेदी, ‘सॉफ्टवेअर लायसन्स’चे नूतनीकरण आणि प्रयोगशाळांचे आधुनिकीकरण यांसाठी मिळणारा सरकारी निधी लालफितीच्या कारभारात अडकून पडतो. अत्याधुनिक पेगासस किंवा तत्सम सायबर साधनांच्या वापराबद्दल राजकीय वाद निर्माण होतात; परंतु गुन्हेगारांचा छडा लावण्यासाठी आवश्यक असलेल्या मूलभूत सॉफ्टवेअर्सची खरेदी वेळेवर होत नाही. यामुळे गुन्हेगार पोलिसांपेक्षा चार पावले पुढे राहतात. ‘एनसीआरबी’ची आकडेवारी हेदेखील दर्शवते, की सायबर गुन्ह्यांमध्ये दरवर्षी प्रचंड वाढ होत आहे. आर्थिक फसवणूक, डेटा चोरी आणि ऑनलाइन ब्लॅकमेलिंगचे प्रमाण गगनाला भिडले आहे; मात्र या गुन्ह्यांमध्ये दोषसिद्धीचे प्रमाण देशात सर्वात कमी आहे.

डिजिटल पुरावे न्यायालयात सादर करताना भारतीय साक्ष कायद्याच्या कलम ६५ (बी) नुसार आवश्यक असणारे प्रमाणपत्र गोळा करण्यात आणि ते कायदेशीररीत्या सिद्ध करण्यात तपास यंत्रणा अपयशी ठरतात. तांत्रिक कौशल्याअभावी गोळा केलेले डिजिटल पुरावे न्यायालयात टिकत नाहीत, कारण ते हाताळताना पुरेशी काळजी घेतली जात नाही. त्यामुळे डेटा ‘टॅम्पर’ (छेडछाड) झाल्याचा संशय निर्माण होतो. या परिस्थितीचा थेट परिणाम देशाच्या अंतर्गत सुरक्षेवर आणि अर्थव्यवस्थेवर होत आहे. जेव्हा मोठ्या आर्थिक घोटाळ्यांमधील आरोपी किंवा दहशतवादी कारवायांचे सूत्रधार वैज्ञानिक पुराव्यांच्या अभावामुळे सुटतात, तेव्हा संपूर्ण व्यवस्थेच्या विश्वासार्हतेपुढे प्रश्नचिन्ह निर्माण होते. सामान्य माणसाला वाटते, की कायदा केवळ गरिबांसाठी आहे आणि श्रीमंत आणि तांत्रिकदृष्ट्या प्रगत गुन्हेगार या व्यवस्थेच्या त्रुटींचा फायदा घेऊन सहज सुटू शकतात.

‘सीबीआय’ने देशात एक आदर्श निर्माण करणे अपेक्षित असताना ही संस्थादेखील अनेकदा पारंपारिक चौकशीच्या फेऱ्यातच अडकून पडलेली दिसते. या गंभीर समस्येवर मात करायची असेल, तर केवळ कायदे बदलून चालणार नाही, तर तपास यंत्रणांची मानसिकता आणि कार्यपद्धती बदलावी लागेल. ‘स्मार्ट पोलिसिंग’च्या केवळ घोषणा करण्याऐवजी प्रत्येक पोलिस ठाण्यात आणि तपास संस्थेत ‘फॉरेन्सिक विंग’ अनिवार्य केली पाहिजे. ‘सीबीआय’सारख्या संस्थांना स्वतंत्र बजेट देऊन त्यांच्या अंतर्गत अद्ययावत फॉरेन्सिक आणि सायबर सायन्स विंगची स्थापना युद्धपातळीवर करणे गरजेचे आहे.

येत्या काळात फॉरेन्सिक सायन्स विद्यापीठांमधून बाहेर पडणाऱ्या तरुण तज्ज्ञांना थेट तपास यंत्रणांमध्ये सामावून घेतले पाहिजे. त्यामुळे तपासाला तांत्रिक गती मिळेल. गुन्ह्याचे ठिकाण (क्राईम सीन) सुरक्षित ठेवण्याबाबत पोलिसांमध्ये कडक शिस्त असणे आवश्यक आहे. बऱ्याचदा पहिल्या काही तासांमध्येच महत्त्वाचे वैज्ञानिक पुरावे नष्ट होतात. यासाठी प्रत्येक जिल्ह्यात अत्याधुनिक मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन उपलब्ध असणे गरजेचे आहे. त्यामुळे गुन्ह्याची माहिती मिळताच तज्ज्ञ तात्काळ घटनास्थळी पोहोचू शकतील. लोकशाही व्यवस्थेचा पाया केवळ कायद्याच्या अस्तित्वावर उभा नसतो, तर कायद्याची प्रभावी आणि निष्पक्ष अंमलबजावणी करणाऱ्या न्यायव्यवस्थेवर अवलंबून असतो. न्यायालयाने दिलेला निकाल हा न्यायाचा अंतिम टप्पा असला, तरी त्या निकालाचा पाया तपास यंत्रणांनी गोळा केलेल्या पुराव्यांवर उभा असतो. तपासच अपुरा, निष्काळजी किंवा वैज्ञानिक दृष्टिकोनाविना झाला, तर न्यायालयासमोर सत्य सिद्ध करणे कठीण होते. परिणामी, गुन्हेगार सुटतात आणि निरपराध व्यक्तींवर अन्याय होण्याची शक्यता वाढते. म्हणूनच गुन्हेगारी तपास ही केवळ प्रशासकीय प्रक्रिया नसून न्यायव्यवस्थेची जीवनरेषा आहे. भारतात गेल्या काही वर्षांमध्ये गुन्हेगारी तपासासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यावर भर देण्यात आला आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), डीएनए विश्लेषण, डिजिटल फॉरेन्सिक, चेहरा ओळख प्रणाली, स्वयंचलित फिंगरप्रिंट ओळख प्रणाली, सायबर विश्लेषण यांसारखी साधने तपास यंत्रणांच्या सेवेत उपलब्ध झाली आहेत. या तंत्रज्ञानामुळे गुन्हेगारांचा शोध घेणे, घटनास्थळावरील पुराव्यांचे विश्लेषण करणे आणि तपासाची दिशा निश्चित करणे अधिक अचूक आणि वेगवान होऊ शकते; मात्र तंत्रज्ञान उपलब्ध असणे आणि त्याचा प्रभावी वापर होणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत.

चर्चा आजची

# विकासाच्या नावाखाली देशाची कुर्बानी

संतोष राऊळ

जगात भारत देश असा एकमेव देश असेल ज्या ठिकाणचे नागरीक आपल्या देशासह राज्य, प्राणी, पक्षी, नदी, भाषा, जमिन या सर्वांना आपली माता मानतो. परंतु, आपण त्यांना माता मानतो खरे, पण त्यांच्यासाठी करतो काय? असा प्रश्न काही सामाजिक कार्यकर्त्यांमधून उपस्थित केला जात आहे. सद्या भारत देशाची प्रचंड बिकट परिस्थिती आहे. देशात प्रचंड प्रमाणात प्रदुषण वाढलं आहे. त्याचा भीषण परिणाम प्राणीमात्रांवर होत आहे. या प्रदुषणाला अनेक गोष्टी कारणीभुत आहेत. त्यात देशात विकासाच्या नावाखाली निसर्गाची कुर्बानी दिली जात आहे. भविष्यात अशीच परिस्थिती कायम राहिली, तर जगाच्या नकाशावर फक्त भारत नावाशीवाय दुसरं काहीच शिल्लक राहणार नाही, अशी भीती सामाजिक कार्यकर्त्यांमधून वर्तविली जात आहे.

सध्या देशात मोठ्या प्रमाणावर विकास कामे सुरू आहेत. प्रत्येक देशाचा विकास होणे अत्यंत गरजेचे आहे. परंतु, त्या विकासाच्या नावाखाली निसर्गाची छेडछाड कशाला? भारतातील प्रत्येक नागरीक आपल्या देशाला माता मानतो. पण, आजच्या फोडाफोडीच्या राजकारणामुळे त्याचं मातेचा अपमान होत आहे. ज्या मातेने राजे, योद्धे, सरदार, क्रांतीवीर, हुतात्मे पाहिले त्याच मातेवर लाचारी पाहायची वेळ आली आहे. जो देश ब्रिटीशांसी शेवटपर्यंत लढला तो देश आज आपल्याच नेत्यांसमोर लाचार होऊन रडत आहे, अशी सद्यपरिस्थिती आहे. भारत देशात लोकशाही असली, तरी काही वर्षांत पुन्हा हुकुमशाही होण्याची शक्यता जाणकारांकडून वर्तविली जात आहे. कदाचित त्या दिवसापर्यंत या देशात कोण जगेल की नाही, याची देखील कोणालाच शाश्वती नाही.

देशात हवा आणि पाण्याचे मोठ्या प्रमाणात प्रदुषण होत आहे. त्यात दिवसेंदिवस वाढ होत आहे. त्याचे भयंकर परिणाम युरोपमध्ये दिसत आहेत. भारत देशातील नागरिकाने कमाल ४५ सेल्सिअस पर्यंत तरी तापमान सहन केले असेल. परंतु, युरोपात मात्र ३० सेल्सिअसच्यावर तापमान गेले आणि शेकडो लोकांनी प्राण गमावले. ज्या देशाने कधी उन्हाळाच पाहिला नव्हता त्या देशात ३०-३५ च्या वर तापमान जात असेल, तर त्या समोर भारत देश काय आहे? दिवसेंदिवस अनेक बदल भारताच्या हवामानात होताना दिसत आहे. त्याला सर्वात मुख्य कारण म्हणजे विकासाच्या नावाखाली होणारी प्रचंड झाडांची कत्तल. त्यामुळे गर्मी वाढत असून, पावसाळा देखील पुढे मागे होत आहे. त्यामुळे पाऊस हवा असेल तर झाडे अत्यंत गरजेची आहेत. जी विकासाच्या नावाखाली झाडे तोडली जात आहेत ती पुर्णपणे न तोडता ती झाडे स्थलांतरीत करणे गरजेचे आहे. काहीवेळा त्या झाडांऐवजी दुसऱ्या कुठल्या तरी जागेत रोपे लावली जातात. मात्र, एक-दोन दिवासाच्या दिखाव्यानंतर ते रोप जगतय की मरतय हे पाहायला देखील तिथे कोणी जात नाही. त्यानंतर पुथ्वीच मुळं म्हणजे जमिन आणि डोंगर. त्यानांच आज प्रचंड मागणी असून, विकासाच्या नावाखाली त्यांचाच सर्वाधिक बळी जात आहे.



देशातील बहुतांश ठिकाणी डोंगरच्या डोंगर फोडण्यात आले आहेत. त्यामुळे त्या डोंगरावरील जीवसृष्टी संपूर्ण नष्ट झाली आहे. तसेच, त्या डोंगरावरील माती आणि दगडांचा वापर करून जमिनींवर भराव केला जात आहे. त्यामुळे मानवासह इतर सजीवांचा मुळ जमिनीशी देखील संपर्क तुटत चालला आहे. भरावासह सिमेंट काँक्रिटची जंगले आणि प्लास्टिकच्या कचऱ्याने जमिनीचा बहुतांश भाग व्यापून घेतला आहे. त्यामुळे जमिनीचे मोठ्या प्रमाणावर प्रदुषण होत आहे. झाडांच्या कत्तलीमुळे देखील जमिनीचा ऱ्हास होत आहे.

त्यानंतर भारत देशातील नागरिक येथील नद्यांना देखील माता मानतो. पण घरातला सर्व कचरा तिच्यात अर्पण करतोय. देवाच्या नावाने समुद्रात किंवा नदीत टालके जाणारे खाद्य पदार्थ, प्लास्टिकच्या वस्तू, देवांचे फोटो आणि मूर्ती, हार, फुलं आणि फळं या सारख्या अनेक गोष्टी नदीत टाकतो. तसेच, कंपन्यांमधले सांडपाणी देखील सर्रासपणे या नदींच्या पात्रात सोडले जाते. त्याचा विपरीत परिणाम मानवाच्या आरोग्यासह पाण्यातील जीवांवरही होतो. त्यातच कंपन्यांमधून निघणारा धूर हवा प्रदुषण करतो. या हवा प्रदुषणाचा परिणाम तर संपूर्ण पृथ्वीवर होत आहे.

भारतातील अनेक ठिकाणी याचा विपरित परिणाम जनसामान्य भोगत आहेत. उदाहरण द्यायचे झाले तर, दिल्लीचे देता येईल. भारताची राजधानी असूनही सर्वात दुषीत तिच आहे. त्याच ठिकाणी बड्या नेत्यांचे वास्तव्य आहे. जो फुटला तो दिल्लीत सापडला, अशी सद्यपरिस्थिती आहे. तिथेच आपले पंतप्रधान देखील आहेत. तरीदेखील त्यांना दुषित झालेली दिल्ली दिसत नाही हे विशेष. त्यामुळे त्यांना इतर ठिकाणचे प्रदुषण कसे दिसेल, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. सध्या विकासाच्या नावाखाली देशाची कुर्बानी देत आहोत. भविष्यात अशीच परिस्थिती कायम राहिली, तर जगाच्या नकाशावर फक्त भारत नावाशीवाय दुसरं काहीच शिल्लक राहणार नाही, अशी भीती सामाजिक कार्यकर्त्यांमधून वर्तविली जात आहे.

लोकसंसद

## व्हॉट्सॲपवर आता ‘यूजरनेम’!

जगभरात कुठेही असलेल्या व्यक्तीशी क्षणभरात संवाद साधता येणे, मजकुरासोबतच फोटो, व्हिडिओ, डॉक्युमेंट्स इत्यादी सहजतेने पाठवता येणे आणि सुरक्षित संवाद पद्धत यामुळे आजच्या घडीला व्हॉट्सॲप हे केवळ एक मेसेजिंग ॲप राहिले नसून आपल्या दैनंदिन जीवनाचा एक अविभाज्य भाग बनले आहे. मात्र जगभर व्हॉट्सॲपचा वापर जसजसा वाढत गेला (जगभरात तीन अब्जाहून अधिक वापरकर्ते आहेत) तसतसा वापरकर्त्यांच्या गोपनीयतेचा आणि सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. यासाठीच वापरकर्त्यांची गोपनीयता अधिक सुरक्षित करण्यासाठी व्हॉट्सॲपने नुकतीच 'युझरनेम' या मोठ्या फीचरची अधिकृतपणे घोषणा केली आहे. आता व्हॉट्सॲपवर चॅट 'यूजरनेम'ने सुरु होईल, त्यामुळे यापुढे व्हॉट्सॲपवर कोणाशीही संवाद साधण्यासाठी किंवा ग्रुपमध्ये जोडले जाण्यासाठी स्वतःचा वैयक्तिक मोबाईल नंबर देण्याची गरज भासणार नाही. या फीचरमुळे जेव्हा एखादी व्यक्ती एखाद्या नवीन व्यक्तीशी किंवा ग्रुपमध्ये पहिल्यांदा जोडली जाईल, तेव्हा त्या व्यक्तीचा मोबाईल नंबर नवीन व्यक्तीला दिसणार नाही. त्या नवीन व्यक्तीला समोरच्या व्यक्तीचा फक्त युझरनेम दिसेल. तसेच अनोळखी लोकांनी युझरनेम शोधून थेट मेसेज करू नये म्हणून व्हॉट्सॲपने 'युझरनेम पिन' हे ऐच्छिक फीचरही आणले आहे. जोपर्यंत अनोळखी व्यक्ती तो ४ अंकी पिन टाकणार नाही तोपर्यंत समोरील व्यक्तीला तो नवीन मेसेज पाठवू शकणार नाही. हे फीचर टप्प्याटप्प्याने सुरू केले जाणार असून येणाऱ्या काही महिन्यांत ते सर्वांसाठी उपलब्ध केले जाणार आहे.

– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी

## मुलांच्या ऑनलाइन सुरक्षेसाठी आदर्श निर्णय

मलेशिया सरकारने १६ वर्षांखालील मुलांना सोशल मीडियावर खाते उघडण्यास बंदी घातलीय, मीडियाला वय पडताळणी बंधनकारक केलीय आणि नियम मोडणाऱ्या कंपन्यांवर भरगच्च दंडाची शिक्षा शिवाय खोटी माहिती दिल्याबद्दल पालकांवर कठोर कारवाईची तरतूद करणे, हे अत्यंत स्वागतार्ह पाऊल म्हणावयास हवे आहे. आज मुलांना खेळ, खेळणी आणि खाऊ यापेक्षा सोशल मीडिया अधिक आवडते झालेले आहे हेच जिकडे जिकडे पाहण्यात येते. सोशल मीडियाच्या या वाढत्या व्यसनामुळे मुलांचे मानसिक आरोग्य, शिक्षण आणि सुरक्षितता धोक्यात येत असताना अशा कठोर उपाययोजना काळाची गरज आहेत. मुलांच्या हिताला प्राधान्य देणारा हा निर्णय इतर देशांसाठीही अनुकरणीय ठरावा, अशी अपेक्षा आहे.

– विश्वनाथ पंडित, ठाणे

दिनविशेष

# जागतिक यूएफओ दिन

अज्ञात उडणाऱ्या वस्तूंच्या (UFO) अस्तित्वाबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी दरवर्षी २ जुलै रोजी जगभरात जागतिक UFO दिन साजरा केला जातो. हा दिवस पहिल्यांदा २४ जून रोजी साजरा करण्यात आला. १९४७ मध्ये, केनेथ अर्नोल्डच्या सुप्रसिद्ध यूएफओ दिसण्यामुळे ही तारीख निवडण्यात आली. नंतर ही तारीख २ जुलैपर्यंत पुढे ढकलण्यात आली. कारण २ जुलै हा दिवस १९४७ च्या रोसवेल घटनेचा वर्धापन दिन आहे. यूएफओच्या इतिहासात रोझवेलची घटना महत्त्वाची आहे. जुलै १९४७ मध्ये अमेरिकेतील न्यू मेक्सिकोमध्ये रोझवेलजवळ एक रहस्यमय वस्तू कोसळली तेव्हा ही घटना घडली. तथापि, लोकांचा असा विश्वास आहे की ते एक परग्रही अंतराळयान होते. या घटनेने बरेच लक्ष वेधले आणि अनेक सिद्धांतांना जन्म दिला. UFO म्हणजे हे Unidentified Flying Object चे संक्षिप्त रूप आहे. गेल्या काही वर्षांत चळवळीने गती घेतली आहे. UFO जागतिक दिन हा आपला संदेश पसरवण्यासाठी आणि जगभरातील लोकांच्या कल्पनाशक्तीला मोहित करण्यासाठी एक व्यासपीठ बनला आहे. UFO दन हा जीवनाच्या सर्व स्तरातील व्यक्तींना एकत्र येऊन अज्ञात उडणाऱ्या वस्तूंभोवतीच्या रहस्यांचा शोध घेण्याची संधी प्रदान करतो. विविध कार्यक्रम, चर्चा आणि सहभागाद्वारे, हीचळवळ मने उघडण्याचे आणि अर्थपूर्ण संवादासाठी एक व्यासपीठ तयार करण्याचे उद्दिष्ट ठेवते, असे UFO जागतिक दिन वेबसाइट म्हणते. असंख्य व्यक्तींनी या वस्तू पाहिल्याचे नोंदवले आहे आणि डिस्क-आकाराचे UFO, त्रिकोणी UFO, सिगारआकाराचे UFO, गोलाकार UFO, आयताकृती, अग्निगोला आणि अंडी असे विविध आकार वर्णन केले आहेत. जागतिक दिनाबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी अनेक संस्था जागरूकता पसरवतात आणि बद्दल ज्ञान निर्माण करण्यासाठी शैक्षणिक चर्चा आणि कार्यक्रम आयोजित करतात. यूएफओ दिनाचे महत्त्व हा दिवस आणि बाह्य अवकाशातील बुद्धिमान प्राण्यांच्या निःसंशय अस्तित्वाबद्दल जागरूकता पसरवण्यासाठी पाळला जातो. या दिवसाचे एक उद्दिष्ट म्हणजे परग्रही आणि परग्रही प्राण्यांच्या दुसऱ्या जगाच्या अस्तित्वावर विश्वास ठेवणाऱ्या लोकांमध्ये सौहार्द आणि एकता साजरी करणे आहे. या दिवशी गटातील सदस्यांनी परग्रही प्राण्यांच्या अस्तित्वाबद्दल सादर केलेल्या पुराव्यांचा आढावा घेतला जातो. तसेच, जागतिक दिन साजरा करण्यामागील प्रमुख उद्देश म्हणजे जगभरातील सरकारांना पाहण्याबद्दल आणि संबंधित माहितीबद्दल माहिती देण्यासाठी प्रोत्साहित करणे. हा दिवस प्रत्येकासाठी थांबून आपण विश्वात एकटे नाही आहोत या शक्यतेवर विचार करण्यासाठी समर्पित आहे.

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। RGD/016/2026-2028
१९३७-२०२६ ९० वर्षे



### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२ जुलै

१) श्री.पुरूषोत्तम दत्तात्रेय साठे श्रीबाग-२, अलिबाग, दि.२-७-१९५०

२)श्री.हनुमंत ज्ञानदेव पालेकर रामनाथ, अलिबाग दि.२-७-१९५३

३)श्री.संजय द्वारकानाथ जोशी ब्राम्हणआळी, अलिबाग दि.२-७-१९५७

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८
**(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५
**(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**कै. दगडू बना काळे ( चणेवाले), ५ वे पुण्य स्मरण, चोंढी, अलिबाग**

## आदेश तवटे यांचे अपघाती निधन

**। सुतारवाडी । प्रतिनिधी ।**



रोहा तालुक्यातील जामगाव येथील रहिवासी आदेश गणपत तवटे यांचे अपघाती निधन झाले. ते निधनासमयी ४७ वर्षांचे होते. नोकरीनिमित्त ते डोंबिवली येथे राहत होते. सकाळी कामावर जात असताना अज्ञात वाहनाने त्यांना ठोकर देऊन वाहनचालक पसार झाला. यावेळी ते अत्यंत गंभीर जखमी झाले होते. महिनाभर मृत्यूशी झुंज देत अखेर २९ जून रोजी त्याचा मृत्यू झाला. त्याचे दहावे मंगळवार दि.७ जुलै रोजी तर उत्तरकार्य गुरुवार दि. ९ जुलै रोजी त्यांच्या राहत्या घरी होणार आहेत. त्याच्या पश्चात पत्नी, दोन मुले, आई, तीन भाऊ, एक बहीण असा परिवार आहे.

# नेरळ फाटकात खड्ड्यांचे साम्राज्य

## ● रस्ता दुरुस्तीबाबत रेल्वे, बांधकाम विभाग ठरले निष्फळ

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**कर्जत तालुक्यातील महत्वाचा रस्ता असलेल्या कर्जत–कल्याण राज्यमार्ग रस्त्यावरील माथेरान मिनी ट्रेनचे फाटक असलेल्या ठिकाणी रस्त्यावर प्रचंड खड्डे पडले आहेत. नेरळ–माथेरान मिनी ट्रेन सध्या बंद आहे. परंतु, नेरळ पेट्रोल पंप येथील फाटकाजवळ पडलेले खड्डे कोणत्याही वाहन चालकाला चुकवता येत नाहीत. दरम्यान या भागातील हे खड्डे मध्य रेल्वे प्रशासनाने सिमेंट काँक्रीटीकरण बुजवण्याचे काम न केल्यामुळे मागील वर्षाप्रमाणे रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य आहे.**



कर्जत–कल्याण राज्यमार्ग रस्त्यावर नेरळ पेट्रोल पंप भागातून नेरळ–माथेरान–नेरळ मिनी ट्रेनची मार्गिका आहे. या ठिकाणी असलेल्या रेल्वे फाटक येथील डांबरी रस्ता खराब झाला आहे. या ठिकाणचा रस्ता पावसाळा सुरू होण्याआधी खराब झाला असून सार्वजनिक बांधकाम खात्याने या रस्त्याकडे दुर्लक्ष केल्याने रस्ता आधीच खड्डेमय झाला होता. त्यात आता पावसाळा सुरू झाल्याने खड्डे पडलेल्या भागात आणखी खड्डे पडले असून नॅरोगेज ट्रॅकवरील रस्ता वाहतुकीस अडथळा ठरत आहे. उन्हाळ्यापासून रेल्वे फाटक परिसरातील रस्ता खराब झालेला असताना देखील तो सुस्थितीत करण्यात रेल्वे आणि बांधकाम विभाग निष्फळ ठरले आहेत. त्यामुळे वाहनचालक यांनी मोठी नाराजी व्यक्त करीत रस्त्याची सुधारणा करण्याची मागणी वारंवार केली होती. मात्र कोणत्याही सरकारी यंत्रणेने रस्त्याकडे लक्ष दिले नाही. त्यामुळे आता वाहनचालकांची त्या भागातील रस्त्यांवरील खड्डे चुकवताना कसरत होत आहे.

वाहनचालकांना होणारा त्रास कमी करण्यासाठी रस्त्याची सुधारणा करावी, अशी मागणी जोर धरत आहे. पावसाचा जोर कमी झाल्यानंतर रेल्वेकडून त्या भागात खड्डे भरण्याची कार्यवाही व्हावी, अशी मागणी मानवाधिकार कार्यकर्ते गोरख शेप यांनी रेल्वे आणि सार्वजनिक बांधकाम खात्याकडे केली आहे.

### वाहनांचा वेग मंदावला

पावसाळ्यात त्या ठिकाणी गतवर्षी पेक्षा अधिक खोलगट खड्डे बनले आहेत. त्यामुळे दोन्ही बाजूंची वाहने ही रेल्वे फाटक परिसरात अगदी धीम्या गतीने पुढे सरकत आहेत. त्या खड्ड्यांमुळे वाहनांचा वेग मंदावला असून रेल्वे प्रशासनाने त्या ठिकाणी तात्काळ उपाययोजना करावी, अशी मागणी वाहनचालक करीत आहेत.



## फार्मर कप स्पर्धेचे थेट प्रक्षेपण

**चिरनेर :** सत्यमेव जयते फार्मर कप २०२६ स्पर्धेचा सोमवारी (दि.२९) डिजिटल शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाला. त्या राज्यस्तरीय उद्घाटन सोहळ्याचे थेट प्रक्षेपण चिरनेर ग्रामपंचायत कार्यालयात देखील शेतकऱ्यांना दाखविण्यात आले. या कार्यक्रमाला उरण तालुक्यातील जवळपास २५ पानी फाउंडेशन अंतर्गत फार्मर कप गट सहभागी झाले होते. सामूहिक शेती सहभागाचे महत्त्व, शाश्वत शेती पद्धती, नोंदणी उद्दिष्ट व निकष यांच्या माध्यमातून स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून, शेतकरी एकत्र येऊन गट तयार करून व संघटित होऊन शेती करण्याचा मुख्य उद्देश या स्पर्धेचा असून, याबाबत चर्चा व शेतकऱ्यांना माहिती देण्यात आली. यावेळी कृषी विभागाचे अधिकारी, कर्मचारी व शेतकरी उपस्थित होते.

## कायदेविषयक जनजागृती शिबीर

### दिवाणी न्यायाधीश मा. एस.पी. वानखेडे यांची विशेष उपस्थिती

**। उरण । प्रतिनिधी ।**



उरण तालुका विधी सेवा समिती तसेच उरण तालुका वकील संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने फुंडे येथील तु. ह. वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालयात विविध विषयांवरील कायदेविषयक जनजागृती शिबीर पार पडले.

कार्यक्रमात उरण बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. किशोर धनाजी ठाकूर यांनी बालमजुरीविरोधी जागतिक दिनानिमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी बालमजुरीविषयी जनजागृती करण्याची गरज, प्रत्येक मुलाला शिक्षणाचा मूलभूत अधिकार मिळणे, बालमजुरीचे निर्मूलन करण्यासाठी समाज, शासन व विविध संस्थांची भूमिका तसेच मुलांच्या सुरक्षित आणि सन्मानजनक बालपणाचे संरक्षण करण्याचे महत्त्व याविषयी सविस्तर माहिती दिली. त्यांनी बालमजुरीची प्रमुख कारणे आणि त्यावरील उपाययोजनांवरही प्रकाश टाकला.

त्यानंतर ॲड. गीता पाटील यांनी अमली पदार्थांचे व्यसन आणि अवैध तस्करीविरोधी आंतरराष्ट्रीय दिनानिमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तर ॲड. सोनल वार्डे यांनी विश्व पर्यावरण दिनानिमित्त पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले.

## एकल मातांच्या हस्ते वटवृक्षाचे रोपण

### अहिल्यानगरात पुरोगामी उपक्रम

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

अहिल्यानगर शहरातील नगर–कल्याण रोडवर असलेल्या वर्धमान महावीर कॅम्पसजवळील वृंदावन कॉलनी येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील कृष्णाली व कृष्णप्रित वेल्फेअर फाउंडेशनचे अध्यक्ष प्रशांत पाटील शेळके यांच्या संकल्पनेतून, याच परिसरात एकल माता भगिनींच्या हस्ते वटवृक्षाचे रोपण करून वटपौर्णिमा साजरी करण्यात आली.

भौगोलिकदृष्ट्या महत्त्वाच्या आणि गजबजलेल्या या भागात वृक्षारोपण करून फाउंडेशनने



समाजातील वंचित, उपेक्षित आणि संघर्षमय जीवन जगणाऱ्या एकल मातांना सन्मानाचे स्थान दिले, तसेच या परिसरात पर्यावरण संवर्धनाचा एक नवा आणि सकारात्मक संदेश पोहोचवला. या उपक्रमाप्रसंगी विविध क्षेत्रांतील अनेक मान्यवरांनी आपली उपस्थिती दर्शवली.

परंपरा आणि आधुनिक सामाजिक जाणीव यांची सांगड घालत स्त्री सन्मानाला नवा आयाम देण्याचा हा उपक्रम समाजासाठी एक प्रेरणादायी आदर्श ठरत आहे. समाजात अनेकदा एकल माता भगिनींना संघर्ष, उपेक्षा आणि सामाजिक दबावाला सामोरे जावे लागते; मात्र त्यांना केवळ सहानुभूतीची नव्हे तर सन्मानाची गरज आहे, या विचारातून या उपक्रमाची संकल्पना साकारण्यात आली.

> **वटपौर्णिमा हा सण केवळ परंपरा म्हणून साजरा करण्यापेक्षा त्याला सामाजिक आणि पर्यावरणीय जबाबदारीची जोड देणे आवश्यक आहे. समाजातील एकल माता भगिनींना सन्मान देत पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्याचा आमचा प्रयत्न आहे.**
> **– प्रशांत पाटील शेळके, अध्यक्ष, कृष्णाली व कृष्णप्रित वेल्फेअर फाउंडेशन**

## कविसंमेलनाचे आयोजन

**खरोशी :** काव्यप्रेमी मंच पेण आणि कोमसाप पेण यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय कविसंमेलन आयोजित करण्यात आले असून त्याची बैठक नुकतीच पेण येथे पार पडली. या बैठकीत संमेलन अध्यक्ष म्हणून रायगड भूषण एल.बी पाटील यांची निवड करण्यात आली. संमेलनात दिपक गावंड यांच्या निसर्ग गीत माला व शिवाज्ञा आरती संग्रह या दोन पुस्तकांचे प्रकाशन होणार आहे. हे संमेलन दि.५ जुलै रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत पार पडणारे महात्मा गांधी वाचनालय पेण येथे पार पडणार आहे.

# सुरेश सकपाळ यांना पुरस्कार प्रदान

### ● १०१ वेळा रक्तदान करण्याचा विक्रम

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील खडपी–गांजवणे येथील सुरेश सकपाळ यांचा १०१ वेळा रक्तदान करण्याचा विक्रम पूर्ण झाला असून त्यांनी अनेक रक्तदान शिबिरांचे यशस्वी आयोजन केले आहे. शांतीदूत परिवार, डॉ. डी. येस फाऊंडेशनतर्फे पत्रकार भवन पुणे येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात लोकराजा छत्रपती शाहू महाराज प्रेरणा पुरस्कार प्रदान करुन सुरेश गणपत सकपाळ यांया सर्वश्रेष्ठ रक्ताचा म्हणून सन्मान करण्यात आला.



पोलादपूर तालुक्यातील ग्रामीण भागातील युवकांना रक्तदान करण्यासाठी प्रेरित करणारे गांजवणेतील सुरेश सकपाळ यांच्या तरुण मुलाचे बारा वर्षांपूर्वी कर्करोगाने निधन झाले. पुत्रवियोगाच्या मानसिक धक्क्यातून त्यांनी स्वतःला सावरले आणि विविध आजार अपघातातील रुग्णांना रक्ताची तातडीची गरज असल्याचे लक्षात घेऊन ते रक्त कोणत्याही कारखान्यात अथवा प्रयोगशाळेत उत्पादित केले जात नाही, म्हणून त्यांनी सामाजिक बांधिलकी म्हणून जास्तीत जास्त वेळा रक्तदान करण्याचे ठरवले.

सुरेश सकपाळ यांनी त्यांच्या सुजय फाउंडेशनच्या माध्यमातून अनेकवेळा रक्तदान शिबिरांचे आयोजनातून रक्त गोळा करून गरजूंना रक्तपुरवठा केला आहे. सुरेश सकपाळ यांनी १०१ वेळा रक्तदान करून रक्तदात्यांसमोर आदर्शवत विक्रम केला. यामुळे रक्तदान क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल व सामाजिक क्षेत्रातील भरीव कामगिरीमुळे त्यांना लोकराजा छत्रपती शाहू महाराज प्रेरणा पुरस्कार पत्रकार भवन पुणे येथे प्रदान करण्यात आला.

## तटकरे महाविद्यालयात कृषी दिन

**तळा :** तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे द.ग तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालयातील भूगोल विभागाच्या वतीने बुधवारी (दि.०१) कृषी दिन हा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक भूगोल विभाग प्रमुख प्रा. डॉ.राजाराम थोरात यांनी केले. या कार्यक्रमासाठी प्रमुख व्याख्याते म्हणून महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन, सन्माननीय पुरुषोत्तम मुळे लाभले. त्यांनी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची ऐतिहासिक व राजकीय पार्श्वभूमी तसेच त्यांचे कृषी क्षेत्रातील हरितक्रांती व शेती विकासातील महत्त्वपूर्ण योगदान यांचे महत्त्व पटवून दिले. तसेच रायगड जिल्ह्याला पूर्वी भाताचे कोठार म्हणून ओळखले जात होते. परंतु, आज शहराकडे मोठ्या प्रमाणावर होणारे स्थलांतर तसेच शेतीमध्ये श्रम करण्याची उदासीनता या कारणामुळे भात शेती खालील क्षेत्र मोठ्या प्रमाणावर घटले असून पडीत जमिनीचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे युवकांनी आधुनिक सेंद्रिय शेतीकडे वळावे असे आवाहन विद्यार्थ्यांना केले. तसेच महाविद्यालयाचे प्रा. डॉ. नानासाहेब यादव यांनी कृषी क्षेत्राचे अर्थव्यवस्थेतील योगदान व आजच्या युवकांची भूमिका याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**प्रकल्पाबाबत शासनाची सकारात्मक भूमिका | मंत्री संजय शिरसाट यांची माहिती**

# मनमाडमध्ये उभारणार भव्य ‘भीमसृष्टी’

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मनमाडच्या ऐतिहासिक भूमीत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे जतन आणि समाज परिवर्तनाच्या कार्याला प्रेरणा देणारी भव्य ‘भीमसृष्टी’ उभारण्यासाठी शासन सकारात्मक आहे. तर हा प्रकल्प गुणवत्तापूर्ण आणि वेळेत पूर्ण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जाईल, अशी ग्वाही सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी दिली.

मनमाड येथील भीमसृष्टी उभारण्यासंदर्भात सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्या शासकीय निवासस्थानी आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी प्रकल्पाच्या विविध पैलूंवर सविस्तर आणि सकारात्मक चर्चा करण्यात आली. यावेळी विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, सहसचिव सोमनाथ बागुल यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

यावेळी सामाजिक न्याय मंत्री शिरसाट म्हणाले की, मनमाड ही भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी असून, त्यांच्या असंख्य आठवणी या ठिकाणी आहेत. त्या जपण्यासाठी तसेच बाबासाहेबांच्या विचारांचा आणि समाज परिवर्तनातील त्यांच्या महान कार्याचा गौरव करण्यासाठी शासन कटिबद्ध असून, ‘भीमसृष्टी’ प्रकल्पाच्या उभारणीबाबत शासनाची भूमिका सकारात्मक आहे.

नाशिक जिल्ह्यातील मनमाड शहराला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याशी असलेला ऐतिहासिक आणि वैचारिक संबंध लक्षात घेऊन येथे भव्य ‘भीमसृष्टी’ उभारण्याची संकल्पना साकारण्यात येत आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार, सामाजिक न्याय, समता आणि बंधुतेची मूल्ये पुढील पिढीपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रस्तावित प्रकल्पामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा, प्रेरणादायी स्मारक, भगवान गौतम बुद्ध स्मारक, अत्याधुनिक विपश्यना केंद्र, सभागृह, लँडस्केपिंग, पार्किंग तसेच नागरिकांसाठी विविध सुविधा उभारण्याबाबत चर्चा करण्यात आली.

तसेच बैठकीत प्रकल्पासाठी आवश्यक जागा, प्रशासकीय प्रक्रिया, निधी उपलब्धता आणि प्रभावी अंमलबजावणी यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांशी सविस्तर आढावा घेण्यात आला.

हा प्रकल्प वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्यासाठी आवश्यक त्या कार्यवाहीला गती देण्याचे निर्देश मंत्री शिरसाट यांनी

### प्रेरणास्थान म्हणून विकसित होणार

मनमाड नगर परिषद, लोकप्रतिनिधी आणि संबंधित विभागांच्या समन्वयातून हा प्रकल्प साकारल्यास मनमाड हे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे प्रेरणास्थान म्हणून विकसित होईल. तसेच सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात राज्यातील एक महत्त्वपूर्ण केंद्र म्हणून उदयास येईल, असेही मंत्री शिरसाट यांनी यावेळी सांगितले.

# निवडक



## हक्कांसाठी लढण्याचा निर्धार

**माणगाव :** महाराष्ट्र राज्य वीज कामगार सेवानिवृत्त महासंघाची राज्यस्तरीय पदाधिकाऱ्यांची सभा गोरेगाव येथे पार पडली. या सभेला रायगडसह राज्यातील विविध भागांतून मोठ्या संख्येने सेवानिवृत्त कर्मचारी, अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते. गोरेगाव येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. सभेत संघटक मंत्री चंद्रकांत नेणे यांनी संघटनेच्या कार्याचा आढावा घेत, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या हक्कांसाठी संघटित राहण्याचे महत्त्व अधोरेखित केले. देशातील एकमेव नोंदणीकृत सेवानिवृत्त वीज कामगार महासंघ अधिक सक्षम करण्यासाठी प्रत्येक सभासदाने सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन त्यांनी केले. महामंत्री पहाडे यांनी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांवर सखोल मार्गदर्शन केले. एनएमआर कर्मचाऱ्यांपासून ते मुख्य अभियंत्यांपर्यंत विविध स्तरांवरील कर्मचाऱ्यांना निवृत्तीनंतर येणाऱ्या अडचणी, प्रलंबित लाभ, पेन्शन, ग्रॅज्युइटी आणि इतर हक्कांसाठी महासंघाने केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचा त्यांनी आढावा घेतला. यावेळी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी महासंघाचा लढा भविष्यातही अधिक जोमाने सुरू राहील, असा निर्धार व्यक्त केला.

## ‘विकसित भारत’विषयी परिसंवाद

**उरण :** कोकण ज्ञानपीठ उरण महाविद्यालयातील वाणिज्य तसेच अकाउंटिंग फायनान्स विभागातर्फे ‘विकसित भारत २०४७’ या विषयावर अखिल भारतीय स्तरावर इ–कॉन्फरेन्सचे आयोजन करण्यात आले होते. या इ–कॉन्फरेन्सचे उद्घाटन नागालँड विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.जगदीश कुमार पटनाईक यांनी केले. तर यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. इ. वायूनंदन हे विशेष अतिथी म्हणून लाभले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाल्मिक गर्जे यांनी या इ–कॉन्फरेन्सची आवश्यकता सांगून आयोजनाचे महत्व सांगितले. याप्रसंगी जेएनयु दिल्ली येथील डॉ. अरविंद एलरी यांनी या प्रसंगी आपली भूमिका विशद केली. या परीसंवादास संशोधक विद्यार्थ्यांनी भरघोस प्रतिसाद दिला असून एकूण १४७ संशोधन पेपर प्राप्त झाले. काही विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट सादरीकरण केले. याकामी डॉ. कुलदीप शर्मा, डॉ. मृदुल निळे, डॉ. मंदार चौधरी, डॉ. उपेंद्र चौधरी, डॉ. चंद्रमोहन जोशी, डॉ. सुरेश मैद्य, डॉ. देविदास गेल्हार हे पॅनलिस्ट म्हणून लाभले. परीसंवादाची सांगता बनारस विद्यापीठातील डॉ. तेज प्रताप सिंग यांच्या भाषणाने झाली. अध्यक्ष कपिल पाटील व प्राचार्य डॉ. वाल्मिक गर्जे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या कॉन्फरेन्सचे सूत्रसंचालन डॉ. हन्नत शेख यांनी केले.



## तलोशी गाव जिल्ह्यात प्रथम

**महाड :** महाड तालुक्यातील तलोशी गावाने संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान अंतर्गत उल्लेखनीय कामगिरी करत रायगड जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. ग्रामस्थ, ग्रामपंचायत, महिला बचत गट, युवक मंडळे तसेच विविध सामाजिक संस्थांनी एकत्रितपणे केलेल्या स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि जनजागृतीच्या उपक्रमांमुळे तलोशी गावाला हा मान मिळाला आहे.गावात नियमित स्वच्छता मोहीम, कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, वृक्षारोपण, प्लास्टिकमुक्त गाव उपक्रम तसेच नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यात आली. या सर्व बाबींची दखल घेत परीक्षक समितीने तलोशी गावाची प्रथम क्रमांकासाठी निवड केली. गावाने मिळविलेल्या या यशामुळे महाड तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. या यशामुळे गावकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून ग्रामपंचायत पदाधिकारी, कर्मचारी आणि सर्व ग्रामस्थांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



## घरोघरी जाऊन विद्यार्थ्यांचा सन्मान

**खांब :** रोहा तालुक्यातील मुठवली खु. येथील दहावी बारावी परीक्षेत पास झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सन्मान सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या गावचे सुपुत्र व उद्योजक सामाजिक कार्यकर्ते महेश तुपकर यांच्या संकल्पनेतून व जय भवानी मित्र मंडळ मुठवली खु. या मंडळाचे पदाधिकारी व सदस्य यांच्या सहकार्याने हा गुणगौरव सोहळा प्रत्येक विद्यार्थ्यांच्या घरोघरी जाऊन करण्यात आला. यावेळी सामाजिक कार्यकर्ते महेश तुपकर, मा. उपसरपंच योगेश शिंदे, किर्तनकार राम महाराज सावंत, हिराजी शेळके, दिपक तुपकर, रामचंद्र शेळके, रोशन शिंदे, पियुष शिंदे, आदित्य डाके, लक्ष्मण भोसले व पालकवर्ग उपस्थित होते. सामाजिक कार्यकर्ते महेश तुपकर हे नेहमीच सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून समाजात विविधांगी उपक्रम राबवून समाजासाठी काहीतरी करीत आले आहेत. तर त्यांच्या माध्यमातून गावातील गुणवंत विद्यार्थ्यांचा करण्यात आलेला सन्मान हा अतिशय स्तुत्य असा उपक्रम आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थी वर्गाला निश्चितच अधिक प्रेरणा मिळेल, असे माजी उपसरपंच योगेश शिंदे यांनी सांगितले.

## शैक्षणिक साहित्याचे वाटप

**खांब :** मुंबई येथील उद्योजक दिलिप पोतनीस यांच्या माध्यमातून शैक्षणिक साहित्य वाटपाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब संचलित श्रमिक विद्यालय चिल्हे येथील गरजू विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सुविधेसाठी उद्योजक दिलिप पोतनीस यांनी हे शैक्षणिक साहित्य वाटप केले. यापुढेही विद्यालयाच्या बाबतीत आपली सहकार्याची भूमिका कायमच ठेवणार असल्याचे त्यांनी सांगितले. चेअरमन महेंद्र पोटफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या कार्यक्रमाप्रसंगी मुख्याध्यापक दिपक जगताप, सहा.शिक्षक संजय आंधळे, शिवनाथ दराडे, महेंद्र जवरत, अमित डाके, सुनील थिटे, पांडुरंग शिद, अनुराधा मोरे, ज्योत्स्ना सबरदंडे आदी उपस्थित होते. उद्योजक दिलिप पोतनीस यांच्या सेवाभावी वृत्तीबद्दल मुख्याध्यापक दिपक जगताप यांनी त्यांचे आभार व्यक्त करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# माणगावमध्ये नव्या पूलाला भेगा


**| माणगाव | प्रतिनिधी |**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील माणगाव शहरातील काळ नदीवरील नव्याने बांधण्यात आलेला पूल आणि त्यालगतचा रस्ता गंभीर अवस्थेत असल्याचे समोर आले असून, पुलाच्या दोन्ही बाजूंचा भराव खचल्याने नागरिक आणि वाहनचालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पुलाच्या दक्षिण व उत्तर बाजूस मातीचा भराव बसल्याने महामार्गावर ठिकठिकाणी भेगा, खड्डे आणि खचलेले भाग दिसून येत आहेत. त्यामुळे भविष्यात मोठा अपघात घडण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

स्थानिकांच्या मते, पुलाचे बांधकाम अत्यंत घाईगडबडीत करण्यात आले. भराव करताना

- **भराव खचल्याने अपघाताचा धोका**
- **पुलावरील वाहतूक तात्पुरती बंद**





आवश्यक त्या तांत्रिक निकषांचे पालन करण्यात आले नाही. मातीचे योग्य प्रकारे रोलिंग करण्यात आले नाही तसेच आवश्यक प्रमाणात पाणीही मारण्यात आले नसल्याने भराव सुरुवातीपासूनच कमकुवत राहिला. परिणामी काही दिवसांतच तो खचू लागला असून रस्त्यावर भेगा पडल्या आहेत. डांबरीकरणाचाही दर्जा समाधानकारक नसल्याचा आरोप करण्यात येत आहे. दररोज हजारो वाहने या पुलावरून प्रवास करतात. मुंबई-गोवा महामार्गावरील हा महत्त्वाचा दुवा असल्याने वाहनांची मोठी वर्दळ असते. अशा परिस्थितीत पुलाची सद्यस्थिती पाहता कोणतीही दुर्घटना घडल्यास त्याची मोठी किंमत नागरिकांना जीव गमावून चुकवावी लागू शकते, अशी भीती व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित ठेकेदाराला मुदतीत काम पूर्ण न केल्याबद्दल आर्थिक दंडही ठोठावण्यात आला आहे. मात्र, दंडाची रक्कम वाढू नये म्हणून कामाची गुणवत्ता आणि सुरक्षितता याकडे दुर्लक्ष करून काम उरकण्यात आल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे.

या कथित निष्काळजीपणाची सखोल चौकशी करून जबाबदारांवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे. या पाश्वभूमीवर माणगावचे ज्येष्ठ पत्रकार, नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी पुलावरील वाहतूक तात्पुरती बंद करून प्रथम पुलाची सखोल तपासणी करण्याची मागणी केली आहे. कोणताही अनुचित प्रकार घडण्यापूर्वी प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून तातडीने निर्णय घ्यावा, अशी त्यांची भूमिका आहे.

विशेष म्हणजे, याच ठिकाणी असलेला काळ नदीवरील जुना पूल ब्रिटिश काळात सन १८७१ मध्ये बांधण्यात आला होता. तब्बल दीडशे वर्षांहून अधिक काळ लोटूनही तो पूल आजही भक्कम असल्याचे नागरिक सांगतात. मात्र, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उभारण्यात आलेल्या नव्या पुलाची एवढ्या कमी कालावधीत झालेली अवस्था अनेक प्रश्न निर्माण करणारी असल्याची भावना व्यक्त होत आहे. नागरिकांनी केवळ माणगावच नव्हे तर मुंबई-गोवा महामार्गावरील इतर नव्याने बांधण्यात आलेल्या पुलांचेही तातडीने स्ट्रक्चरल ऑडिट करण्याची मागणी केली आहे. निष्कृष्ट कामांवर कठोर कारवाई करून प्रवाशांच्या जीविताची सुरक्षा हीच प्रशासनाची सर्वोच्च प्राथमिकता असावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

> **पुलाचे संपूर्ण स्ट्रक्चरल ऑडिट करून तज्ज्ञांकडून त्याच्या सुरक्षिततेचा अहवाल जाहीर करण्यात यावा. पुलातील त्रुटी दूर करून आवश्यक दुरुस्ती आणि मजबुतीकरण पूर्ण झाल्यानंतरच वाहतूक सुरू करावी, अन्यथा नागरिकांच्या जीविताशी खेळ होऊ नये म्हणून पूल बंद ठेवावा.**
>
> **-ज्ञानदेव पोवार**
> **माजी नगराध्यक्ष**

## निवडक



### मुरुड समुद्रकिनारी स्वच्छता अभियान

**तळा :** जी. एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स, तळा येथील प्राणिशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने, ओशन सोसायटी ऑफ इंडिया, पृथ्वी विज्ञान मंत्रालय, भारत सरकार यांच्या सहकार्याने तसेच जय भवानी मच्छिमार सहकारी संस्था, मुरुड आणि अडाणी पोर्ट, दिघी यांच्या सहभागातून जागतिक समुद्र दिनानिमित्त मुरुड समुद्रकिनारी भव्य स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानाचा उद्देश समुद्रकिनारा स्वच्छ व प्लास्टिकमुक्त ठेवणे, सागरी पर्यावरणाचे संवर्धन करणे तसेच नागरिकांमध्ये स्वच्छता व पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती निर्माण करणे हा होता. कार्यक्रमाच्या प्रारंभी अभियानाचे संयोजक डॉ. बी. जी. भवरे यांनी समुद्र संवर्धनाचे महत्त्व, प्लास्टिक प्रदूषणाम सांगितले. या उपक्रमासाठी जी. एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्सचे प्राचार्य डॉ. सचिन बंगाळे यांनी मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य केले. कार्यक्रमास डॉ. बी. जी. भवरे, डॉ. एस. वी. जामदार, डॉ. एन. एम. शेख, डॉ. पी. बी. अभंगे, सत्येन्द्रनाथ कुमार, तेजपाल सिंग, भूषण चव्हाण प्रकाश सरपाटील, महेंद्र गार्डी, जगन वाघरे, एस. ए. मोरे व श्री. आनंद तोडले पाटील तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी आणि परिसरातील अनेक मच्छिमार सहभागी झाले. सदर उपक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे चेअरमन नंदकुमार वेदक, उन्मेष वेदक, पी. जी. मुळे आणि डॉ. नानासाहेब यादव यांचे विशेष सहकार्य लाभले.



### मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे आंदोलन

**चिरनेर :** स्मार्ट वीज मीटर बसविण्याचा विरोध करण्यासाठी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने गांधी चौकात जोरदार घोषणा देत निदर्शने करण्यात आली. यावेळी कॉ. रामचंद्र म्हात्रे, कॉ. भूषण पाटील, हेमलता पाटील, धनवनती भगत, कॉ. संजय ठाकूर यांनी आपले विचार मांडले. निदर्शने करतांना भरमसाठ वीज दरवाढ स्मार्ट मीटर फेक दों, वीज कंपनी खासगीकरण बंद करा, जनतेची लूट करणे बंद करा, ग्राहकांना स्वस्त व नियमित वीज पुरवठा करा आदी जोरदार घोषणा देण्यात आल्या. राज्यात स्मार्ट वीज मीटरच्या अंमलबजावणीविरोधात सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर उरणमध्ये मंगळवारी भारताचा कम्युनिस्ट पक्ष आणि त्याच्या संलग्न संघटनांच्यावतीने आयोजित या आंदोलनात रायगड व नवी मुंबई परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. या आंदोलनात, अखिल भारतीय किसान सभा, अखिल भारतीय लोकशाही महिला संघटनांचा सहभाग होता.



### न्यायालयीन कर्मचाऱ्यांतर्फे वृक्षारोपण

**नेरळ :** मुंबई येथील न्यायालयीन कर्मचारी आणि ग्रामस्थ मंडळ, खांडपे यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण व संवर्धन हा पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यात आला. वन विभाग आणि शालेय विद्यार्थ्यांचे सहभागाने हा सोहळा अधिक आकर्षक ठरला. मुंबई उच्च न्यायालय कर्मचारी, ग्रामस्थ, युवक, महिला, वनपरिमंडळ अधिकारी खांडपे, वनरक्षक, तसेच ज्येष्ठ नागरिक यांनी वृक्षारोपण केला. स्थानिक आणि पर्यावरणपूरक वृक्षांची लागवड श्री खंडाई माता मंदिर परिसर, प्राथमिक शाळा खांडपे, ज्ञानमकरंद विद्यालय खांडपे, गावातील रस्त्याच्या दुतर्फा, स्मशानभूमी परिसर अशा विविध ठिकाणी केली. वृक्षारोपणाबरोबरच लावलेल्या प्रत्येक वृक्षाचे संगोपन व संवर्धन करण्याचा सामूहिक संकल्पही सर्वांनी केला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व विशद करत प्रत्येकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे जतन करण्याची शपथ घेतली.

### नांदगावमध्ये शैक्षणिक साहित्य वाटप

**पाली/गोमाशी :** संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, नांदगाव येथे विष्णुबुवा ब्रह्मचारी सामाजिक केंद्र, माणगाव यांच्या वतीने विद्यालयातील गरीब, गरजू व आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. शैक्षणिक अडचणींवर मात करून विद्यार्थ्यांनी शिक्षणाची वाट धरावी, या उद्देशाने केंद्रातर्फे दरवर्षी हा उपक्रम राबविला जातो. प्राचार्य शिंदे यांनी सामाजिक केंद्राच्या या उपक्रमाचे कौतुक करत आभार मानले. गरजू विद्यार्थ्यांना मिळालेली ही मदत त्यांच्या शिक्षणासाठी प्रेरणादायी ठरेल असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. आम्ही देत असलेले साहित्य खरोखरच योग्य विद्यार्थ्यांना देतो याचे समाधान वाटते असे गोखले म्हणाले. यावेळी विष्णुबुवा ब्रह्मचारी सामाजिक केंद्राचे सचिव गोखले, विद्यालयाचे माजी प्राचार्य बबन पालवे, विद्यमान प्राचार्य अशोक शिंदे तसेच शाळेतील शिक्षकवृंद उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते साहित्याचे वाटप करण्यात आले.

## क्लासिफाईड
**जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी**

- **ऑफिस स्टाफ आवश्यक,** Tanna Consultancy शॉप नं. १ शारदा CHS. महावीर चौक, बेल्जियन वॅफल समोर,अलिबाग, जि. रायगड ऑफिस स्टाफची आवश्यकता. संपर्क : ९९२३७५०५४९, ९१५०७१७०३८
- **प्रशस्त ३००० चौरस फूट खुला** हॉल ऑफिशिअल कामासाठी भाडेतत्त्वावर देणे आहे. गरजूनी संपर्क करावा. संपर्क – ९२२६३७९८४४ / ९८२३९२७२८८
- **किहीम बिच येथे जागा विकणे आहे.** संपर्क : ९४०३५६१४८१, ८१४९२४९९४७
- **वॉन्टेड :-** अलिबागमधील दवाखान्यामध्ये वृद्ध महिलेला सकाळी दहा ते बारा वाजेपर्यंत काळजीवाहू सेविका भेटा किंवा पगाराचे अपेक्षासह लिहा. सुधाकर रानवडे, अन्नपूर्णावाडी, हरिष बेकरीजवळ चेंढरे.

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९० / २२२७६१**

# सक्षमतर्फे शैक्षणिक साहित्य वाटप

**| सोगाव | प्रतिनिधी |**

अलिबाग तालुक्यातील कामार्ले येथे शनिवारी (दि. २७ ) जून रोजी सक्षम एज्युकेशन सोसायटीतर्फे १०१ विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. गेल्या आठ वर्षांपासून शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सक्षम एज्युकेशन सोसायटीतर्फे मोठ्या प्रमाणात शैक्षणिक उपक्रम राबविण्यात येत आहेत. कामार्ले गावात सलग चौथ्या वर्षी हा शैक्षणिक साहित्य वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमाला विद्यार्थी, पालक, अंगणवाडी सेविका, गावातील ज्येष्ठ नागरिक, ग्रामपंचायत सदस्य तसेच ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या उपक्रमासाठी लोकेश





अविनाश मणियार, राम कदम आणि सुवर्णा विशाल आमले यांनी आर्थिक सहकार्य केले. त्यांच्या सहकार्यामुळे हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

यावेळी सक्षम एज्युकेशन सोसायटीच्या वतीने सुवर्णा विशाल आमले, परेश सुर्वे, अथर्व रानवडे, गणेश पाटील, शार्दूल काठे, सागर तरंगे आणि विवेक पाटील हे उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन मिळावे, त्यांचा शैक्षणिक प्रवास अधिक सक्षम व्हावा आणि गरजू विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य उपलब्ध व्हावे, या उद्देशाने सक्षम एज्युकेशन सोसायटीतर्फे हा उपक्रम दरवर्षी सातत्याने राबविण्यात येत असून, उपस्थितांनी संस्थेच्या या सामाजिक कार्याचे मनापासून कौतुक केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विलास पाटील यांनी केले.

### स्थानकाकडे जाणाऱ्या रस्त्यावर खड्डे

**खांदा कॉलनी :** मुसळधार पावसामुळे पनवेल रेल्वे स्थानकाकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर मोठमोठ्या खड्ड्यांमध्ये पाणी साचल्याने रिक्षाचालक, दुचाकीस्वार तसेच नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. पावसाच्या पाण्यामुळे खड्ड्यांची खोली दिसत नसल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. विशेषतः दुचाकीस्वारांचा तोल जाऊन गंभीर दुखापत होण्याची शक्यता नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. दररोज हजारो रेल्वे प्रवासी या मार्गाचा वापर करत असल्याने वाहतुकीतही अडथळे निर्माण होत आहेत. रिक्षाचालकांनाही वाहन चालविताना मोठी कसरत करावी लागत असून वाहनांचे नुकसान होत असल्याची तक्रार आहे.



# ट्विंकल फ्रेंड्स ग्रुपची कार्यकारिणी जाहीर

**| रोहा | प्रतिनिधी |**

रोहा बाजार पेठेतील ट्विंकल फ्रेंड्स ग्रुपच्या अधक्षपदी जितेंद्र जैन यांची निवड करण्यात आली आहे. या संघटनेची सर्वसाधारण सभा माजी नगरसेवक मोतीलाल जैन यांच्या कार्यालयात संदीप जैन यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. सर्वप्रथम या संघटनेचे सदस्य महेंद्र गुजर व राजेंद्र जैन हे नगरसेवक पदाच्या निवडणुकीत निवडून आल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी अध्यक्षपदी जितेंद्र जैन, खजिनदार विलास गुजर यांची निवड करण्यात आली. या सभेत महेंद्र गुजर, राजेंद्र जैन, परेश दामणी, भरत जैन, विनोद जैन, कैलास जैन, प्रशांत गुजर, कौशिक शहा, हितेंद्र शाह, सेफी रोहावाला, सुरेश जैन, महावीर जैन, भरत जैन, संतोष खटावकर, धर्मेंद्र कुशवाह, पूनम कुशवाह, प्रमोद जैन, दिलीप जैन, दीपक जैन, महेश जैन, राजेश जैन, ताईरी रोहवाला, सेफी रोहवाला उपस्थित होते.



## मुरुड तालुका मुक्त पत्रकार संघातर्फे निवेदन

**| कोर्लई | प्रतिनिधी |**

खा. संजय दिना पाटील यांच्या वक्तव्याचा निषेध करत मंगळवारी (दि.३०) जून रोजी मुरुड तालुका मुक्त पत्रकार संघातर्फे पोलीस अधीक्षक रायगड यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनाद्वारे खा. पाटील यांच्याविरोधात तात्काळ चौकशी करून कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

सदर निवेदनाच्या प्रती मुरुड तहसीलदार व पोलीस निरीक्षक यांना देण्यात आल्या. यावेळी मुक्त पत्रकार संघाचे मुरुड तालुका अध्यक्ष राजीव नेवासेकर, उपाध्यक्ष प्रदीप बागडे, संतोष पाटील, पांडुरंग आरेकर, जिल्हा प्रतिनिधी ज्ञानेश्वर फलेभाई, धर्मेश मोरे उपस्थित होते.

### जगदीश शेलकरांची सदिच्छा भेट

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

उरण तालुका दैनिक पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांसह सदस्यांनी बुधवारी (दि.१) उरण पोलीस ठाण्याचे नवनियुक्त वरिष्ठ पोलीस निरीक्षक जगदिश शेलकर यांची भेट घेऊन त्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.याप्रसंगी संघटनेचे अध्यक्ष जगदीश तांडेल, उपाध्यक्ष दिनेश पवार,सचिव मधुकर ठाकूर, सदस्य जीवन केणी, सुनील ठाकूर,मनोज पाटील यांच्यासह उनपचे माजी नगराध्यक्ष परमानंद करंगुटकर उपस्थित होते. यावेळी संघटनेचे पदाधिकारी, सदस्यांनी विविध समस्यांबाबत चर्चाही केली.

# सर्वोदय विद्यालयात वह्या वाटप

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

अलिबाग तालुक्यातील सर्वोदय विद्यालय सुडकोली येथे शनिवारी (दि. २७) जून रोजी माजी विद्यार्थ्यांतर्फे मोफत शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला विद्यार्थी, गावातील ज्येष्ठ नागरिक उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



या उपक्रमासाठी सुशांक मोरे. गणेश गोसावी, रविंद्र माळी, गणेश माळी, नितिन माळी, संदीप म्हात्रे, महेश माळी, भरत गोसावी,वसुधा तांबडकर,स्वप्नील तेलगे,प्रीतम तेलगे,विशाल म्हात्रे, भरत म्हात्रे, आंबादास वाघमारे, सुनिल ठाकूर, महेश तांबडकर, नरेश पाटील, नरेश माळी, कल्पना भुरे-मोरे, सचिन वावेकर, अविनाश वावेकर, योगिता मोरे-ठाकूर, संदीप म्हात्रे, कांचन गायकर, हितेश मोरे, रत्नकांत गायकर, हरेश म्हात्रे, निलेश माळी, प्रशांत जोशी, प्रवेशा खारकर, जयवंत खारकर, विवेक मढवी, पूजा तांबडकर-पारंगे, मीनाक्षी तांबडकर-पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन मिळावे, विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य उपलब्ध व्हावे, या उद्देशाने माजी विद्यार्थ्यांनी हा उपक्रम राबविला.

या कार्यक्रमास अध्यक्ष प्रमोद भोईर, उपाध्यक्ष सदाशिव तांबडकर, खजिनदार वसंत भुरे, संचालक नामदेव तांबडकर आणि सदस्य मंडळी, मुख्याध्यापिका शोभना म्हात्रे आणि शिक्षक, मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नियोजनशून्य कारभारामुळे रस्त्यावर साचले पाणी

**| उरण | प्रतिनिधी |**

उरण तालुक्याचे औद्योगिककरण व नागरिकरण झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे येथील वाहतूकीला कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण होऊ नये यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, जेएनपीए, सिडको, उरण नगर परिषद, राजिप आणि स्थानिक ग्रामपंचायतींनी लाखो, रुपये खर्च करून दर्जेदार रस्त्याचे डांबरीकरण व काँक्रीटीकरण करण्याचे काम केले आहे. परंतु नियोजनशून्य कारभारामुळे आजही तालुक्यातील सर्रास रस्त्यावर पावसाचे पाणी साचून राहते. एकंदरीत रस्त्यावर पाणी साचण्याची मुख्य कारणे कचरा व गाळ पावसाच्या



पाण्यासोबत वाहून आलेला कचरा, प्लॅस्टिक आणि गाळ वाहिन्यांमध्ये अडकल्यामुळे पाण्याचा निचरा थांबतो. अयोग्य उतार रस्ते बांधताना आवश्यक तो उतार न दिल्यास पाणी रस्त्यावरच उभे राहते.

तालुक्यातील बहुतांश रस्त्यावर अनधिकृत बांधकामे वाढली असून नैसर्गिक जलप्रवाह किंवा गटारांवर झालेली बांधकामे पाण्याचा मार्ग रोखतात. खराब ड्रेनेज सिस्टीम वाढत्या शहरीकरणामुळे सिमेंटच्या रस्त्यांवर पाणी जमिनीत मुरत नाही आणि जुनी ड्रेनेज व्यवस्था जास्त पाण्याचा भार पेलू शकत नाही. साचलेल्या पाण्याचे दुष्परिणाम अपघात व वाहतूक कोंडी पाण्यात खड्डे न दिसल्यामुळे दुचाकी घसरणे आणि गाड्या बंद पडणे यासारख्या समस्या होतात. तरी सार्वजनिक बांधकाम विभाग, जेएनपीए, सिडको, उरण नगर परिषद, राजिप आणि स्थानिक ग्रामपंचायत यांनी आप आपल्या अखत्यारीत असलेल्या रस्त्याची पाहणी करून पावसाचे पाणी रस्त्यावर साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# कुंभिवलीतील रस्ते, गटारे अपूर्णच

**| पाताळगंगा | प्रतिनिधी |**

खालापूर तालुक्यातील कुंभिवली ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील अंतर्गत रस्ते व भुयारी गटारांची कामे गेल्या पाच महिन्यांपासून अपूर्ण असल्याने ग्रामस्थांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. वारंवार पाठपुरावा करूनही काम पूर्ण न झाल्याने ग्रामस्थांनी २९ जून रोजी खालापूर पंचायत समिती गाठून ग्रामपंचायत व ठेकेदाराला आठ दिवसांत काम पूर्ण करण्याचा अल्टिमेटम देत आंदोलनाचा इशारा दिला.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते विशाल म्हामुणकर, पितांबर लबडे, अंकुश पाटील, संतोष म्हामुणकर, सचिन म्हामुणकर, प्रवीण म्हामुणकर, दीपक मोरे, निलेश म्हामुणकर, विजय धावडे, कल्पेश सावंत, नितीन दळवी, साईराज बुरुमकर, अरुण म्हामुणकर, रत्नाकर जाधव, प्रवीण धावडे, जालिंदर गायकवाड, दत्तात्रेय म्हामुणकर यांच्यासह ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीकडे पाठपुरावा केला.

**दहा-बारा किलोच्या शिवड्याने रंगली चर्चा | चविष्ट माशांसाठी मत्स्यप्रेमींची पहाटेपासून झुंबड**

# रोह्यात ‘वलगणी’ची पर्वणी

**| चणेरा | प्रतिनिधी |**

पावसाळ्याची चाहूल लागताच रोहा तालुक्यात पारंपरिक ‘वलगणी’चा हंगाम सुरू झाला असून नदी, नाले, कालवे, आणि शेतांमधील पाण्याच्या ओघात विविध जातींच्या चविष्ट माशांची रेलचेल पाहायला मिळत आहे. सोमवारी आणि मंगळवारी झालेल्या पावसानंतर वलगणीसाठी पहाटेपासूनच तरुण, ज्येष्ठ नागरिक आणि मत्स्यप्रेमींनी खांद्यावर पागीर, हातात कांडाळ व कंटाळ घेऊन नदीकाठी जाताना दिसत आहेत.

या हंगामात आरले, कटले, मले, शिवडा, शिंगट्या, दांडा, खड्या, खवल्या यांसारख्या स्थानिक आणि चविष्ट माशांना विशेष मागणी असते. विशेष म्हणजे वलगणीच्या काळात मिळणारे हे मासे अंड्यांनी भरलेले असल्याने त्यांच्या चवीला लज्जतदार असते. त्यामुळे ग्रामीण भागातील घराघरांत सध्या या माशांच्या स्वादिष्ट पदार्थांची मेजवानी रंगू लागली आहे.

पिंगळसई, मेढा, खांब, धाटाव, रोठ बुद्रुक, रोठ खुर्द, निवी, तळाघर, लांढर, बोरघर, वाशी, महादेववाडी, मलखंडवाडी, वरसे, तिसे या परिसरात मासेमारी झाली.

दरम्यान, मुठवली गावातील





अनिकेत या तरुणाने तब्बल दहा ते बारा किलो वजनाचा शिवडा पकडल्याने संपूर्ण रोहा तालुक्यात त्याची जोरदार चर्चा रंगली आहे. एवढ्या मोठ्या आकाराचा शिवडा मिळणे दुर्मिळ मानले जात असल्याने त्याच्या या पकडीचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले आहेत.

रोहा तालुक्यात पावसाळ्यातील ‘वलगणीचे मासे’ ही केवळ खाद्यसंस्कृती नसून अनेक वर्षांपासून जपली गेलेली लोकपरंपरा आहे. यंदाही निसर्गाने भरभरून साथ दिल्याने रोहा तालुक्यातील नदी-नाले पुन्हा एकदा गजबजले असून चविष्ट वलगणीच्या माशांची पर्वणी अनुभवायला मिळत आहे.

### मत्स्यप्रेमींचा आनंद द्विगुणित

यंदा पावसाने वेळेवर हजेरी लावल्याने नदी-नाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात मासे आल्याने मत्स्यप्रेमींचा आनंद द्विगुणित झाला आहे. तासनतास पाण्यात उभे राहून मासेमारी करण्याची पारंपरिक पद्धत आजही कायम असल्याचे दिसून आले. अनेकांनी सकाळपासूनच नदी, नाले, कालवे आणि शेतातील साचलेल्या पाण्यात मासेमारीचा आनंद लुटला.

## पनवेल महानगरालिका
### अग्निशमन विभाग
### दरपत्रके मागविण्यास सुचना

पनवेल महानगरपालिकेस सन २०२५-२६ या वित्तीय वर्षाकरीता निविदापत्रकात नमूद केलेनुसार, अग्निशमन विभागास आवश्यक व अत्याधुनिक साहित्य व उपकरणे खरेदी करणेबाबत पात्र व इच्छुक संस्था/नोंदणीकृत पुरवठाधारक व प्रशिक्षित असलेल्या संस्था यांच्याकडुन सदर कामी निविदा मागविण्यात येत आहेत. याकामी कोरे निविदा प्रपत्र व कामाची तपशिलवार माहिती www.panvelcorporation.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २/०७/२०२६ रोजी पासुन उपलब्ध आहे.

जा.क्र./पमपा/अग्नि/२६२१/प्र.क्र.१६/११२१/२०२६
दिनांक :- ०१/०७/२०२६

सही/-
**(कैलास गावडे)**
**उपआयुक्त (मुख्यालय-I)**
**पनवेल महानगरपालिका**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे. बोरगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत तिचे मालक १) कृष्णा लक्ष्मण पाटील २) चंद्रकांत वाळकू पाटील ३) जनार्दन वाळकू पाटील ४) दिनेश लक्ष्मण पाटील ५) मोहन वाळकू पाटील ६) प्रकाश लक्ष्मण पाटील १ ते ६ रा. मु. बोरगाव, ता. कर्जत, जि. रायगड. ७) वंदना भगवान राणे रा.मु.पोशीर, ता. कर्जत, जि. रायगड, महाराष्ट्र - ४१०१०१ यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे:-

| सर्व्हे नं/गट नं/ हि.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार (रु.पै) |
|---|---|---|
| १००/६/अ | १-३५-०० हे. आर<br>या क्षेत्रापैकी विकत देत असलेले<br>अविभाज्य क्षेत्र ०-५५-०० | ०-५६<br>पैकी<br>०-१४ |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : १/०७/२०२६

**ॲड. सिद्धेश शंकर साखरे**
ऑफीस - वसंत पॅराडाईज, फ्लॅट
नं. १०१/१, पहिला पहिला, कोतवाल नगर,
कर्जत, ता. कर्जत, जि.रायगड
मो.८९८३४८१५६७

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे आगरकोट, पो. रेवदंडा, ता.अलिबाग, जि. रायगड यांनी येथील खालील वर्णन केलेल्या बागायत मिळकतीचे विद्यमान मालक दिलीप पंढरीनाथ गोरेगावकर, वैशाली अनंत गोरेगावकर, पराग अरुण गोरेगावकर, शिला कमलाकर गोरेगावकर, पंकज कमलाकर गोरेगावकर, विक्रम कमळाकर गोरेगावकर, शुभदा सुभाष गोरेगावकर, अंकुश सुभाष गोरेगावकर, अमित सुभाष गोरेगावकर, संगिता रमाकांत गोरेगावकर, मंगेश रमाकांत गोरेगावकर, लविना अशिष पितळे, गुलशन यशोटांवीर मोंजी, आयशा अमोल देहेरकर सर्व रा. ३०१/३०२, स्कायव्ह्यूव अपार्टमेंट, प्रार्थना समाज रोड, विलेपार्ले - पूर्व, मुंबई ४०० ०५७ यांच्या सामाईक मालकीहक्कात असलेली मालकी हक्काची व त्यांचे कब्जातील खालील वर्णन केलेली बागायत मिळकतीमधील अविभक्त हिस्सा माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशी बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| | मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|---|
| १. | आगरकोट ता.अलिबाग | २०/१ | ०-८३-७०<br>पो.ख.०-०८-६०<br>एकूण ०-९२-३० | ५१.८१ |
| २. | आगरकोट ता.अलिबाग | २१/४ | ०-००-६०<br>पो.ख.०-००-२०<br>एकूण ०-००-८० | ०.२७ |
| ३. | आगरकोट ता.अलिबाग | २१/३ | ०-०१-२०<br>पो.ख.०-००-८०<br>एकूण ०-०२-०० | ०.६४ |
| ४. | आगरकोट ता.अलिबाग | २१/१ | ०-००-८०<br>पो.ख.०-००-५०<br>एकूण ०-०१-३० | ०.३९ |
| ५. | आगरकोट ता.अलिबाग | २०/२ | ०-०८-६० | ५.३१ |
| ६. | आगरकोट ता.अलिबाग | २१/५ | ०-००-०५ | ०.२० |

**वर नमूद सामाईक मिळकतींमधील वरील कब्जेदार यांचा असणारा अविभक्त हिस्सा**

सबब सदरहू वरकस मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. या उपरही सदरहू वरकस मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहेत असे गृहीत धरून माझे अशील वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक ३०/०६/२०२६

सही /-
**ॲड. धिरज जयवंत म्हात्रे**
दुय्यम निबंधक कार्यालयासमोर,
अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे-वरंडे, ता. अलिबाग, जि. रायगड खालील नमुद वर्णनाची जमिन मिळकत १. श्री. विजय जनार्दन वरसोलकर, २. सौ. सरोज विजय वरसोलकर, दोघेही रा. घर नं. ४८२, जुनी पोस्ट गल्ली, वरसोलकर हॉस्पिटल जवळ, रेवदंडा, पो.रेवदंडा, ता.अलिबाग, जि.रायगड यांच्या सामाईक मालकीची असून सदरील जमिन मिळकत सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून माझे अशिलांनी कायमस्वरूपी खरेदी करण्याचे मान्य व कबुल केले आहे. सदर जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| वरंडे, ता.अलिबाग | १८५ | जिरायत क्षेत्र ०-४८-८०<br>वरकस ०-१८-००<br>ला. यो. क्षेत्र ०-६६-८०<br>पो.ख. ०-०६-६०<br>एकूण क्षेत्र ०-७३-४० | १२.३६ |

**वर नमूद जिरायत जमिन मिळकतीमधील १. श्री. विजय जनार्दन वरसोलकर, २. सौ.सरोज विजय वरसोलकर यांच्या सामाईक मालकीचे एकूण क्षेत्र ०-९८-०० हे.आर., आकार ३.३३ रू. पै. ही जमिन मिळकत या नोटीसचा विषय आहे.**

वर नमुद मिळकतीबाबत अन्य कुणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा गहाणखत, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स, मेहेर, कर्ज, मृत्यूपत्र वगैरे बाबत हरकत असल्यास अशा व्यक्तींनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून पंधरा (१५) दिवसांचे अवधित माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : ०१/०७/२०२६

सही /-
**ॲड. प्रविण कृष्णा झेंडेकर**
मु. शिंत्रे गल्ली, पो. आक्षी
ता. अलिबाग, जि. रायगड
खरेदीदाराचे वकील

## जाहिर नोटिस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, विद्यमान जमिन मालक श्री. संतोष विष्णू म्हात्रे यांचेसोबत ताबेकब्जातील व वहिवाटीतील त्यांचे कायदेशीर मालकी हक्कातील व हिश्यातील खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन आमचे अशिलांनी त्यांचेकडुन कायमस्वरुपी खरेदी करण्याचा व्यवहार ठरविला आहे. सदरहु जमिनीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**मौजे-चिंचवाडी, ता.कर्जत, जि.रायगड येथील जमीन मिळकतीचे वर्णन**

| भुमापन क्र. | उपविभाग क्र. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकारणी रु.-पै |
|---|---|---|---|
| २६ | १०/अ | ०.०५.०० पो.ख.०.००.०० | ०.०५ |
| २६ | ११/अ | ०.०४.०० पो.ख.०.००.०० | ०.०५ |
| २६ | ७/ब | ०.१६.०० पो.ख.०.००.०० | ०.२० |
| २६ | ८/ब | ०.१६.०० पो.ख. ०.०१.०० | ०.२० |
| १२ | ५/ब | ०.४३.०० पो.ख. ०.०४.०० | ०.३० |
| १६ | १/क | ०.०६.१० पो.ख. ०.०१.६० | ०.३५ |
| १६ | ४/अ | ०.४७.८० पो.ख. ०.०६.१० | ०.८० |

वरील वर्णनाच्या जमिनीचे संदर्भात अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, ट्रस्ट, पोटगी, वारसा, भाडेपट्टा, वहिवाट वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासहित सदर नोटीस झाल्यापासुन ७ दिवसांच्या आत खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात.

वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर जमीन निर्वेध व बोजारहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालकाबरोबर पुर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत,
दिनांक : २३/०६/२०२६

**ॲड. मोनाली रामदास हजारे**
पत्ता: ललानी रोड, कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड
मो.नं. ९२६०१०९२८२

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक वैभव वसंत बोरकर व वसंत मुरारी बोरकर यांचेकडुन खरेदी घेण्याचे निश्चित केले आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे बामणोली, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| गट क्रमांक | क्षेत्र हे.आर. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|
| १५१ | ००-३१-०० | ७.१९ |

सदर मिळकतीवरील ग्रुप ग्रामपंचायत मान तर्फे झिराड मालमत्ता क्र.१२५ क्षेत्र १४९.८२ चौ.मी ही घर मिळकत

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकत विकत घेणेचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक : ०२/०७/२०२६

**ॲड. अक्षय सुधीर म्हात्रे**
'अन्नपूर्णा', मु. पो. धोकवडे,
ता.अलिबाग, जि.रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे - वैजाळी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट नं. ८५, एकूण क्षेत्र ०-३७-०० हे. आर., आकार ७.२३ रू. पैसे या मिळकतीतून ९ मीटर रूंदीचा एकुण क्षेत्र ०-०७-०० हे.आर. इतक्या क्षेत्राचा निरंतर रस्त्याचा हक्क ही मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक अर्जुन रामचंद्र ठाकुर वगैरे रा. मु. हाशिवरे, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : ०१/०७/२०२६

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे-वैजाळी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट नं. ७४, एकूण क्षेत्र १-२७-५० हे. आर., आकार २५.८२ रू. पैसे ही मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक जयश्री काशिनाथ ठाकुर वगैरे रा.मु.हाशिवरे, ता.अलिबाग, जि.रायगड यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : ०१/०७/२०२६

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता -श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहीर हरकत सूचना

तमाम जनतेस या जाहीर सुचनेद्वारे कळविण्यात येते की, माझे अशील मे. समीरा लाइफस्टाइल प्रायव्हेट लिमिटेड, यांच्या खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मिळकती एका करारान्वये कायदेशीर व प्रत्यक्ष ताबा-कब्जात आहेत. या मिळकतीचे विद्यमान मालक व तत्कालीन कब्जा धारण करणार यांनी सदर मिळकतीचा प्रत्यक्ष ताबे कब्जा हा माझे अशीलांना दिलेला आहे, व तो अद्याप पर्यंत माझे अशीलांकडेच आहे.

माझ्या अशीलांच्या असे निदर्शनास आले आहे की, श्री. विश्वनाथ रामचन्द्र भगत रा.मु.पो.सासवने, ता. अलिबाग, जि. रायगड व श्रीमती लीलावती पांडुरंग माने रा.मांडवा,पो.धोकवडे,ता.अलिबाग, जि. रायगड हे सदरहु मिळकतीवर आपली नावे ७/१२ सदरी दाखल आहेत या गोष्टीचा गैरफायदा घेत सदर मिळकतीबाबत परस्पर व्यवहार करण्याचा प्रयत्न करीत आहेत. सदर मिळकत ही माझ्या अशीलांच्या ताब्यात असल्याने, त्याबाबत कोणताही व्यवहार करणे हे बेकायदेशीर ठरेल.

तरी या जाहीर सूचनेद्वारे तमाम जनतेस सावध करण्यात येते की, कोणीही सदर मिळकतीबाबत कोणत्याही प्रकारचा व्यवहार, जसे की खरेदीखत, साठेखत, गहाणखत, बक्षीसपत्र, लीज किंवा अन्य कोणताही करार करू नये. जर कोणी असा व्यवहार केल्यास, तो माझ्या अशीलांवर बंधनकारक राहणार नाही व अशा व्यवहारातून होणाऱ्या कोणत्याही नुकसानीस संबंधित व्यक्ती स्वतः जबाबदार राहतील. याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे इंद्रपै, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील,**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| इंद्रपै | २६ | ० | ०-७२-८ | ६.९४ |

अलिबाग.
दि.०२/०७/२०२६

Cjayant Law Office
Adv.Jayant H. Cheulkar
२०१, सृष्टी, २ रा मजला,
वेधशाळेसमोर, ता.अलिबाग, जि.रायगड

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी मौजे सरेभाग, ता. पेण, जि. रायगड येथील पुढीलप्रमाणे वर्णनांची मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. किशोर अंबाजी पाटील यांचेकडून आमचे अशिलांनी कायम खरेदीने घेणेचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतींचे वर्णन**
**मौजे-सरेभाग, ता.पेण, जि.रायगड येथील**

| मालक/कब्जेदाराचे नाव | गट क्र. | उपविभाग | क्षेत्र हे.-आर.-चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| श्री.किशोर अंबाजी पाटील | १५ | ४ | ०.४०.७०<br>पैकी<br>०.२०.०० | ५.२५ |

त्याअर्थी सदर मालक/कब्जेदार याचे व्यतिरिक्त सदर मिळकतींसदर्भात अगर त्यांचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न-वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा- कब्जा, एम.ओ.यु, हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन, रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१ (एकवीस) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील श्री. किशोर अंबाजी पाटील यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि.: ०२/०७/२०२६.

**श्री. तुषार द.देवरे, ॲडव्होकेट**
पत्ता : फ्लॅट नं. ए-२, जय नगर को.ऑप हौ.सोसा.
लि.कोर्ट रोड, ५२ बंगला, पनवेल ४१० २०६, जि.रायगड.
मोबाईल नं. ९३२५००४००८

## जाहीर नोटीस

दि. ०१/०७/२०२६

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे पोयनाड भुमापन क्र व उपविभाग १८०/१/१/३/१७ एकुण बिनशेती क्षेत्र ६१.०० चौ.मी. आकार ६१० रू.पै हि बिनशेती मिळकत व त्या मिळकतीवर बांधलेली 'पाटील इलिजन्स' ही इमारत व त्यातील सर्व निवासी सदनिकांसह विद्यमान मालक अश्विन चंद्रकांत पाटील यांच्याकडुन कायम फरोक्त खताने खरेदी घेण्याबाबत बोलणी सुरू केली आहे. विद्यमान मालकाने सदरची बिनशेती मिळकत व त्यावरील इमारत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर बिनशेती मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्यांच्या मालकी हक्काबाबत खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे.

तरी वरील बिनशेती मिळकत व त्या मिळकतीवर बांधलेली 'पाटील इलिजन्स' ही इमारतीमधील निवासी सदनिकांच्या संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या मुळ सही शिक्याची कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ७ (सात) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. आशिष नरेंद्र म्हात्रे**
मु. पेझारी (पळी आंबेघर), पो.पोयनाड
ता.अलिबाग, जि.रायगड.
मोबा.नं. ९२७३२७३८४३/९६३७२७००१९

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे बोरघर, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) | मालकांची नावे |
|---|---|---|---|---|
| बोरघर | १२५ | ०-३९-९०<br>पो.ख.०-०१-८०<br>०-४१-७० | ११.४४ | १) रेवती संजय फुंडे<br>२) बाळकृष्ण लक्ष्मण म्हात्रे<br>३) रमेश लक्ष्मण म्हात्रे |

सदरची मिळकत ही विद्यमान मालकांचे निर्वेध मालकीहक्काची असून ती विकणेचा त्यांना हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमचे अशिलांस दिला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर अन्य कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदर मिळकत ही विद्यमान मालकांचे निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे, असे गृहित धरून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वास कळावे.

अलिबाग
ता.०२/०७/२०२६

**ॲड. विधान अरविंद पाटील**
रा.वत्सला, टिळक रोड, स्टेट बँकेसमोर,
अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड
मो.नं.९४२२३७५११५

## अपर जिल्हाधिकारी रायगड मुख्यालय अलिबाग यांचे न्यायालयात
**जिल्हाधिकारी कार्यालय आवार, अलिबाग जि. रायगड**

क्रमांक/आरटीएस/अपील क्र.४९८/२०२५

१ श्रीम. गीता गोपिनाथ पाटील उर्फ मालती गोपाळ पाटील — अपिलार्थी
रा.रायवाडी, पो.आक्षी, ता.अलिबाग, जि.रायगड

विरुद्ध

१ मधुकर धर्मा पाटील मयत तर्फे वारस
१/१ श्री. सुधीर मधुकर पाटील
रा.रायवाडी, पो.आक्षी, ता.अलिबाग, जि.रायगड
१/२ श्रीम. नंदिनी मधुकर पाटील
रा. खारगल्ली, पो.नागाव, ता.अलिबाग, जि.रायगड
२ गणपत धर्मा पाटील मयत तर्फे वारस
२/१ श्री.अल्पेश गणपत पाटील — उत्तरार्थी
२/२ श्री.रुपेश गणपत पाटील
२/३ श्री. आकाश गणपत पाटील
अ.क्र. २/१ ते २/३ रा.रायवाडी, पो.आक्षी,
ता.अलिबाग, जि. रायगड
३ श्रीम. शोभा धर्मा पाटील
रा. आवास, ता. अलिबाग, जि. रायगड
४ श्रीम. मंगल शशिकांत दळवी, रा. मांडवा,
ता. अलिबाग, जि. रायगड
५ श्रीम. सुलोचना प्रकाश तुणतुणे
रा.पवेळे, पो. खंडाळा, ता.अलिबाग, जि. रायगड
६ गुलाब रघुनाथ म्हात्रे मयत तर्फे वारस
६/१ श्री.रोहिदास रघुनाथ म्हात्रे, रा. बोरपाडा, ता.अलिबाग, जि.रायगड
६/२ श्रीम.कल्पना प्रभाकर पाटील, रा. नेहुली, ता.अलिबाग, जि. रायगड

**महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये अपील**

या जाहिर नोटीसीद्वारे आपणास कळविण्यात येते की, मौजे आक्षी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट नं. १७४ क्षेत्र ०-०१-८० हे.आर. आकार ०.०५ या जमीन मिळकती संदर्भात अपिलार्थी यांनी उपविभागीय अधिकारी अलिबाग यांचेकडील आरटीएस अपील क्र. ८०/२०२३, दि. २६/०८/२०२५ मधील आदेशाविरुद्ध या न्यायालयाकडे अपील दाखल केले आहे. सदर अपिलाची नोटीस काढली असता त्याची बजावणी होऊ शकली. नाही. आपला राहण्याचा शेवटचा पत्ता वरीलप्रमाणे असल्याची माहिती अपिलार्थी यांस आहे. सबब, अपिलार्थी या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, सदर प्रकरणामध्ये दि. १३/०७/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता अपर जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांचे कार्यालयात सुनावणी निश्चित करणेत आलेली आहे. तरी आपण स्वतः अगर तुमचे वकीलांमार्फत सदर सुनावणीस हजर रहावे. आपण हजर न राहील्यास आपले गैरहजेरीत प्रकरणामध्ये सुनावणी होऊन आदेश दिला जाईल याची कृपया नोंद यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २९/०६/२०२६

सही/-
**अपर जिल्हाधिकारी रायगड**
**अलिबाग करीता**

## अलिबाग को-ऑप.अर्बन बँक लि.
### अलिबाग-रायगड

**-: जाहीर सूचना :-**

बँकेचे सर्व सभासद, ठेवीदार व ग्राहकांस कळविणेत येते की, बँकेची चौल शाखा दि.०२/०७/२०२६ पासून खालील ठिकाणी स्थलांतरीत करण्यात येत आहे. कृपया याची नोंद घ्यावी.

**स्थलांतरीत पत्ता-** थेरोंडा फाटा, रामेश्वर अपार्टमेंट समोर,
रेवदंडा रोड, ता.अलिबाग जि.रायगड
पिन. ४०२२०२


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी–सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे अलिबाग, ता.अलिबाग, जि. रायगड नगरपरिषद अलिबाग हद्दीतील खालील वर्णनाच्या मिळकती त्या मिळकतींचे विद्यमान मालक १. सौ.सोनिया विजयकुमार जाधव व २.श्री.विजयकुमार नारायण जाधव यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याविषयी ठरले असून लवकरच खरेदीखत रजिस्टर करण्यात येणार आहे. सदर मिळकती निर्वेध, बोजाविरहीत असल्याबद्दल खात्री करण्याकरीता ही नोटीस प्रसिद्ध केली आहे.

**मिळकतींचे वर्णन**

मौजे अलिबाग, ता. अलिबाग नगरपरिषद अलिबाग हद्दीतील सि.स.नं. के८८६ ए, ८८६ ए/१, केबी/१ या मिळकतीवरील अरविंद आर्केड सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. अलिबाग या इमारती मधील

१. कमर्शिअल गाळा क्र. १०२ क्षेत्र १७.०४ चौ. मी कारपेट (१८३.३५ चौ. फुट), पहिला मजला अलिबाग नगरपरिषद मालमत्ता क्र.ALB000004794. जुना मालमत्ता क्र. Z1MKT004851

२. कमर्शिअल गाळा क्र. १०३ क्षेत्र २१.४५ चौ. मी कारपेट (२३०.८० चौ. फुट), पहिला मजला, अलिबाग नगरपरिषद मालमत्ता क्र.ALB000004795 जुना मालमत्ता क्र. Z1MKT004852

सदरच्या मिळकती निर्वेध असल्याबाबत मालकांनी हवाला दिलेला आहे. तरी सदर वर वर्णन मिळकतींवर अथवा तिचे कोणतेही भागावर कुणाचीही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क व खरेदीखत या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतींचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे लेखी स्वरुपात योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत सादर करावी.

याप्रमाणे मुदतीत कुणाचीही तक्रार, हरकत आली नाही तर सदर मिळकती निर्वेध समजून मिळकतींचे मालकांबरोबर रजिस्टर खरेदीखत पूर्ण केले जाईल. त्यानंतर आलेल्या तक्रारी विचारात घेतल्या जाणार नाहीत.
हे कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०१/०७/२०२६

सही/-
MP's Consultancy
**श्री. मधुकर पाटील**
१५, त्रिमुर्ती प्लाझा, ए बिल्डींग
बीच रोड. अलिबाग अर्बन बँक समोर,
अलिबाग. ४०२२०१

## टायटल व्हेरीफिकेशनसाठी जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खाली वर्णन केलेली शेतजमीन मिळकत तिचे मालक श्रीमती. समिता गजानन राऊत यांचेकडून कायमची विकत घेण्याचे ठरविलेले आहे. सबब सदरील मिळकती संबंधीचे त्यांचे मालकी हक्काबाबत टायटल व्हेरीफिकेशनसाठी हरकती मागविल्या आहेत.

**मौजे - भानसोली, तालुका - कर्जत, जिल्हा - रायगड येथील**

| गट नं./हिस्सा नं. | एकुण क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|
| १२/१ | ०-४३-००<br>पो.ख. ०-०८-०० | ८-८४ |

तसेच सदरील मिळकतीमध्ये जाण्या-येण्याकरीता असलेल्या स.नं. १२ हिस्सा नं. २ या मिळकतीमधून विकत घेतलेल्या रस्त्याच्या वहिवाटीचे हक्कांसहित

सबब सदर मिळकतीचे टायटल संबंधाने सबब सदर शेतजमीन मिळकतीचे टायटल संबंधाने कोणाचीही कोणत्याही प्रकारे हरकत असल्यास, गहाण, दान, लीन, अन्नवस्त्र, बँकबोजा, हक्क अधिकार, हितसंबंध, करारमदार, साठेखत, जनरल मुखत्यार अन्य कोणत्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ (एकविस) दिवसांचे आत आमचे खालील पत्त्यावर पुराव्यासह लेखी हरकत नोंदवावी. नोटीसीच्या मुदतीत हरकत न आल्यास उपरोक्त शेतजमीन मिळकत ही निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजण्यात येवून खरेदीदार आपला व्यवहार पुर्ण करतील यांची नोंद घ्यावी.
येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कर्जत
दि. ०२/०७/२०२६

सही /-
**ॲड. नवनाथ कालिदास साळुंके**
ॲडव्होकेट आणि नोटरी
२०६, विंग-४, तुलसी आंगण सोसायटी,
स्टेशन रोड, PWD ऑफिस शेजारी,
ता.कर्जत, जि.रायगड. पिन-४१०२०१.
फोन: - ९८८१८४७०००
E-mail-adv.nksalunke@gmail.com

## -: जाहीर नोटीस :-

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खाली नमुद केलेल्या शेत जमीन मिळकती या खाली लिहिलेल्या जमीन मालक यांचे नावावर ७/१२ उताऱ्या सदरी महसुल दप्तरी नांवे असून ती त्यांचे खुद्द ताबा, कबजा, मालकी, वहीवाटीतील आहे, त्या शेत जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**मौजे भार्जे. ता. सुधागड जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत**

| मालकाचे नाव | गट/ भुमापन क्र | एकूण क्षेत्र हे आर | आकार रू.पै. | भोगवटा वर्ग |
|---|---|---|---|---|
| मितेश आनंद गावडे | २७ | १.०८ | ७.०३ | १ |

वरील मिळकतीसंबंधात आमचे अशिल यांनी जमीन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे, यास्तव वरील मिळकतींवर अन्य कोणाचा दान, गहाण, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, अखत्यार, लिएन, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न, वस्त्र निवारा, कुळवहीवाट, ताबा, कबजा, वहीवाट, वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, जप्ती, मॉटेगेज, संपादन, रिझव्हेशन, रेक्वीझेशन अगर अन्य प्रकारचा बोजा, हक्क, हितसंबंध तसेच एकत्र कुटूंब मिळकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (२१) एकवीस दिवसाचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रत्यक्ष भेटून मुदतीमध्ये हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासह दाखल कराव्यात. तशा प्रकारच्या हरकती मुदतीत दाखल न केल्या गेल्यास सदरच्या वरील मिळकती पुर्णपणे निर्वेध असल्याचे गृहीत धरून आमचे अशिल वरील जमीन मालकाशी खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणाऱ्या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.
हे कळावे,

दिनांक : ०२/०७/२०२६

**ॲड. सागर हिराकांत भगत**
ॲडव्होकेट
मु.उन्हेरे कुंभारशेत. पो.पाली,
ता.सुधागड, जि.रायगड
मोबा.नं. ८९८३४५६८४७

## निवडक

### ब्राझीलचा बोलबाला; जपानचा सायोनारा



**ह्युस्टन :** २५ वर्षीय आक्रमणपटू गॅब्रिएल मार्टिनेलीने भरपाई वेळेत केलेल्या निर्णायक गोलच्या बळावर ब्राझीलने फिफा विश्वचषकात उपउपांत्यपूर्व फेरी गाठताना जपानचा २-१ असा पराभव केला. याबरोबरच ब्राझीलने गेल्या अनेक विश्वचषकांपासून सुरू असलेली किमान उपउपांत्यपूर्व फेरी गाठण्याची मालिका कायम राखली, तर जपानला सलग तिसऱ्या विश्वचषकात नॉकआऊट फेरीतील पहिल्याच लढतीत पराभवाला सामोरे जावे लागले. ह्युस्टन स्टेडियमवरील या लढतीत २९व्या मिनिटाला कैशू सानो याने गोल करून जपानला १-० अशी आघाडी मिळवून दिली होती. मध्यंतरापर्यंत ही आघाडी कायम राहिली. मात्र, ५६व्या मिनिटाला अनुभवी कॅसेमिरोने हेडरद्वारे गोल करून ब्राझीलला १-१ अशी बरोबरी साधून दिली. यानंतर सामन्याच्या शेवटच्या क्षणी म्हणजेच इंजरी टाइममध्ये मार्टिनेलीने अप्रतिमरित्या बचावपटूंना चकवले व ब्राझीलला २-१ असा विजय मिळवून दिला. ब्रुनोने दिलेला पासदेखील तितकाच कौतुकास्पद होता.

### भालापटू रोहित यादवचा पराक्रम

**नवी दिल्ली :** कलिंगा स्टेडियमवर आयोजित ६५ व्या राष्ट्रीय आंतरराज्यीय वरिष्ठ ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपच्या अंतिम दिवशी भालाफेक स्पर्धेत रोहित यादवची चमक दिसून आली. रोहितने ८७.०५ मीटर भाला फेकून सुवर्णपदक जिंकले. यासोबतच, त्याने २०२६ च्या आशियाई खेळांसाठीही पात्रता मिळवली. रोहित यादवच्या नावे हा मोठा विक्रम प्रस्थापित झाला आहे. इतकंच नाही तर नीरज चोप्रानंतर तो असा विक्रम करणारा तिसरा भारतीय ठरला आहे.



या कामगिरीमुळे, रोहित या हंगामातील भारताचा सर्वाधिक लांब भालाफेक करणारा खेळाडू ठरला आहे. तसेच, श्रीलंकेच्या रमेश थरंगा पाथिरागे (९२.६२ मीटर) यांच्या पाठोपाठ, तो जगातील अव्वल भालाफेकपटूंच्या यादीत दुसऱ्या स्थानावर पोहोचला आहे. या यादीत भारताचा स्टार भालाफेकपटू नीरज चोप्रा याचाही समावेश आहे, जो ८५.६९ मीटरच्या कामगिरीसह चौथ्या स्थानावर आहे. रोहितची कामगिरी विशेष आहे कारण त्याची यापूर्वीची सर्वोत्तम कामगिरी ८३.०४ मीटर होती, जी त्याने २०२३ मध्ये केली होती. यावेळी, त्याने केवळ स्वतःचा वैयक्तिक विक्रमच मोडला नाही, तर ८४.३५ मीटरचा स्पर्धेचा विक्रमही सुधारला.

### हार्दिकने मुंबई कायमची सोडली

**नवी दिल्ली :** भारताचा स्टार अष्टपैलू खेळाडू हार्दिक पांड्याबाबत एक मोठी बातमी समोर येत आहे. हार्दिक पांड्याने मुंबई सोडून सर्वांना आश्चर्यचकित केले आहे. तो आता कायम स्वरूपी बंगळूरुला स्थायिक झाला आहे. त्याने शहराच्या बाहेरील बाजूस असलेल्या बीसीसीआयच्या सेंटर ऑफ एक्सलन्सजवळ एक घर भाड्याने घेतले आहे अशी बातमी आता समोर आली आहे.



बीसीसीआयच्या सेंटर ऑफ एक्सलन्सला आपले कायम स्वरूपी प्रशिक्षण केंद्र बनवणारा हार्दिक पहिला भारतीय क्रिकेटपटू ठरेल. हार्दिक पांड्याने हा निर्णय घेतला आहे कारण सोबत केंद्रीय करार असलेले सर्व खेळाडू दुखापतीतून बरे होण्यासाठी आणि फिटनेस चाचणीसाठी बंगळूरुच्या सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये जातात. हार्दिक पांड्या सध्या मांडीच्या दुखापतीतून सावरत आहे. यामुळे तो इंग्लंडविरुद्धच्या टी-२० आणि एकदिवसीय मालिकेतून बाहेर पडला होता. त्याने गेल्या सहा महिन्यांचा बहुतेक काळ सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये घालवला आहे. हार्दिक आता सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये स्थलांतरित झाला आहे, जे त्याचे कायमस्वरूपी प्रशिक्षण केंद्र बनले आहे. पांड्या मूळचा गुजरातच्या बडोद्याचा आहे, पण तो मुंबईत राहत असे.

### झिम्बाब्वेचा बांगलादेशवर मोठा विजय



**हरारे :** कसोटी सामन्यात झिम्बाब्वेने बांगलादेशचा तब्बल १ डाव व ८५ धावांनी पराभव केला आहे. झिम्बाब्वेने हरारेमध्ये झालेल्या या कसोटी सामन्याची नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर त्यांनी प्रथम फलंदाजी करत असलेल्या बांगलादेशला १४० धावांत सर्वबाद केलं. त्यानंतर प्रत्युत्तरात पहिल्या डावात संघाने ४१० धावा केल्या आणि त्यानंतर दुसऱ्या डावात बांगलादेशला १८५ धावांत गुंडाळलं. झिम्बाब्वेकडून सलामीवीर इनोसेंट किया याने १४० धावांची खेळी केली. याशिवाय बेन करतने ४२ धावा तर ब्रायन बेनेटने ५९ आणि क्रेग एरिवीने याने ६० धावांचं योगदान दिलं. तर खालच्या फळीत वेसली मधेवेरेने ७७ धावांची खेळी केली आणि संघाला ४१० धावांपर्यंत पोहोचवलं. यानंतर झिम्बाब्वेच्या विजयात गोलंदाजांनी महत्त्वाची भूमिका बजावली. न्यूमन न्यामहूरीने पहिल्या डावात चार बळी घेतले, तर ब्लेसिंग मुझाराबानीने दुसऱ्या डावात चार बळी घेतले.बांगलादेशकडून मोमिनुल हक हा एकमेव फलंदाज असा होता ज्याने दोन्ही डावांत मिळून अर्धशतक झळकावलं. नऊ फलंदाजांना दुहेरी धावसंख्याही गाठता आली नाही. पहिल्या डावात बांगलादेश १४० धावांवर सर्वबाद झाल्यानंतर झिम्बाब्वेने फॉलोऑन दिला. पहिल्या डावात दुसऱ्या डावात ३४ धावांसह मुशफिकुर रहीम सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला.

## महिला टी-२० वर्ल्डकप स्पर्धा

# ऑस्ट्रेलिया अंतिम फेरीत

### वेस्ट इंडिजचा ८ विकेट्सने सहज पराभव

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

ऑस्ट्रेलिया महिला संघाने विक्रमी आठव्यांदा महिला टी-२० विश्वचषकाच्या अंतिम फेरी धडक मारली आहे. सात वेळा महिलांचा टी-२० विश्वचषक जिंकणाऱ्या ऑस्ट्रेलियाने सेमीफायनलमध्ये वेस्ट इंडिजचा ८ विकेट्सने सहज पराभव केला. आता ऑस्ट्रेलियाचा संघ सातव्यांदा विश्वचषकावर नाव कोरण्यासाठी सज्ज झाला आहे. दुसरा सेमीफायनल सामना दक्षिण आफ्रिका व इंग्लंड यांच्यात होणार असून विजेता संघ ऑस्ट्रेलियाविरूद्ध अंतिम सामना खेळेल.



ऑस्ट्रेलियाच्या महिला क्रिकेट संघाने आतापर्यंत झालेल्या नऊ आयसीसी महिला टी-२० विश्वचषक स्पर्धांपैकी विक्रमी सहा वेळा विजेतेपद पटकावलं आहे. ऑस्ट्रेलियाने २०१० मध्ये वेस्ट इंडिजमध्ये न्यूझीलंडचा ३ धावांनी पराभव करत पहिलं जेतेपद पटकावलं होतं, यानंतर २०१२ मध्ये श्रीलंकेत इंग्लंडवर ४ धावांनी विजय मिळवला होता. २०१४ आणि २०१८ मध्येही इंग्लंडला नमवत संघ वर्ल्ड चॅम्पियन ठरला होता. २०२० मध्ये मेलबर्नमध्ये कांगारू संघाने भारताचा ८५ धावांनी पराभूत केलं होतं आणि २०२३ मध्ये दक्षिण आफ्रिकेचा १९ धावांनी पराभव करून विश्वविजेतेपद पटकावलं. याशिवाय, २०१६ मध्ये वेस्ट इंडिजविरुद्ध अंतिम सामन्यात पराभूत होत ऑस्ट्रेलियाला उपविजेतेपदावर समाधान मानावं लागलं होतं.

वेस्ट इंडिजने दिलेल्या १२६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाच्या संघाने १३ षटकांत १२७ धावा करत ८ विकेट्सने सहज विजय मिळवला. जॉर्जिया वॉल १६ धावा करत बाद झाली. तर बेथ मुनीने ३६ चेंडूत ८ चौकारांसह ६१ धावांची मॅचविनिंग खेळी केली. फिबी लिचफिल्ड ४ धाव करत बाद झाली. याशिवाय एलिस पेरी दुखापतीमुळे रिटायर्ड हर्ट होत माघारी परतली. यानंतर एश्ले गार्डनरने ३५ धावांची खेळी करत बेथ मुनीच्या जोडीने ऑस्ट्रेलियाला विजय मिळवून दिला.

सेमीफायनल सामन्यात ऑस्ट्रेलियाने वेस्ट इंडिजला कमी धावसंख्येवर रोखले. प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केल्यानंतर ऑस्ट्रेलियाने १२५ धावांवर वेस्ट इंडिजचा डाव गुंडाळला. कॅरिबियन संघाकडून कर्णधार हिली मॅथ्यूजने सर्वाधिक धावा केल्या. ऑस्ट्रेलियाच्या बाजूने, कर्णधार सोफी मॉलिन्यूसह तीन गोलंदाजांनी प्रत्येकी दोन बळी घेतले.

हिली मॅथ्यूज आणि कियाना जोसेफ यांनी वेस्ट इंडीजला स्थिर सुरुवात करून दिली आणि पहिल्या विकेटसाठी ४७ धावांची भागीदारी केली. नवव्या षटकाच्या पहिल्याच चेंडूवर वेस्ट इंडिजला पहिला धक्का बसला; मॅथ्यूज २८ चेंडूंत ३० धावा करून बाद झाली. त्यानंतर, जोसेफ १६ धावांवर बाद झाली. त्यानंतर स्टेफनी टेलर आणि जाझारा क्लॅक्सटन यांना खातंही उघडता आलं नाही. त्यानंतर, शेमेन कॅम्पबेलने २२ आणि चिनेल हेन्रीने १० धावा केल्या.

जॅनिलिया ग्लासगो १५ धावांवर बाद झाली. डिएंड्रा डॉटिनने १६ चेंडूंत २६ धावा केल्या; नाणेफेकीनंतर तिला दुखापत झाली होती आणि सहकाऱ्यांनी तिला उचलून मैदानाबाहेर नेलं होतं. तरीही, ती फलंदाजीसाठी परतली आणि वेस्ट इंडीजला १२५ धावांची मजल मारण्यास मदत केली. ऑस्ट्रेलियाकडून सोफी मॉलिन्यू, ॲश्ले गार्डनर व जॉर्जिया वेयरहम यांनी प्रत्येकी २-२ बळी घेतले, तर एनाबेल सदरलँडने १ विकेट घेतली.

### श्रीसंतची क्रिकेट बंदी अखेर मागे

**नवी दिल्ली :** माजी भारतीय क्रिकेटपटू एस. श्रीसंत याला मोठा दिलासा मिळाला आहे. केरळ क्रिकेट असोसिएशनने त्याच्यावर घातलेली तीन वर्षांची बंदी अखेर मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे श्रीसंत आता पुन्हा एकदा क्रिकेटच्या मैदानात किंवा क्रिकेट संबंधीच्या प्रशासकीय भूमिकेत सक्रिय होऊ शकणार आहे. काही काळापूर्वी श्रीसंतने व्हिज्युअल मीडिया आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून केरळ क्रिकेट असोसिएशनवर काही वादग्रस्त टीका केली होती. या विधानांमुळे असोसिएशनची प्रतिमा मलिन झाल्याचा ठपका ठेवत केसीएने त्याच्यावर तीन वर्षांची बंदी लादली होती. ही बंदी गेल्या केरळ क्रिकेट लीग हंगामापूर्वी घालण्यात आली होती. श्रीसंतने या शिस्तभंग कारवाईला तिरुवनंतपुरम येथील मुन्सिफ न्यायालयात आव्हान दिले होते, परंतु न्यायालयाने त्याची याचिका फेटाळून लावली होती. न्यायालयीन दिलासा न मिळाल्यानंतर, श्रीसंतने केरळ क्रिकेट असोसिएशनकडे अधिकृतपणे जाहीर आणि बिनशर्त माफी मागितली.

## नॉर्वे पहिल्यांदाच प्री-क्वार्टर फायनलमध्ये

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था।**

नॉर्वेने विश्वचषक इतिहासात पहिल्यांदाच नॉकआउट सामना जिंकला. एर्लिंग हालंडने ८६व्या मिनिटाला निर्णायक गोल केला. पॅट्रिक बर्गने पेनल्टी क्षेत्रात तीन बचावपटूंना आपल्याकडे ओढून घेतल्यानंतर हालंडला पास दिला आणि त्याने या स्पर्धेत आपला ५ वा गोल केला.

नॉर्वेसाठी पहिला गोल ३९व्या मिनिटाला अँटोनियो नुसाने केला. त्याने पेनल्टी क्षेत्राच्या डाव्या बाजूने एक उत्कृष्ट कर्लिंग शॉट मारून चेंडू जाळ्यात टाकला. हा त्याचा पहिला विश्वचषक गोल होता आणि नॉर्वेसाठी २८ सामन्यांमधील ९वा आंतरराष्ट्रीय गोल होता. आयव्हरी कोस्टने ७४व्या मिनिटाला बरोबरी साधली. निकोलस पेपेसोबत वन-टू खेळल्यानंतर, अमाद डियालोने डाव्या पायाने एक उत्कृष्ट शॉट मारून स्कोअर १-१ असा केला. यापूर्वी, डियालोने दुसऱ्या हाफमध्ये टॉरब्योर्न हेगेनचा शॉट डिफ्लेक्ट करून आपल्या संघाला वाचवले होते. हॉलंडच्या गोलनंतर, आयव्हरीकोस्टनेबरोबरीसाधण्याचा पूर्ण प्रयत्न केला. स्टॉपेज टाइमच्या सहाव्या मिनिटात, डियालोच्या थेट फ्री-किकवर गोलकीपर ऑरजान नीलांडने उत्कृष्ट बचाव केला. हा सामन्यातील त्याचा चौथा आणि सर्वात महत्त्वाचा बचाव होता.



### माणगाव तालुका क्रीडा संकुल वर्षभरात पूर्ण होणार- मंत्री आदिती तटकरे

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुका क्रीडा संकुलाचे काम वर्षभराच्या आत पूर्ण करण्यात येणार असून, माणगाव येथे अत्याधुनिक सुविधा असलेले उप-विभागीय क्रीडा संकुल उभारण्यासाठी स्वतंत्र प्रस्ताव तयार करण्यात येईल, अशी माहिती मंत्री आदिती तटकरे यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

याबाबत सदस्य प्रविण दरेकर यांनी प्रश्न उपस्थित केला. तर सदस्य अनिकेत तटकरे, भाई जगताप यांनी उपप्रश्न उपस्थित केले.

मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या, माणगाव हे रायगड जिल्ह्यातील मध्यवर्ती ठिकाण असून, २०२० च्या चक्रीवादळात तालुका क्रीडा संकुलाचे नुकसान झाले होते. त्यानंतर विभागीय क्रीडा संकुलासाठी २४ एकर जागा क्रीडा विभागाकडे हस्तांतरित करण्यात आली असून, ८५ कोटी रुपयांचा प्रस्तावही शासनाकडे पाठविण्यात आला होता. मात्र, खारघर येथे विभागीय क्रीडा संकुलाच्या प्रस्तावामुळे हा विषय प्रलंबित राहिला. या कालावधीत माणगाव तालुका क्रीडा संकुलासाठी ३ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, त्यापैकी २ कोटी रुपयांचे वितरण करण्यात आले आहे. या कामाला गती देण्यासाठी लवकरच स्वतंत्र बैठक घेऊन काम तातडीने सुरू करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

खारघर येथे विभागीय क्रीडा संकुल उभारले जात असले तरी माणगावमध्ये विशेष बाब म्हणून उप-विभागीय क्रीडा संकुल उभारण्याचा प्रस्ताव तयार करण्यात येईल. या संकुलात स्विमिंग पूल, क्रिकेटसह विविध क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्याचा शासनाचा मानस असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

माणगाव विभागीय क्रीडा संकुलासंदर्भात उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार धोरणात्मक निर्णय घेतला जाईल. डोंगरी भागातील क्रीडा संकुलांच्या विकासासाठी विशेष धोरणात्मक निर्णय घेण्यात येईल. तसेच रत्नागिरीतील क्रीडा संकुलासाठी अतिरिक्त निधीच्या प्रस्तावाचा विचार करून आवश्यक तरतूद करण्याबाबत सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे मंत्री आदिती तटकरे यांनी यावेळी सांगितले.

### मेक्सिकोचा ऐतिहासिक विजय

**नवी दिल्ली :** मेक्सिको आणि इक्वेडोर यांच्यात फिफा विश्वचषक राऊंड ऑफ ३२ मधील सामना खेळवला गेला. अखेर मेक्सिकोने आपल्या चाहत्यांना गेल्या चार दशकांपासून प्रतीक्षेत असलेला ऐतिहासिक क्षण अनुभवण्याची संधी दिली आणि ४०९ वर्षांनंतर फिफाच्या बादफेरीत विजय मिळवला. मेक्सिकोने इक्वेडोरचा २-० असा पराभव करत १९८६ नंतर प्रथमच फिफा विश्वचषकाच्या बाद फेरीत विजय मिळवला आणि उपउपांत्यपूर्व फेरीतील स्थान निश्चित केलं. सहयजमान मेक्सिकोने स्पर्धेतील आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी केली.ज्युलियन क्विनोनेस आणि राऊल जिमेनेझ यांनी पहिल्या हाफमध्ये गोल करत संघाला भक्कम आघाडी मिळवून दिली. त्यानंतर बचावफळीने शिस्तबद्ध खेळ करत इक्वेडोरला एकही गोल करू दिला नाही आणि आणखी एक क्लीन शीट नोंदवत मेक्सिकोच्या शानदार विजयावर शिक्कामोर्तब केलं.या विजयासह मेक्सिकोने १९९४ पासून फिफा विश्वचषकाच्या बाद फेरीतील सलग सात पराभवांची मालिका अखेर खंडित केली.

## सूर्यनमस्कार चॅलेंज स्पर्धा संपन्न

### योगगुरुकुल योगा क्लासचा उपक्रम

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

नागोठण्यात अल्पावधीतच नावारूपास आलेल्या योग प्रशिक्षिका यामिनीसुशीलदिघेयांच्यायोगगुरुकुल योगा क्लासतर्फे आयोजित करण्यात आलेल्या १०८ सूर्यनमस्कार चॅलेंजमध्ये योगा क्लासमधील सर्व महिला योगसाधकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

ही स्पर्धा सकाळ, मिड मॉर्निंग आणि संध्याकाळ अशा तीन बॅचमध्ये आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत एकूण १९ महिला व मुली सहभागी झाल्या होत्या. प्रत्येक सहभागीने अत्यंत उत्साह, शिस्त आणि जिद्दीने १०८ सूर्यनमस्कार पूर्ण करून स्वतःची क्षमता सिद्ध केली.

तीन सत्रात संपन्न झालेल्या या योगा स्पर्धेत प्रत्येक बॅचमधून प्रथम आणि द्वितीय क्रमांक निवडण्यात आले. सकाळच्या सत्रात अ गटात घेण्यात आलेल्या या स्पर्धेत योगिनी काळे आणि प्रिया जयस्वाल यांनी प्रथम तर ओवी दिघे आणि अल्पा परमार यांनी द्वितीय क्रमांक मिळविला. त्यानंतर सकाळी दुसऱ्या सत्रात झालेल्या ब गटाच्या स्पर्धेत समिधा चितळकर यांनी प्रथम तर समीक्षा चव्हाण यांनी द्वितीय क्रमांक मिळविला. सायंकाळी तिसऱ्या सत्रात झालेल्या क गटाच्या स्पर्धेत मीनल गुजर यांनी प्रथम तर आराध्या चितळकर यांनी द्वितीय क्रमांक मिळविला. या स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व महिलांना प्रमाणपत्र देण्यात आले.

## विम्बल्डनमध्ये सेरेना विल्यम्स पहिल्या फेरीत बाहेर

### इगा स्वियातेक पुढील फेरीत पोहोचली

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

विम्बल्डन टेनिस स्पर्धेत २३ वेळा ग्रँड स्लॅम विजेत्या सेरेना विल्यम्सचा प्रवास पहिल्याच फेरीत संपला आहे. ४४ वर्षीय अमेरिकन दिग्गज सेरेनाने सुमारे चार वर्षांनंतर स्पर्धेत पुनरागमन केले होते.



तिला ऑस्ट्रेलियाच्या २० वर्षीय माया जॉइंटने ६-३, ६-७, ६-३ अशा फरकाने हरवले. सामन्याच्या सुरुवातीला सेरेना विल्यम्स थोडी थकलेली आणि लयीत नसलेली दिसली. पहिल्या सेटमध्ये ऑस्ट्रेलियाच्या माया जॉइंटने तिच्या कमकुवतपणाचा फायदा घेतला आणि हा सेट सहज ६-३ ने जिंकला.

दुसऱ्या सेटमध्ये सेरेनाने शानदार पुनरागमन केले. दोनदा ब्रेक पॉइंटवर पिछाडीवर पडल्यानंतर तिने खेळ टाय-ब्रेकरपर्यंत नेला आणि दुसरा सेट ७-६ ने जिंकला. तथापि, तिसऱ्या सेटमध्ये शारीरिक थकवा तिच्यावर भारी पडला आणि मायाने शेवटचा सेट ६-३ ने जिंकून सामना आपल्या नावावर केला.

महिला एकेरीची विद्यमान चॅम्पियन पोलंडच्या इगा स्वियातेकलाही तिच्या पहिल्या फेरीच्या सामन्यात खूप घाम गाळावा लागला. तिसऱ्या मानांकित स्वियातेकने अमेरिकेच्या टेलर टाउनसेंडला ६-१, २-६, ६-३ असे हरवले. पहिला सेट ६-१ ने सहज जिंकल्यानंतर ती दुसरा सेट हरली. तिसऱ्या सेटच्या पहिल्या गेममध्ये तिने तीन डबल फॉल्ट करूनही चार ब्रेक पॉइंट वाचवले आणि शेवटी दोन तासांपेक्षा जास्त चाललेला सामना जिंकला.

यजमान ब्रिटनसाठी स्पर्धेचा दुसरा दिवस अत्यंत निराशाजनक ठरला. विम्बल्डनच्या इतिहासात ३८ वर्षांनंतर असे घडले आहे. जेव्हा पहिल्याच फेरीत ब्रिटनचे १५ खेळाडू हरून बाहेर पडले आहेत.



### फिफा फुटबॉल वर्ल्डकप स्पर्धा | स्वीडनचा ३-० ने केला पराभव

## एम्बाप्पेच्या दुहेरी गोलमुळे फ्रान्स विजयी

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

मागील वेळचा फायनलिस्ट फ्रान्सने फुटबॉल वर्ल्डकपच्या राउंड ऑफ १६ मध्ये स्थान मिळवले आहे. त्याने बुधवारी झालेल्या पहिल्या सामन्यात स्वीडनला ३-० ने हरवले.

न्यूयॉर्कमधील न्यू जर्सी स्टेडियममध्ये फ्रान्ससाठी किलियन एम्बाप्पेने दोन गोल केले, तर ब्रॅडली बारकोलाने एक गोल केला. आता फ्रान्सचा सामना ५ जुलै रोजी पॅराग्वेशी होईल. तर, ६ जुलै रोजी नॉर्वेचा सामना पाच वेळच्या चॅम्पियन ब्राझीलशी होईल.

एम्बाप्पेने ४५व्या आणि ७४व्या मिनिटाला गोल केले. त्याने या विश्वचषकात तिसऱ्यांदा दुहेरी गोल केले आहेत. स्पर्धेत त्याचे सहा गोल झाले आहेत. त्याने या आवृत्तीतील सर्वाधिक गोल करणाऱ्यांच्या यादीत अर्जेंटिनाच्या लिओनेल मेस्सीची बरोबरी केली आहे.

एम्बाप्पेच्या विश्वचषक कारकिर्दीत आता १८ गोल झाले आहेत. तो मेस्सीच्या विश्वविक्रमापासून फक्त एका गोलने मागे आहे. विश्वचषकाच्या बाद फेरीतील सामन्यांमध्ये त्याचे १० गोल झाले आहेत. त्याने ब्राझीलचे दिग्गज लिओनिडास आणि रोनाल्डो यांच्या प्रत्येकी आठ-आठ गोलच्या विक्रमाला मागे टाकले आहे.

फ्रान्सने संपूर्ण सामन्यात वर्चस्व राखले. संघाने स्वीडनवर २५-७ असे शॉट्स मारले, ज्यात पहिल्या हाफमध्ये १५-३ अशी आघाडी होती. आधी एम्बाप्पे आणि नंतर मायकल ओलिसेची सायकल किक पोस्टला लागली. यानंतर एम्बाप्पेने ओलिसेच्या प्रयत्नामुळे मिळालेल्या संधीचे गोलमध्ये रूपांतर केले.

५३व्या मिनिटाला गुस्ताफ लागरबिएल्केकडून चेंडू हिसकावून घेतल्यानंतर ऑरेलियन चुआमेनीने ओलिसेला पास दिला. ओलिसेने उत्कृष्ट चाल रचत बारकोलाला चेंडू दिला आणि त्याने गोल करून आघाडी २-० अशी केली. तिसरा गोलही ओलिसे आणि बारकोलाच्या मदतीने एम्बाप्पेने केला.

फ्रान्सचे प्रशिक्षक दिदिए देशां त्यांच्या आईच्या अंत्यसंस्कारानंतर संघात सामील झाले. सामन्याच्या शेवटी जेव्हा एम्बाप्पेला बदलण्यात आले, तेव्हा देशांने झुकून त्यांचे अभिवादन केले. फ्रान्सने आतापर्यंत स्पर्धेत १३ गोल केले आहेत आणि फक्त दोन गोल गमावले आहेत. मायकेल ओलिसेने पाच गोलांमध्ये असिस्ट केले आहेत.


कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)